वर्ष: 6 अंक: 14
16-31 जानेवारी, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार



भारतीय निवडणूक आयोग

# समृद्ध लोकशाही चा भक्कम आधार

'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' या संवैधानिक संकल्पासोबत लोकसहभाग आणि विश्वासाचे नवे आयाम प्रस्थापित करत भारतीय निवडणूक आयोग लोकशाहीचा आत्मा अधिक बलवान करत आहे...

ई-कॉपीसाठी QR कोड स्कॅन करा.



# 'विकसित भारत' या संकल्पाची पूर्तता नक्कीच होईल

*प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी रेडिओवरून (आकाशवाणी) प्रसारित होणाऱ्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांना समाजाच्या हिताशी संबंधित महत्त्वाच्या विषयांचा ऊहापोह करण्याची एक चांगली संधी मिळते. नवीन ऊर्जा, नवीन विषय आणि प्रेरणेने भरलेल्या 'मन की बात' च्या अगणित यशोगाथा देशवासियांना एकमेकांशी जोडतात. 28 डिसेंबर रोजी या कार्यक्रमाचा 129 वा भाग प्रसारित झाला. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 या वर्षा मधील कामगिरी बाबत ऊहापोह केला. तसेच, 2026 मध्ये देश नवीन आशा आणि नवीन संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचेही त्यांनी नमूद केले...*

- **भारतीयांना अभिमान :** 2025 या वर्षाने आपल्याला असे अनेक क्षण दिले ज्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटला. देशाची सुरक्षा असो वा खेळाचे मैदान, विज्ञानाची प्रयोगशाळा असो वा जगातील अनेक इतर मोठी व्यासपीठे; भारताने प्रत्येक ठिकाणी आपला खोलवर ठसा उमटवला आहे.
- **ऑपरेशन सिंदूर :** या वर्षी 'ऑपरेशन सिंदूर' प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचे प्रतीक बनले. आजचा भारत आपल्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करत नाही, हे जगाने स्पष्टपणे पाहिले. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान देशाच्या कानाकोपऱ्यातून भारतमातेबद्दलचे प्रेम आणि समर्पणाची दृश्ये समोर आली.
- **प्रतिजैविके (अँटीबायोटिक्स):** इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या एका अहवालानुसार, न्यूमोनिया आणि मूत्रमार्ग संसर्ग (यूटीआय- युरिनरी ट्रॅक इन्फेक्शन्स) यांसारख्या आजारांवर उपचार करण्यात अँटीबायोटिक औषधे कमी पडत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे या औषधांचे, मागचा पुढचा कुठलाही विचार न करता स्वतःच्या मनाने केलेले सेवन. म्हणूनच, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटीबायोटिक औषधे घेऊ नका, अशी माझी विनंती आहे.
- **तरुणाईची ताकद :** आज जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे. भारताकडून असलेल्या या अपेक्षेचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपल्या तरुणाईचे बळ. विज्ञानातील आपली प्रगती, नवनवीन संशोधन आणि तंत्रज्ञानाचा विस्तार यामुळे जगातील देश प्रभावित झाले आहेत.
- **स्मार्ट इंडिया हॅकाथॉन :** आज देशातील तरुणांना आपल्या अंगभूत प्रतिभा आणि कौशल्ये विकसित करून, आवडीच्या क्षेत्रात स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी विविध संधी उपलब्ध होत आहेत. 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन' हे असेच एक, कल्पनांना कृतीत उतरवणारे व्यासपीठ आहे.
- **सौर तबकडी (सोलर पॅनेल):** मणिपूरचे मोइरांगथेम सेठ ज्या भागात राहायचे, तिथे विजेची मोठी समस्या होती. अशा परिस्थितीत त्यांनी सोलर पॅनेल बसवण्याची मोहीम राबवली. यामुळे आज शेकडो घरांमध्ये सौर ऊर्जा पोहोचली आहे. आज सरकार 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजने'अंतर्गत प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला सोलर पॅनेल लावण्यासाठी सुमारे 75 ते 80 हजार रुपये देत आहे.
- **काशी तमिल संगमम :** या वर्षी वाराणसीमध्ये 'काशी तमिळ संगमम' दरम्यान तमिळ शिकण्यावर विशेष भर देण्यात आला. 'तमिळ शिकूया' (तमिळ कराकलम) या संकल्पनेखाली वाराणसीतील 50 हून अधिक शाळांमध्ये विशेष मोहिमाही राबवण्यात आल्या.
- **पार्वती गिरी :** जानेवारी 2026 मध्ये ओडिशाच्या पार्वती गिरी यांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. त्यांनी वयाच्या 16 व्या वर्षी 'भारत छोडो' चळवळीत भाग घेतला होता. त्यानंतर त्यांनी आपले जीवन समाजसेवा आणि आदिवासी कल्याणासाठी समर्पित केले. त्यांनी अनेक अनाथाश्रमांची स्थापना केली. त्यांचे प्रेरक जीवन प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करत राहील.
- **लेस क्राफ्ट :** आंध्र प्रदेशातील नरसापुरम जिल्ह्यातील 'लेस क्राफ्ट' चा (नक्षीदार लेस तयार करण्याची हस्तकला) आता देशभर बोलबाला आहे. आंध्र प्रदेश सरकार आणि नाबार्ड-राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक मिळून कारागिरांना नवीन रचना शिकवत आहेत, उत्तम कौशल्य प्रशिक्षण देत आहेत आणि त्यांना नवीन बाजारपेठा उपलब्ध करुन देत आहेत.
- **कच्छ रणोत्सव :** या वर्षी कच्छ रणोत्सव 20 फेब्रुवारीपर्यंत चालेल. येथे कच्छची लोकसंस्कृती, लोकसंगीत, नृत्य आणि हस्तकलेचे वैविध्य पाहायला मिळते. कच्छच्या शुभ्र रणाचं वैभव पाहणं हा आपल्याला एक सुखद अनुभव आहे.
- **विकसित भारत :** दर महिन्याला, 'विकसित भारत' या संकल्पनेबद्दल आपले विचार आणि योजना मांडणारे तुमचे संदेश, मला मिळत असतात. लोकांकडून मिळणाऱ्या सूचना आणि या दिशेनं त्यांचे सुरु असलेले प्रयत्न जेव्हा माझ्यापर्यंत पोहोचतात, तेव्हा विकसित भारताचा संकल्प नक्कीच पूर्ण होईल, हा विश्वास दिवसेंदिवस बळावत जातो.

'मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
**समाचार**

वर्षः 6, अंकः 14 । 16-31 जानेवारी, 2026

मुख्य संपादक
**धीरेन्द्र ओझा**
प्रधान महासंचालक, पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादन
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनीश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू)**

वरिष्ठ रचनाकार
**फूलचंद तिवारी**

रचनाकार
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**




**13 भाषांमध्ये उपलब्ध 'न्यू इंडिया समाचार' वाचण्यासाठी खाली क्लिक करा:**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**'न्यू इंडिया समाचार'चे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा:**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

'न्यू इंडिया समाचार' बद्दल सातत्यपूर्ण नवीन माहिती (अपडेट्स) मिळवण्यासाठी पाठपुरावा करा: @NISPIBIndia

# आतील पानांवर...




## मुखपृष्ठ कथा

भारत ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात जिवंत लोकशाही आहे. लोकशाहीत लोकमत सर्वोच्च असते आणि हा जनादेश नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारातून निश्चित होत असतो. अशा परिस्थितीत, मतदार यादीचे पुनरिक्षण (शुद्धीकरण) असो किंवा धोरण, पुढाकार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने निवडणूक प्रणाली अधिक प्रभावी बनवणे असो; निवडणूक सुधारणांच्या माध्यमातून लोकशाही सशक्त आणि समृद्ध करण्याची ही एक निरंतर प्रक्रिया आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत मांडलेला 'एक व्यक्ती - एक मत - एक मूल्य' हा सिद्धांतच वर्तमान आणि भविष्यातील सुधारणांचा आधार आहे... | 10-29

## पंतप्रधानांचा विशेष लेख




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 मधील यशस्वी कामगिरीवर एक 'लिंक्डइन' टिप्पणी केली आहे... | 6-9




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसामच्या भूमीवरून सांगितले की, देशाच्या भविष्याचा नवा सूर्योदय ईशान्य भारतातूनच होणार आहे... | 38-40


**वृत्त सारांश** | 4-5

**मनरेगाचा नवा अवतार: 'विकसित भारत-जी राम जी' विधेयक**
संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ग्रामीण भारताला मिळाली रोजगाराची नवीन हमी | 30-33

**सुदृढ मुलगी: समृद्ध आणि विकसित भारत**
राष्ट्रीय बालिका दिवस 2026 : मुलीचा जन्म हा उत्सव ठरो, ओझे नाही | 34-35

**पारंपरिक निदान पद्धत( वैद्यकशास्त्र) : गंभीर आरोग्य समस्यांवर उपाय**
जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ- वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) दुसऱ्या पारंपरिक वैद्यक शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींचे संबोधन | 36-37

**केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय: दिल्ली मेट्रोचा होणार विस्तार**
महाराष्ट्र आणि ओदिशामधील प्रमुख पायाभूत सुविधांनाही मंजुरी | 41

**पश्चिम बंगालच्या प्रगतीला नवी गती**
पंतप्रधान मोदींनी पश्चिम बंगालला 3,200 कोटी रुपयांच्या योजनांची दिली भेट | 42-43

**नेताजींच्या पराक्रमाने स्वातंत्र्यलढ्याला मिळाले नवे बळ**
पराक्रम दिवस - 23 जानेवारी: नेताजींच्या जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्राचे अभिवादन | 44-45

**स्वाभिमान, एकता आणि सेवेचे प्रतीक**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लखनौ मध्ये 'राष्ट्र प्रेरणा स्थळा'चे लोकार्पण | 46-47

**वीर बाल दिवस: धाडसी आणि प्रतिभावान युवा पिढी घडवण्याचे व्यासपीठ**
राष्ट्रपतींच्या हस्ते 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान | 48-49

**सुरक्षित, स्वच्छ आणि भरभक्कम भविष्याचा पाया**
अणुऊर्जा: संसदेत 'शांतता विधेयक,2025' मंजूर | 50-52

**ज्यांच्या कलेने पाषाणांतही फुंकले प्राण**
श्रद्धांजली: महान शिल्पकार राम वनजी सुतार यांचे निधन | 53

**तीन देश, एक संदेश: सहकार्य, विकास आणि विश्वास**
पंतप्रधान मोदींचा जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान दौरा | 54-58

**व्यक्तिमत्व: मुनीश्वर चंद्र डावर**
गरीब रुग्णांचे कैवारी | 59

**जागतिक पुस्तक मेळावा: "भारतीय लष्करी इतिहास: शौर्य आणि प्रज्ञा @ 75"**
पीएम-युवा लेखक मार्गदर्शन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात 43 तरुण लेखकांची निवड | 60



**प्रकाशक आणि मुद्रक: कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार विभाग)। **मुद्रण:** जेके ऑफसेट ग्राफिक्स प्रा. लि., बी-278, ओखला औद्योगिक क्षेत्र, फेज-1, नवी दिल्ली-110020, **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता:** खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल-** response-nis@pib.gov.in आर. एन. आय. क्रमांक DELHIN/2020/78812

# संपादकाच्या लेखणीतून...

# राष्ट्रीय मतदार दिवस जिवंत लोकशाहीची ताकद

सप्रेम नमस्कार!

भारतीय राज्यघटना (संविधान) स्वीकारली जात असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेतील आपल्या ऐतिहासिक भाषणात, भारतामध्ये लोकशाही प्रक्रिया प्राचीन काळापासून कशी अस्तित्वात होती, हे स्पष्ट केले होते. आपल्या 140 कोटी देशवासियांसाठी ही अभिमानाची बाब आहे की, आपली लोकशाही जगातील सर्वात प्राचीन लोकशाही असण्यासोबतच जगातील सर्वात विशाल, वैविध्यपूर्ण, तरुण, सर्वसमावेशक आणि संवेदनशील लोकशाही देखील आहे. या सर्वसमावेशक लोकशाहीची प्रभावी झलक आपल्याला निवडणुकांमध्ये पाहायला मिळते. देशात मुक्त आणि निःपक्ष निवडणुका घेण्याची घटनात्मक जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे आणि त्यांनी सात दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वातून ती यशस्वीपणे निभावली आहे. याचे महत्त्व यावरूनही लक्षात येते की, भारत एक प्रजासत्ताक म्हणून घोषित होण्याच्या बरोबर एक दिवस आधी निवडणूक आयोगाची स्थापना झाली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी मतदानाचा अधिकार हा सर्वात श्रेष्ठ मानला होता.

लोकशाहीत मतदान हे, देशाचे भविष्य निश्चित करणारे सर्वात पवित्र दान असते. म्हणूनच वेळोवेळी निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करत राहणे आणि त्याचबरोबर मतदार यादीचे शुद्धीकरण (पुनरिक्षण) देखील होत राहणे, हे आवश्यक असते.

आपल्या 76 वर्षांच्या प्रवासात निवडणूक आयोगाने महत्त्वाच्या सुधारणा करणे, तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रणाली सुलभ करणे आणि मतदानाबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात प्रभावी भूमिका बजावली आहे. याच कारणामुळे आज भारताची निवडणूक प्रणाली आणि व्यवस्थापनातून जगातील अनेक देश धडा घेत आहेत. भारताची लोकशाही जागतिक समुदायासाठी नवीन आदर्श प्रस्थापित करत आहे. या प्रवासात भारताचे मतदार आणि निवडणूक आयोग, सहभाग आणि उत्कृष्टतेचे नवीन मापदंड निर्माण करत आहेत. भारताचा निवडणूक आयोग ही, सदैव निःपक्ष आणि निर्भय राहून न्यायावर आधारित निर्णय घेणारी संस्था आहे. आपला निवडणूक आयोग ही खऱ्या अर्थाने लोकशाहीचे रक्षण करणारी संस्था आहे.

या 25 जानेवारीचा 'राष्ट्रीय मतदार दिवस', यंदा एक योग साधत विशेष महत्त्वाचा ठरला आहे, कारण त्याच दिवशी भारताने लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियांना प्रोत्साहन देणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या (International IDEA - इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी अँड इलेक्टोरल असिस्टंस) सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले. हे अध्यक्षपद मिळणे म्हणजे एक मोठे यश आहे. या निमित्ताने भारतीय निवडणूक आयोगाचा प्रवास हीच आमच्या या अंकाची मुखपृष्ठ कथा आहे.

याव्यतिरिक्त 'व्यक्तिमत्व' या सदरात गरीब रुग्णांचे कैवारी मुनीश्वर चंद्र डावर, अणुऊर्जेशी संबंधित शांतता विधेयक 2025, विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) विधेयक 2025, महान शिल्पकार राम वनजी सुतार यांना श्रद्धांजली, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, 'सुधारणांचे वर्ष 2025' यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लेख आणि राष्ट्र प्रेरणा स्थळाचे लोकार्पण यांसह पंधरवड्यातील त्यांच्या विविध कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे.

तसेच, पाक्षिकाच्या मुखपृष्ठाच्या आतील पानावर 'मन की बात' आणि मलपृष्ठाच्या बाहेरील पानावर राजस्थानच्या अलवरमधील 'सिलीसेढ तलाव' आणि छत्तीसगडच्या बिलासपूरजवळील 'कोपरा जलाशय' यांना 'रामसर स्थळ' घोषित केल्याबद्दलची विशेष माहिती समाविष्ट आहे.


आपल्या सूचना आम्हाला नक्की पाठवत राहा.

धीरेन्द्र

(धीरेन्द्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा आणि डाउनलोड करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपली मते...




## वाचायला मिळते अचूक माहिती

तुमच्याकडून पाठवले जाणारे 'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक मला नियमितपणे मिळत असते, त्याबद्दल तुमचे आभार. या पाक्षिकामध्ये, इतर कोणत्याही स्रोताकडून उपलब्ध न होऊ शकणारी अशी अतिशय अचूक माहिती वाचायला मिळते. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'न्यू इंडिया समाचार' अतिशय उपयुक्त आहे. तसेच, या पत्रिकेची मांडणी आणि रचनाही उत्कृष्ट आहे.

**-संजय मालवीय**

**akhiri.aghat@gmail.com**

## पाक्षिकात भारत सरकारच्या योजनांची संपूर्ण माहिती

माझे नाव कुमार चेल्लप्पन आहे. मी केरळमध्ये राहतो आणि व्यवसायाने पत्रकार आहे. मी 'न्यू इंडिया समाचार' चा नियमित वाचक आहे. या पत्रिकेत भारत सरकारच्या सर्व योजनांची सविस्तर माहिती असते. त्याचबरोबर, ही पत्रिका भारताच्या प्रगतीबद्दल आत्मविश्वास निर्माण करते. यात प्रसृत होणाऱ्या बहुआयामी आणि ज्ञानवर्धक माहितीमुळे आमच्या ज्ञानात भर पडते.

**kumarchellappan@gmail.com**

## केंद्र सरकारच्या प्रकल्पांची आणि योजनांची मिळते अद्ययावत माहिती

मी कोची येथील राष्ट्रीय तपास संस्थेत (नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी-NIA) सरकारी वकील (पब्लिक प्रॉसिक्यूटर) म्हणून कार्यरत आहे. मी दीर्घकाळापासून 'न्यू इंडिया समाचार' वाचत आहे. या पाक्षिकाच्या माध्यमातून मी केंद्र सरकारचे प्रकल्प आणि योजनांबाबतच्या माहितीने सदैव अद्ययावत असतो.

**advsreenaths@gmail.com**

## डिजिटल माध्यमातून या पाक्षिकातील प्रत्येक लेख लक्षपूर्वक वाचतो

माझे नाव रामू वर्मा आहे. मी, पत्रकारिता आणि जनसंवाद (जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन) मध्ये एम.ए. केले आहे. मी डिजिटल माध्यमातून 'न्यू इंडिया समाचार' या पाक्षिकातील प्रत्येक लेख अतिशय काळजीपूर्वक वाचतो. मला हे पाक्षिक खूपच आवडते. या पाक्षिकामुळे मी वर्तमान घडामोडींबाबत अद्ययावत राहतो.

**bjpramu27@gmail.com**

## महिला सक्षमीकरणात वेगाने प्रगती, देश बनतोय स्वावलंबी( आत्मनिर्भर)

केंद्र सरकार ऊर्जा, आरोग्य, नवोन्मेष, संरचनात्मक सुधारणा आणि बहुध्रुवीय जगामध्ये प्रभावी कामगिरी करत आहे, ही भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. यामुळे देश स्वावलंबी बनत आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात वेगाने प्रगती होत आहे. 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचा संकल्प घेऊन देश पुढे जात आहे. दर पंधरवड्याला अशी माहिती दिल्याबद्दल 'न्यू इंडिया समाचार'चे आभार.

**bhagwan.sel@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.

*आकाशवाणीच्या एफएम गोल्डवर 'न्यू इंडिया समाचार' दर शनिवार-रविवारी दुपारी 3:10 ते 3:25 या वेळेत ऐकण्यासाठी QR कोड स्कॅन करा.*




## आता इंडिया पोस्ट नव्या रुपात; 'GenZ टपाल कार्यालया' ची सुरुवात

देशात आता टपाल कार्यालयाची ओळख पूर्णपणे बदलत आहे. '**GenZ** पोस्ट ऑफिस' हे या परिवर्तनाचे एक नवीन उदाहरण आहे. इथली टपाल सेवा आता तरुणांसाठी एक जिवंत आणि आकर्षक अनुभव बनली आहे. येथे विद्यार्थी पत्र, पार्सल किंवा स्पीड पोस्ट (टपालाचा जलदगतीने बटवडा) यांसारख्या सेवांचा लाभ तर घेऊ शकतातच, सोबत **QR** कोड आधारित आरक्षणासह मोफत वाय-फायच्या माध्यमातून डिजिटल जगाशी जोडलेले राहू शकतात. कॅफे स्टाईल इंटिरिअर, **QR** कोड द्वारे पैशाचे व्यवहार आणि आधुनिक सुविधांच्या माध्यमातून इंडिया पोस्ट आता तरुणांची भाषा आणि गरजा समजून घेत स्वतःला नव्या युगाच्या गरजांनुसार घडवत आहे. सरकारने देशातील महाविद्यालयांच्या प्रांगणांमध्ये (कॅम्पस) '**GenZ** थीम' या संकल्पनेवर आधारित आधुनिक टपाल कार्यालय सुरू करण्याची संकल्पना राबवली आहे. अशा प्रकारचे पहिले टपाल कार्यालय, **IIT** दिल्ली येथे उघडण्यात आले आहे आणि येथे विद्यार्थ्यांसाठी वाय-फाय, **QR** कोड आधारित आरक्षण, ग्राफिटी आर्ट (भित्तीचित्रकला) आणि कार्यक्षम (स्मार्ट) सेवा उपलब्ध आहेत. हा उपक्रम तरुणांना टपाल सेवांशी एका नवीन आणि रंजक पद्धतीने जोडत आहे. दिल्ली विद्यापीठ, **IIT** गांधीनगर, **AIIMS** विजयपूर यांसारख्या संस्थांमध्ये आधुनिक सुविधांनी युक्त अशी नवीन टपाल कार्यालये सुरू झाली आहेत. लवकरच महाविद्यालयांच्या प्रांगणांमध्ये परंपरा आणि तंत्रज्ञान या दोघांची सांगड घालणारी टपाल कार्यालये उघडली जातील.

## लाल रस्ते, हरित उद्दिष्टे : भारतात प्रथमच 'टेबल टॉप रेड मार्किंग'



भारतातील महामार्गांच्या जाळ्याचा वेगाने विस्तार होत असताना, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, (**NHAI**) जबाबदार पायाभूत सुविधा विकासाची पुनर्व्याख्या करत आहे. मध्य प्रदेशातील, 'वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्प या एका संवेदनशील वन आणि घाट क्षेत्रातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-45 च्या सुमारे 12 किलोमीटर टापूत, 25 समर्पित 'ॲनिमल अंडरपास'वर (प्राण्यांसाठीचे भुयारी मार्ग) 'टेबल टॉप रेड मार्किंग' ( संवेदनशील लाल पट्टे) करण्यात आले आहे. हा सुरक्षा उपक्रम, रस्ते अभियांत्रिकीद्वारे कोणत्याही पैलूशी तडजोड न करता मानवी सुरक्षा, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरणीय संवर्धन यांमध्ये संतुलित समन्वय साधता येतो, हे स्पष्टपणे अधोरेखित करतो. **NHAI** च्या या पुढाकारामुळे **NH**-45 चा हा टापू देशातील पहिला वन्यजीव सुरक्षित महामार्ग (वाइल्ड लाइफ सेफ हायवे) बनला आहे. दुबईच्या 'शेख झायेद रोड'पासून प्रेरणा घेत **NHAI** ने राष्ट्रीय महामार्गावर भारतातील पहिले 'टेबल टॉप रेड मार्किंग' लागू केले आहे. ठराविक धोकादायक क्षेत्रांमध्ये रस्त्यावर 5 मिलिमीटर जाडीचा थर्मोप्लास्टिकचा लाल रंगाचा थर अंथरण्यात आला असून, हा गडद लाल रंग चालकांना वेगमर्यादा आणि वन्यजीवांसाठी संवेदनशील क्षेत्रात प्रवेश केल्याची त्वरित जाणीव करून देतो. रस्त्यावरील हा किंचित उंचावलेला पृष्ठभाग चालकांना हलका स्पर्श आणि ध्वनीसंकेत देतो. त्यामुळे कोणतीही असुविधा न होता किंवा अचानक ब्रेक न लावता चालक नैसर्गिकरित्या वाहनाचा वेग कमी करण्यास प्रवृत्त होतात.

# भारताच्या अंतराळ क्षेत्रातील मोठे यश:
# सर्वात वजनदार उपग्रहाचे प्रक्षेपण

LVM3-M6 चे यशस्वी प्रक्षेपण ही भारताच्या अंतराळ मोहिमेतील एक ऐतिहासिक कामगिरी आहे. LVM3-M6 द्वारे 'ब्ल्यूबर्ड ब्लॉक-2' ही एक व्यावसायिक अंतराळ मोहीम आहे. या मोहिमेद्वारे भारतातून आजवर प्रक्षेपित करण्यात आलेला सर्वाधिक वजनाचा उपग्रह अंतराळात पाठवण्यात आला. अमेरिकेचा 'ब्ल्यूबर्ड ब्लॉक-2' हा दळणवळण-संपर्क उपग्रह पृथ्वीच्या खालच्या कक्षेत (लो अर्थ ऑर्बिट) यशस्वीपणे स्थापित करण्यात आला. हा उपग्रह नव्या पिढीच्या तंत्रज्ञानाचा भाग असून, तो अंतराळातून थेट सामान्य मोबाईल फोनपर्यंत 'मोबाईल ब्रॉडबँड' सेवा उपलब्ध करून देऊ शकतो.

भारतीय प्रक्षेपण यान LVM3-M6 चे वजन अंदाजे 640 टन असून त्याची उंची 43.5 मीटर आहे. हे यान 'जिओ-सिंक्रोनस ट्रान्सफर ऑर्बिट' या भू-समकालिक स्थानांतरण कक्षेमध्ये 4,200 किलोग्रॅमपर्यंतचे वजन वाहून नेण्यास सक्षम आहे. LVM3 ची ही सहावी उड्डाण मोहीम होती. याआधी या यानाने चंद्रयान-२, चंद्रयान-3 आणि 'वनवेब' च्या दोन मोहिमांचे यशस्वी प्रक्षेपण केले आहे.

**या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिले:- ₹LVM3-M6 चे यशस्वी प्रक्षेपण हा भारताच्या अंतराळ प्रवासातील अभिमानाचा क्षण आहे. याद्वारे भारतीय भूमीवरून सोडण्यात आलेला आतापर्यंतचा सर्वात वजनदार उपग्रह— अमेरिकेचा 'ब्ल्यूबर्ड ब्लॉक-2'—त्याच्या निर्धारित कक्षेत यशस्वीरीत्या स्थापित झाला आहे. यामुळे भारताची अवजड वजन वाहून नेण्याची क्षमता अधिक मजबूत झाली असून जागतिक व्यावसायिक प्रक्षेपण बाजारपेठेत आपले स्थान अधिक बळकट झाले आहे. ही कामगिरी 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने सुरू असलेल्या आपल्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. आपल्या मेहनती अंतराळ शास्त्रज्ञांचे आणि अभियंत्यांचे हार्दिक अभिनंदन! अंतराळ क्षेत्रात भारत सातत्याने नवी शिखरे सर करत आहे.'**





'प्रगति' ची 50वी बैठक

# 85 लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मिळाली गती



*भारताने गेल्या दशकात प्रशासकीय संस्कृतीत झालेल्या बदलाचा अनुभव घेतला आहे. जेव्हा निर्णय वेळेवर घेतले जातात, समन्वय प्रभावी असतो आणि जबाबदारी निश्चित केली जाते, तेव्हा सरकारच्या कामकाजाचा वेग नैसर्गिकरित्या वाढतो. याचा थेट परिणाम नागरिकांच्या जीवनावर दिसून येतो.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

नवा भारत आता कामे रखडवून ठेवत नाही किंवा भरकटू देत नाही, तर ती वेळेपूर्वीच पूर्ण करतो. याच क्रमाने 31 डिसेंबर 2025 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, सक्रिय प्रशासन आणि वेळेवर अंमलबजावणीसाठी असलेल्या 'प्रगती' (**PRAGATI-Pro-Active Governance and Timely Implementation**) या **ICT**-आधारित बहु-प्रारुप मंचाच्या 50 व्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवले. या बैठकीत 5 राज्यांमध्ये पसरलेल्या पाच महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पांचा खर्च 40,000 कोटी रुपयांहून अधिक आहे. गेल्या दशकात 'प्रगती' या व्यवस्थेने 85 लाख कोटी रुपयांहून अधिक प्रकल्पांना गती देण्यास मदत केली आहे. 2014 या वर्षात 'प्रगती'ची सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत 377 प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला आहे. या प्रकल्पांमध्ये निर्धारित केलेल्या 3,162 समस्यांपैकी 2,958 (94 %) समस्यांचे यशस्वीपणे निराकरण करण्यात आले आहे. यामुळे प्रकल्पांमधील विलंब, वाढता खर्च आणि समन्वयाचा अभाव यांसारख्या त्रुटी कमी झाल्या आहेत. 'प्रगती'च्या महत्त्वाबाबत पंतप्रधान म्हणाले की, जसजसा भारत वेगाने प्रगती करत आहे, तशी 'प्रगतीच्या अस्तित्वाचे महत्व, अधिकच वाढले आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, 'पीएम श्री' योजनेला सर्वांगीण आणि भविष्यकाळासाठी अनुकूल शालेय शिक्षणासाठीचा राष्ट्रीय मापदंड बनवले पाहिजे. या योजनेची अंमलबजावणी केवळ पायाभूत सुविधांवर केंद्रित नसून ती परिणामकारक असायला हवी. त्यांनी सर्व मुख्य सचिवांना, पीएम श्री' योजनेच्या अंमलबजावणीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवण्यास सांगितले. 'प्रगती'च्या पुढील टप्प्यासाठी पंतप्रधानांनी सरलीकरणासाठी सुधारणा करा, पूर्णत्वासाठी काम करा आणि प्रभाव पाडण्यासाठी परिवर्तन (प्रत्यक्ष कृती) घडवा असा मंत्र दिला आहे. ▪



# 2025 सुधारणांचे वर्ष

*विकसित राष्ट्र बनण्याचा संकल्प धसास लावण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या भारताने, 2025 या वर्षात एक नवा अध्याय लिहिला आहे. हे वर्ष सांस्कृतिक गौरव, अर्थव्यवस्थेला मिळालेली नवी गती आणि शेती, नारीशक्ती, गरीब तसेच युवा वर्गाच्या उत्थानाचे साक्षीदार ठरले आहे. तसेच विज्ञान, सागरी क्षेत्र, अंतर्गत सुरक्षा आणि जागतिक स्तरावर भारताची एक नवी ओळख निर्माण करणारे असे हे वर्ष ठरले आहे. 2025 हे असे वर्ष आहे, जिथे 'विकास' हाच वारसा आणि 'राष्ट्र उभारणी हीच साधना बनली आहे. गेल्या 11 वर्षांच्या निरंतर विकासयात्रेत 2025 हे वर्ष देखील महत्त्वपूर्ण सुधारणांनी भरलेले आहे.*

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्षातील कामगिरीवर 'लिंक्डइन' (LinkedIn) टिप्पणीद्वारे आपले विचार मांडले आहेत....*

भारत आज जगाच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. आपल्या लोकांच्या कल्पक उत्साहामुळेच हे शक्य झाले आहे. आज जग भारताकडे आशेने आणि विश्वासाने पाहत आहे. ते भावी पिढ्यांना अनुसरून केलेल्या सुधारणांचे कौतुक करतात. या सुधारणांमुळे प्रगतीची प्रक्रिया वेगवान झाली आहे, ज्यामुळे देशाच्या विकासाच्या क्षमतेला अधिक बळकटी मिळू लागली आहे.

मी अनेकांना सांगत आलो आहे की भारत 'रिफॉर्म एक्सप्रेस'वर स्वार झाला आहे.

या 'रिफॉर्म एक्सप्रेस'चे मुख्य इंजिन भारताची लोकसंख्यिकीय रचना, आपली युवा पिढी आणि आपल्या लोकांचा अदम्य उत्साह आहे.

2025 हे वर्ष भारतासाठी एक असे वर्ष म्हणून स्मरणात राहील, की या वर्षात गेल्या 11 वर्षांत साध्य केलेल्या प्रगतीच्या आधारे, सुधारणांना एका सातत्यपूर्ण राष्ट्रीय अभियानाच्या स्वरुपात स्वीकार करण्यात आला. आपण संस्थांना आधुनिक बनवले, प्रशासनात सुलभता आणली आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या, सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या प्रगतीचा पाया मजबूत केला.

आपण अधिक मोठे लक्ष्य, जलद अंमलबजावणी आणि सखोल बदलासह पुढे वाटचाल केली. सुधारणांचा उद्देश नागरिकांना सन्मानाने जगण्यासाठी, उद्योजकांना आत्मविश्वासाने नवोन्मेष साकारण्यासाठी आणि संस्थांना स्पष्टता आणि विश्वासासह काम करण्यासाठी सक्षम करणे असाच आहे.

**चला केलेल्या सुधारणांची काही उदाहरणे पाहूया....**




## जीएसटी सुधारणा

- 5% आणि 18% दरांची सुस्पष्ट द्वि स्तरीय रचना लागू केली गेली आहे.
- घरे, सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, शेतकरी आणि अधिक कामगार असलेल्या क्षेत्रांवरील कराचा भार कमी केला आहे.
- विवाद कमी करणे आणि अधिक उत्तम अनुपालनाची सुनिश्चिती करणे हा या मागचा हेतू आहे.
- या सुधारणेमुळे ग्राहकांची मानसिकता आणि मागणीला चालना मिळाली आहे. सुधारणा लागू झाल्यानंतर सणासुदीच्या काळात विक्री वाढली आहे.

## लहान आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन

- "छोटी'लहान कंपन्यां'च्या व्याख्येची व्याप्ती विस्तारून आता त्यात अशा संस्थांचाही समावेश केला आहे, ज्यांची उलाढाल 100 कोटी रुपये पर्यंत आहे.
- हजारो कंपन्यांसाठी नियमांच्या अनुपालनाचा भार आणि त्याच्याशी संबंधित खर्च कमी होणार आहे.

## मध्यमवर्गीयांसाठी अभूतपूर्व दिलासा

- पहिल्यांदाच वर्षाला 12 लाख रुपये पर्यंत कमावणाऱ्या लोकांना कोणताही प्राप्तिकर द्यावा लागला नाही.
- 1961 च्या जुन्या प्राप्तिकर कायद्याऐवजी आधुनिक आणि सुलभ प्राप्तिकर कायदा, 2025 लागू केला गेला.
- या सर्व सुधारणा एकत्रितपणे भारताला एका पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित कर प्रशासनाच्या दिशेने घेऊन जात आहेत.




## 100% थेट परकीय गुंतवणूक विमा सुधारणा

- भारतीय विमा कंपन्यांमध्ये 100% थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी दिली गेली आहे.
- यामुळे विमा संरक्षण आणि नागरिकांच्या सुरक्षेला चालना मिळेल.
- स्पर्धात्मकता वाढण्यासोबतच, लोकांना अधिक चांगले विमा पर्याय मिळू शकतील.



## सागरी आणि नील अर्थव्यवस्था सुधारणा

- संसदेच्या एकाच सत्रात, पावसाळी अधिवेशनात पाच ऐतिहासिक सागरी कायदे मंजूर करण्यात आले : बिल्स ऑफ लेडिंग ॲक्ट, 2025; कॅरेज ऑफ गुड्स बाय सी बिल, 2025; कोस्टल शिपिंग बिल, 2025; मर्चंट शिपिंग बिल, 2025 आणि इंडियन पोर्ट्स बिल, 2025.
- या सुधारणांमुळे दस्तऐवज विषयक प्रक्रियांचे सुलभीकरण झाले आहे, यामुळे विवादांचे निराकरण सुलभ झाले आहे आणि व्यावसायिक दळणवळणाचा खर्च कमी होणार आहे.
- 1906, 1925 आणि 1958 चे जुने कायदे देखील बदलले गेले आहेत.

## प्रतिभूती बाजार सुधारणा

- प्रतिभूती बाजार संहिता विधेयक संसदेत सादर केले गेले आहे. यामुळे 'सेबी' मधील प्रशासकीय नियमांमध्ये अधिक सुधारणा होईल. सोबतच ग्राहकांच्या संरक्षणाची व्याप्तीही वाढेल, अनुपालनाचा भार कमी होईल आणि विकसित भारतासाठी तंत्रज्ञानाधारित प्रतिभूती बाजाराला बळकटी मिळेल.
- या सुधारणांमुळे कमी अनुपालन आणि इतर खर्चात कपात झाल्याने बचतीची सुनिश्चिती होईल.

## जन विश्वास... अपराधीकरणाच्या युगाचा अंत

- शेकडो जुने कायदे संपुष्टात आणले गेले आहेत.
- रिपीलिंग अँड अमेंडमेंट बिल, 2025 च्या माध्यमातून 71 अतिरिक्त कायदे रद्द केले गेले आहेत.

## 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'ला प्रोत्साहन

- सिंथेटिक फायबर, सूत, प्लास्टिक, पॉलिमर आणि बेस मेटल्सशी संबंधित एकूण 22 गुणवत्ता नियंत्रण आदेश रद्द केले गेले, तर विविध प्रकारचे पोलाद, अभियांत्रिकी, विद्युत आणि ग्राहकोपयोगी उत्पादन श्रेणींअंतर्गतचे 53 गुणवत्ता नियंत्रण आदेश निलंबित केले गेले आहेत, याअंतर्गत औद्योगिक आणि ग्राहकोपयोगी साधनसामग्रीच्या एका विस्तृत साखळीचा समावेश आहे.
- यामुळे कापड निर्यातीत भारताचा वाटा वाढणार आहे; पादत्राणे, स्वयंचलित वाहने यांसारख्या उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होईल आणि इलेक्ट्रॉनिक्स, सायकल तसेच स्वयंचलित उत्पादनांसाठी देशांतर्गत ग्राहकांसाठी कमी किंमतीत उत्पादने उपलब्ध होतील.

## ऐतिहासिक कामगार सुधारणा

- कामगार कायद्यांना नवीन रूप दिले गेले आहे, याअंतर्गत विखुरलेल्या 29 कायद्यांचे एकात्मिकरण करून चार आधुनिक संहिता तयार केल्या गेल्या आहेत.
- भारताने असा कामगार आराखडा तयार केला आहे, जो कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करतो आणि व्यवसाय उद्योग परिसंस्थेलाही चालना देतो.
- या सुधारणांअंतर्गत रास्त वेतन, वेळेवर वेतन देणे, अधिक उत्तम औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि कामाची सुरक्षित ठिकाणे यावर भर दिला गेला आहे.
- या सुधारणांमुळे कार्यरत मनुष्यबळात महिलांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्चित होईल.
- कंत्राटी कामगारांसह असंघटित मजुरांना ईएसआयसी आणि ईपीएफओ च्या कक्षेत आणले गेले आहे, यामुळे औपचारिक कार्यरत मनुष्यबळाची व्याप्ती विस्तारली आहे.

## भारतीय उत्पादनांसाठी अधिक उत्तम बाजारपेठ

- न्यूझीलंड, ओमान आणि ब्रिटनसोबत व्यापार करार केले गेले आहेत. यामुळे गुंतवणूक वाढेल, रोजगाराच्या संधी वाढतील आणि स्थानिक उद्योजकांनाही प्रोत्साहन मिळेल. यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील एक विश्वासार्ह आणि स्पर्धात्मक भागिदार म्हणून भारताचे स्थान अधिक बळकट होईल.
- स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड आणि लिकटेंस्टीन यांच्या युरोपीय मुक्त व्यापार संघटनेसोबत मुक्त व्यापार करार लागू झाला आहे. विकसित युरोपीय अर्थव्यवस्थांसोबत भारताचा हा पहिला मुक्त व्यापार करार आहे.



## अणुऊर्जा सुधारणा

- **SHANTI** कायदा भारताच्या स्वच्छ ऊर्जा आणि तंत्रज्ञानाच्या वाटचालीत मोठा बदल घडवून आणणारे पाऊल ठरले आहे.
- या कायद्यामुळे अणुविज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या सुरक्षित, भक्कम आणि जबाबदार विस्तारासाठी एक मजबूत चौकट सुनिश्चित झाली आहे.
- भारताला एआय युगातील वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यास मदत करते, जसे की, डेटा सेंटर, प्रगत उत्पादन, हरित हायड्रोजन आणि उच्च-तंत्रज्ञान उद्योगांना ऊर्जा पुरवणे. या सगळ्यामुळे अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि प्रगती होईल.
- आरोग्य सेवा, शेती, अन्न सुरक्षा, जल व्यवस्थापन, उद्योग, संशोधन आणि पर्यावरणीय शाश्वतता यामध्ये अणुतंत्रज्ञानाच्या शांततापूर्ण वापराचा विस्तार होतो, ज्यामुळे सर्वसमावेशक विकास आणि अधिक उत्तम जीवनमान उंचावण्यास मदत होते.
- खाजगी क्षेत्राचा सहभाग, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी नवीन मार्ग खुले होतील. भारताच्या युवा वर्गाला नवीन तंत्रज्ञान आणि भावी पिढ्यांना अनुसरून ऊर्जा विषयक उपाययोजनांच्या दिशेने पुढे जाण्याची संधी मिळणार आहे.
- गुंतवणूकदार, नवोन्मेषक आणि संस्थांकरिता, भारतासोबत भागीदारी करण्याची, गुंतवणूक करण्याची, नवोन्मेष साकारण्याची आणि एक स्वच्छ, सक्षम तसेच भविष्य सज्ज ऊर्जा परिसंस्था निर्माण करण्याची ही योग्य संधी आहे.

## ग्रामीण रोजगार सुधारणेतील मैलाचा दगड

- विकसित भारत **G RAM G** कायदा, 2025 रोजगार हमी आराखडा यामुळे रोजगार हमी 100 दिवसांवरून 125 दिवस झाली आहे.
- यामुळे गावातील पायाभूत सुविधा आणि उपजीविकांना बळकटी देण्यासाठी अधिक खर्च केला जाणार आहे.
- ग्रामीण भागांतील कामांना अधिक उत्पन्न आणि अधिक उत्तम साधनसंपत्तीची सुनिश्चिती करण्याचे साधन बनवणे हाच यामागचा उद्देश आहे.

## शैक्षणिक सुधारणा

- संसदेत नवे विधेयक सादर केले
- उच्च शिक्षणासाठी एकच एकात्मिक नियमन तयार केले जाईल.
- **UGC**, **AICTE**, **NCTE** यांसारख्या अनेक संस्थांच्या जागी आता विकसित भारत शिक्षा अधिष्ठान ही संस्था असेल.
- संस्थात्मक स्वायत्ततेला बळकटी दिली जाईल, सोबतच नवोन्मेष आणि संशोधनाला प्रोत्साहन दिले जाईल.



2025 मधील सुधारणांना महत्त्वाचे बनवणारी गोष्ट केवळ त्यांची व्याप्ती नाही, तर त्यामागचा विचार देखील आहे. आपल्या सरकारने आधुनिक लोकशाहीच्या भावनेला अनुसरून नियंत्रणाऐवजी सहकार्य आणि नियमांऐवजी सुविधेला प्राधान्य दिले आहे.

या सुधारणा संवेदनशीलतेने आखल्या गेल्या होत्या, त्यात छोटे व्यवसाय, युवा व्यावसायिक, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीयांच्या वास्तवाचा विचार केला गेला होता. चर्चा केल्यानंतरच त्या आकाराला आल्या, माहितीसाठ्यातील तपशील विचारात घेतले गेले आणि आणि भारताच्या घटनात्मक मूल्यांना अनुसरून स्वरुप दिले गेले.

या सुधारणांचा उद्देश एक समृद्ध आणि आत्मनिर्भर भारत घडवणे असाच आहे. विकसित भारताची निर्मिती हाच आपल्या विकासाच्या वाटचालीचा मार्गदर्शक सिद्धांत आहे. आम्ही येणाऱ्या वर्षांतही सुधारणा अजेंडा पुढे नेण्यास सातत्याने प्रयत्नशील राहू.

मी भारतातील आणि परदेशातील सर्वांना विनंती करतो की भारताच्या विकासाच्या गाथेशी त्यांचे नाते अधिक दृढ करावे. ***भारतावरचा विश्वास कायम ठेवावा आणि आपल्या लोकांमध्ये गुंतवणूक करत राहावी.*** ▪

पंतप्रधानांचा आढावा वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा

भारत निवडणूक आयोग

# भारताची लोकशाही

# मतदार, सुधारणा आणि भविष्य



भारत ही केवळ जगातील सर्वात मोठीच नाही, तर सर्वात जिवंत लोकशाही देखील आहे. लोकशाहीत जनतेचा कौल हाच सर्वश्रेष्ठ असतो आणि तो ठरतो नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारातून. अशा परिस्थितीत मतदार यादीचे शुद्धीकरण असो अथवा धोरण, पुढाकार वा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे निवडणूक प्रक्रिया अधिक प्रभावी करणे असो, ही निवडणूक सुधारणांच्या माध्यमातून लोकशाहीला अधिक मजबूत आणि समृद्ध बनवण्याची एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. गेल्या दशकांमधील प्रयत्नांमुळे लोकशाही मजबूत आणि समृद्ध झाली आहे. आता जेव्हा देश विकसित भारताच्या संकल्पाच्या सिद्धीकडे वाटचाल करत आहे, अशा वेळी बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान सभेत मांडलेला सिद्धांत - 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' हा आदर्शच वर्तमान आणि भविष्यातील सुधारणांचा आधार आहे...

**देश येत्या 25 जानेवारी रोजी 16 वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणार आहे, तर 2026 हे वर्ष भारतासाठी अजून एक अभिमानाची गोष्ट घेऊन आले आहे. भारताने यावर्षी आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक सहकार्य संस्थेच्या (International IDEA) सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. या निमित्ताने चला जाणून घेऊया की कशाप्रकारे तंत्रज्ञानाच्या शक्तीने जनशक्तीला दिली आहे ताकद आणि भारताच्या मतदान प्रक्रियेला बनवले आहे सुलभ, प्रभावी आणि आधुनिक**



भारतात निवडणूक केवळ एक राजकीय वा सरकार स्थापनेचे माध्यम नाही, तर ते लोकशाहीचे महापर्व म्हणून लोकउत्सवासारखे साजरे केले जाते. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणजेच लोकशाहीची जननी असलेल्या भूमीत भारत यंदा 25 जानेवारी रोजी 16 वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करत आहे. या वर्षीचा राष्ट्रीय मतदार दिन विशेष आहे. भारताने या वर्षी आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक सहकार्य संस्थेच्या (International IDEA) सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. भारतात दोन दशकांनंतर मतदार यादीच्या शुद्धीकरणाची विशेष मोहीम सुरू आहे. लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेत निवडणूक सुधारणांवर विशेष चर्चा आयोजित केली गेली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, देश स्वातंत्र्याच्या 100 व्या वर्षापर्यंत विकसित भारत बनण्याचा संकल्प सिद्धीस नेण्याच्या मार्गावर वाटचाल करू लागला आहे आणि लोकशाहीच्या समृद्धीच्या या प्रवासात भारत निवडणूक आयोग सारथी बनून सोबत चालत आहे.

देशातील कोट्यवधी लोक मतदानाच्या माध्यमातून आपल्या लोकप्रतिनिधींची निवड करतात. हे लोकशाही प्रजासत्ताकाच्या ओळखीचे एक मजबूत प्रतीक आहे. हीच ती कोनशिला आहे ज्यावर भारतीय लोकशाहीच्या भव्य रचनेचा पाया रचला गेला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने शासन प्रणाली म्हणून संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. याअंतर्गत सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींची निवड केली जाते. राज्यघटनाकारांसाठी निवडणूक आयोग किती महत्त्वाचे होते, हे आयोगाच्या स्थापनेवरूनच लक्षात येते. भारताची राज्यघटना 26 जानेवारी 1950 रोजी लागू झाली, पण त्यापूर्वी एक दिवस आधीच म्हणजेच 25 जानेवारी 1950 रोजी राज्यघटनाकारांनी निवडणूक आयोगाची स्थापना केली. निवडणूक आयोगाची स्थापना देशाच्या प्रजासत्ताक दिनापूर्वी एक दिवस आधी यासाठी झाली, कारण राज्यघटनाकारांना हे ठाऊक होते की जिवंत लोकशाही तरच शक्य आहे, जर निष्पक्ष आणि मजबूत निवडणूक व्यवस्था असेल. यात कोणालाही शंका नाही की राज्यघटनाकारांसाठी निवडणूक आयोग ही एक अतिशय महत्त्वाची संस्था होती. राज्यघटनेच्या कलम 324 मध्ये निवडणूक आयोगाची स्थापना, निवडणूक आयुक्तांची नियुक्ती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद, उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपती या सर्व निवडणुकांचे संपूर्ण नियंत्रण राज्यघटनेने निवडणूक आयोगाला दिले आहे. देशात आतापर्यंत 18 लोकसभा निवडणुका आणि 400 पेक्षा जास्त विधानसभा निवडणुका पार पाडणाऱ्या निवडणूक आयोगाने 25 जानेवारी 1950 पासून आजपर्यंत आपली सार्थकता सिद्ध केली आहे.


## लोकशाही

# नारी शक्तीचा वाढता सहभाग

*महिला मतदारांची संख्या (1952-2024)*

| निवडणुकीचे वर्ष | महिला मतदारांची संख्या |
|---|---|
| 1952 | - |
| 1957 | 9.21+ |
| 1962 | - |
| 1967 | - |
| 1971 | 13.06+ |
| 1977 | 15.41+ |
| 1980 | 17.06+ |
| 1984-85 | 19.23+ |
| 1989 | 23.68+ |
| 1991-92 | 24.25+ |
| 1996 | 28.27+ |
| 1998 | 28.91+ |
| 1999 | 29.57+ |
| 2004 | 32.19+ |
| 2009 | 34.22+ |
| 2014 | 39.70+ |
| 2019 | 43.85+ |
| 2024 | 47.63+ |

(मतदारांची संख्या कोटींमध्ये)



### लोकशाहीची समृद्ध परंपरा

भारत आज जागतिक लोकशाहीचा आधार आहे. कोणत्याही लोकशाही देशात निवडणूक हा शब्द एक सरकार स्थापनेसाठी, देशाच्या जनतेच्या सक्रिय आणि प्रत्यक्ष सहभागाचे प्रतिक आहे. आंतरराष्ट्रीय समुदायही आता

# जगातील सर्वात मोठी निवडणूक प्रक्रिया - 2024

**97.79 कोटी** नोंदणीकृत मतदार

**743** राजकीय पक्ष


**10.2 लाख** मतदान केंद्रे

**1.5 कोटी** मतदान अधिकारी आणि सुरक्षा कर्मचारी

**55 लाख** ईव्हीएम

## लोकसभा आणि विधानसभेत 33% आरक्षण देणारा कायदा मंजूर

लोकशाहीत महिलांचा सहभाग केवळ मतदानाद्वारेच नव्हे तर, नेतृत्वाद्वारे देखील वाढत आहे. 1957 मध्ये दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत 3% महिला उमेदवार होत्या तर, 2024 मध्ये हे प्रमाण 10% पर्यंत वाढले आहे. निवडून आलेल्या महिला सदस्यांची संख्या पहिल्या लोकसभेतील 22 आणि दुसऱ्या लोकसभेतील 77 वरून 17व्या लोकसभेत 78 आणि 18व्या लोकसभेत 75 झाली आहे. देशाने 2023 मध्ये 'नारी शक्ती वंदन' कायदा मंजूर केला, ज्यामुळे लोकसभा आणि विधानसभेत एक तृतीयांश आरक्षणाची तरतूद झाली. राज्यसभेतही 1952 मध्ये महिला सदस्यांची एकूण संख्या 15 होती ती आता 42 आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जवळपास 14.5 लाख निवडून आलेल्या महिला प्रतिनिधी असून एकूण सदस्यांपैकी त्यांचे प्रमाण सुमारे 46% आहे. हे जगात अद्वितीय आहे. देशातील 21 राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50% आरक्षणाची तरतूद केली आहे, 2014 मध्ये हे प्रमाण 33% होते.



### कोणत्या लोकसभा निवडणुकीत किती मतदार

(मतदार संख्या कोटीमध्ये)

| निवडणूक | मतदार संख्या | मतदान |
|---|---|---|
| पहिली | 17.32+ | 45.67% |
| दुसरी | 19.36+ | 47.74% |
| तिसरी | 21.63+ | 55.42% |
| चौथी | 25.02+ | 61.04% |
| पाचवीं | 27.41+ | 55.27% |
| सहावी | 32.11+ | 60.49% |
| सातवीं | 35.62+ | 56.92% |
| आठवीं | 40.03+ | 64.01% |
| नववीं | 49.89+ | 61.95% |
| 10वी | 51.15+ | 55.88% |
| 11वी | 59.25+ | 57.94% |
| 12वी | 60.58+ | 61.97% |
| 13वी | 61.95+ | 59.99% |
| 14वी | 67.14+ | 58.07% |
| 15वी | 71.69+ | 58.21% |
| 16वी | 83.40+ | 66.44% |
| 17वी | 91.15+ | 67.40% |
| 18वी | 97.79+ | 65.79% |

भारताला जगातील सर्वात मजबूत लोकशाही देश म्हणून ओळखतो. ही मान्यता मिळवून देण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने एक स्वतंत्र संवैधानिक संस्था म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वास्तविक भारताला प्रजासत्ताक व्यवस्थेचा समृद्ध इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाद्वारे रोवलेल्या लोकशाहीची मुळे हजारो वर्षे जुन्या प्रजासत्ताकाच्या मातीपासून पोषण प्राप्त करत आहेत. इतर देशांमध्ये असे घडलेले नाही, त्यामुळेच कदाचित आज जगभरात सर्वत्र

*एकाही बेकायदेशीर घुसखोराला या देशात मतदान करू देणार नाही, हे आमचे धोरण आहे: डिटेक्ट म्हणजे शोधा, डिलीट म्हणजे वगळा, मतदार यादीतून नावे काढून टाका आणि त्यांना डिपोर्ट करा म्हणजे देशाबाहेर पाठवा. आम्ही संवैधानिक प्रक्रियेद्वारे त्यांना डिटेक्ट, डिलीट और डिपोर्ट करू.*

**– अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**

(लोकसभेत निवडणूक सुधारणांवरील चर्चेत)

लोकशाही संस्था कमकुवत होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली जात असताना, भारतात लोकशाही बळकट होत आहे. वैशाली, कपिलवस्तु आणि मिथिलाच्या परंपरेतून भारताने हे शिकले आहे की, शासन कोणत्याही एका वर्गाची किंवा वंशाची मक्तेदारी नाही. लोकशाहीमध्ये लोकांची म्हणजेच जनतेची इच्छा सर्वोच्च असते. निवडणूक प्रक्रियेचे यश हे जागरूक मतदारांवर आधारित असते. भारत लोकशाही प्रजासत्ताक बनण्याच्या एक दिवस आधीच भारतीय निवडणूक आयोगाचा प्रवास सुरू झाला. निवडणूक प्रक्रियेची परिणामकारकता सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोग योग्य उपाययोजना करीत असतो. एक मजबूत निवडणूक प्रणाली तयार करून भारतीय निवडणूक आयोगाने संपूर्ण जगासाठी एक आदर्श ठेवला आहे.

मतदानाचा अधिकार हा सामान्य अधिकार नाही. जगभरातील लोकांनी मतदानाच्या अधिकारासाठी जोरदार संघर्ष केला आहे. संविधान सभेचे सदस्य म्हणून, आघाडीचे संविधानकार अल्लाडी कृष्णस्वामी अय्यर यांनी प्रौढ मताधिकार, हा लोकशाही व्यवस्थेच्या यशाचा प्रमुख पाया असल्याचे वर्णन केले आहे. अमेरिका हे एक आघाडीचे विकसित राष्ट्र आणि लोकशाहीचे एक उत्तम उदाहरण मानले जाते, तिथे लोकांनी अनेक दशकांच्या संघर्षानंतर तसेच अढळ धैर्य आणि चिकाटीनंतर मतदानाचा अधिकार मिळवला होता. ब्रिटनमध्येही महिलांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी दीर्घ लढाई लढावी लागली, परंतु स्वतंत्र भारतात 21 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व नागरिकांना सुरुवातीपासूनच मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. नंतर हे वय 18 पर्यंत कमी करण्यात आले. क्षमता, धर्म, वंश किंवा जातीच्या आधारावर भेदभाव न करता, पुरुष असो वा महिला, श्रीमंत असो वा गरीब, सर्वांना मतदानाचा अधिकार आहे आणि प्रत्येक व्यक्तीच्या मताचे मूल्य समान राखण्यात आले आहे. मताधिकाराच्या बाबतीत भारतीय संविधान किती ताकदवान आहे, यांचे उदाहरण महिलांना मिळालेल्या जागतिक इतिहासातील मताधिकारावरून दिसून येते. अमेरिकेसारख्या देशाला 1776 मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी 144 वर्षे लागली. इंग्लंडमध्येही, जिथून भारताने संसदीय व्यवस्था स्वीकारली, तिथे 1918 मध्ये

## निवडणूक

### 18 लोकसभा आणि 400 हून अधिक विधानसभा निवडणुका घेतल्या आहेत आयोगाने

निवडणूक आयोगाने स्थापनेपासून 75 वर्षांत 18 सार्वत्रिक निवडणुका, राज्यसभेच्या असंख्य निवडणुका, 400 हून अधिक विधिमंडळ निवडणुका आणि 16 राष्ट्रपती तसेच 17 उपराष्ट्रपतींच्या निवडणुका घेतल्या आहेत. भारतीय संविधानाच्या कलम 324 नुसार, भारतीय निवडणूक आयोग मतदार यादी तयार करण्यासाठी तसेच प्रत्येक राज्यातील संसद व विधिमंडळांच्या तसेच भारताच्या राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या कार्यालयांच्या निवडणुका आयोजित करण्यासाठी जबाबदार आहे. संविधानाच्या कलम 324 ते 329 मध्ये निवडणूक आयोगाची कार्ये, जबाबदाऱ्या, रचना आणि अधिकार परिभाषित केले आहेत.



जागतिक भूमिका

# भारतीय निवडणूक आयोग आंतरराष्ट्रीय स्तरावर बजावत आहे महत्त्वपूर्ण भूमिका




भारतीय निवडणूक आयोग केवळ भारतात निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका सुनिश्चित करत नाही तर, जगभरातील लोकशाही निवडणूक प्रक्रिया मजबूत करण्यात देखील महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारत आज निवडणूक व्यवस्थापनाच्या क्षेत्रात जागतिक मार्गदर्शक म्हणून उदयास आला आहे. भारत 1995 पासून आंतरराष्ट्रीय 'आयडिया' (आयडीईए) चा संस्थापक सदस्य आहे. ही संघटना जगभरातील लोकशाही आणि निवडणूक संस्थांना बळकटी देण्यासाठी काम करते. 2026 मध्ये भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे या परिषदेचे अध्यक्ष असतील. या काळात भारताचे लक्ष 'समावेशक, शांततापूर्ण, मजबूत आणि शाश्वत लोकशाही' आणि **IIIDEM** द्वारे जगासोबत भारताचा निवडणूक अनुभव सामायिक करण्यावर असेल.

## 142 देशांतील सहभागींना दिले प्रशिक्षण


निवडणूक आयोगाने 28 देशांमधील निवडणूक व्यवस्थापन संस्था आणि तीन आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत करार केले आहेत. जून 2011 मध्ये 'इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट'ची स्थापना करण्यात आली. गेल्या 15 वर्षांत संस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले ज्यात 142 देशांतील अंदाजे 3,170 जण सहभागी झाले होते. निवडणूक आयोगाने इजिप्त, नेपाळ, भूतान, श्रीलंका, रशिया, कझाकस्तान, व्हेनेझुएला, मेक्सिको, नामिबिया आणि गिनी यासारख्या देशांमध्ये आपले निरीक्षक आणि तज्ज्ञ पाठवले आहेत.

30 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला आणि 1928 मध्ये सर्व महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. भारतात मात्र पहिल्या दिवसापासूनच महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. जेव्हा या मुद्द्यावरील संविधान सभेतील चर्चा वेगळ्या दिशेने जात होती, तेव्हा बाबासाहेब म्हणाले की, आपल्यानंतरही अनेक देश स्वतंत्र होतील आणि मताधिकाराच्या क्षेत्रात भारताने नेतृत्व केले पाहिजे. ते म्हणाले की, जर आपण सर्वांना मतदानाचा अधिकार दिला आणि एक समान मूल्य म्हणजेच एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य राखले तर, त्याचा परिणाम जगभरात दिसून येईल. जेव्हा बाबासाहेबांनी संविधान सभेत हे सांगितले, तेव्हा कोणीतरी विचारले की, महिलांना मतदानाचा अधिकार का दिला जात आहे, त्या तर कुटुंबप्रमुखाच्या मतानुसारच मतदान करतील. त्यावर बाबासाहेबांनी उत्तर दिले होते की, असे नाही, भारतीय महिला बुद्धिमान आहेत; जेव्हा त्या सहभागी होतात तेव्हा लोकशाही मजबूत

मनोरंजक निवडणूक किस्से

### हत्तींपासून संरक्षणासाठी तैनात पथके

हे प्रकरण मेघालयातील 55 सलमानपारा मतदारसंघाशी संबंधित आहे. 2014च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान हत्तींना या मतदारसंघापासून दूर ठेवण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना आपत्कालीन बैठक घ्यावी लागली. हत्ती समस्या निर्माण करू शकतील अशा 19 मतदान केंद्रांचे संरक्षण करण्यासाठी वन कर्मचाऱ्यांची पाच पथके तैनात करण्याचा निर्णय बैठकीमध्ये घेण्यात आला.



*'वन नेशन-वन इलेक्शन' म्हणजेच एक राष्ट्र-एक मतदार यादी आणि एक राष्ट्र-एक निवडणूक यावर सतत चर्चा व्हायला हवी. जेव्हा चर्चा होईल, सत्ताधारी व विरोधी पक्ष एकत्र येतील, विचारमंथन होईल तेव्हाच अमृत निघेल. ही चर्चा थांबू नये. लोकशाहीत हाच सर्वोत्तम मार्ग असतो.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

होईल." आज त्याचा परिणाम दिसून येत आहे, महिला मोठ्या संख्येने मतदानात सहभागी होत आहेत.

## विशेष गहन पुनरीक्षण: शुद्धीकरणाचा आधार

'विशेष गहन पुनरीक्षण' (एसआयआर) म्हणजे काय? जर एखाद्या मतदाराचा मृत्यू झाला असेल तर त्याचे नाव वगळले पाहिजे. ज्याचे वय 18 वर्षे पूर्ण झाले आहे tत्याची नाव नोंदणी केली पाहिजे. जे लोक कोणत्याही प्रकारे दोन ठिकाणी मतदार झाले आहेत त्यांचे नाव वगळले पाहिजे आणि जे परदेशी नागरिक आहेत त्यांना शोधून काढून टाकले पाहिजे. हे एक गहन पुनरीक्षण आहे. हेच मतदार यादीचे शुद्धीकरण आहे. जलद शहरीकरण, शिक्षण आणि रोजगारासाठी स्थलांतर तसेच इतर सामाजिक-आर्थिक बदलांमुळे नागरिकांच्या निवासस्थानांमध्ये वारंवार बदल झाले आहेत, म्हणून त्यांचे सध्याचे निवासस्थान हुडकून काढण्याची गरज आहे. कधीकधी लोक नवीन मतदारसंघात नोंदणी करतात परंतु, मागील मतदारसंघातून त्यांची नावे काढू शकत नाहीत, यामुळे अनेकदा अनेक ठिकाणी नोंदणी होते. घुसखोरी ही आज एक मोठी समस्या बनली आहे, म्हणूनच लोकशाहीमध्ये मतदार यादीचे पुनरीक्षण करणे आवश्यक आहे. अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, निवडणूक आयोगाला संपूर्ण देशासाठी 'एसआयआर' प्रक्रिया राबवण्याचा कायदेशीर आणि संवैधानिक अधिकार आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत जे सांगितले होते, ते भारतातील निवडणूक सुधारणांचा आधार आहे आणि तेच

### निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी नवीन नियम निश्चित

सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारशी नुसार, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी एक प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी डिसेंबर 2023 मध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवाशर्ती आणि पदाचा कार्यकाळ) कायदा, 2023 मंजूर केला. या कायद्याने जुना निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि कामकाजाचे आचरण) कायदा, 1991 ची जागा घेतली.

शोध समितीच्या पॅनेलनुसार पंतप्रधान, एक केंद्रीय मंत्री आणि विरोधी पक्षनेते किंवा जर विरोधी पक्षनेत्याची मान्यता मिळाली नाही तर सर्वात मोठ्या विरोधी पक्षांचा नेता यांची त्रिसदस्यीय समिती एक नाव निश्चित करेल. राष्ट्रपतींच्या संमतीनंतर नियुक्ती केली जाईल. नवीन कायदा लागू होण्यापूर्वी सरकारच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करत असत आणि परंपरेनुसार सर्वात वरिष्ठ व्यक्तीची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली जात असे.






# भारतातील निवडणूक प्रणालीचा विकास

- सर्वात मोठा लोकशाही देश असलेला भारत गेल्या सात दशकांपासून निवडणूक लोकशाहीचा अग्रगण्य पुरस्कर्ता आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सार्वत्रिक प्रौढ मताधिकारावर आधारित प्रतिनिधी सरकार निवडण्यासाठी सार्वत्रिक निवडणुकांचे नियोजन आणि आयोजन हे सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक होते.
- भारत एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बनण्याच्या एक दिवस आधी 25 जानेवारी 1950 रोजी निवडणूक आयोगाची औपचारिक स्थापना करण्यात आली.
- संविधानाने निवडणूक आयोगाला काळाच्या गरजेनुसार एक किंवा अधिक सदस्यांचा समावेश करण्याचा अधिकार दिला आहे. पहिले मुख्य निवडणूक आयुक्त 21 मार्च 1950 रोजी नियुक्त करण्यात आले होते. सध्याच्या आयोगात तीन सदस्य आहेतः मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, तसेच दोन निवडणूक आयुक्तः डॉ. सुखबीर सिंह संधू आणि डॉ. विवेक जोशी.



| | |
|---|---|
| 1950 | निवडणूक आयोगाची औपचारिक स्थापना झाली. |
| 1989 | 16 ऑक्टोबर 1989 रोजी निवडणूक आयोगाचे रूपांतर तीन सदस्यीय संस्थेत झाले. |
| 1990 | 1 जानेवारी 1990 रोजी निवडणूक आयोगाचे पुन्हा एकदा एक सदस्यीय संस्थेत रूपांतर करण्यात आले. |
| 1993 | 1 ऑक्टोबर 1993 रोजी निवडणूक आयोगाचे पुन्हा tतीन सदस्यीय संस्थेत रूपांतर करण्यात आले. |

## निवडणूक आयुक्तांचा सहा वर्षांचा असतो कार्यकाळ


मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन निवडणूक आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांइतकेच वेतन आणि भत्ते दिले जातात. तिन्ही निवडणूक आयुक्तांना निर्णय घेण्याचे समान अधिकार आहेत. कोणत्याही विषयावर मतभेद झाल्यास बहुमताने निर्णय घेतला जातो. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्त सहा वर्षे किंवा त्यांचे वय 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत पदावर राहतात.

'एसआयआर'चा आधार आहे. ते म्हणाले होते की, राजकारणात आम्ही एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य या तत्त्वाचे समर्थन करतो. हीच आज निवडणूक आयोगाची विचारसरणी आहे. एका व्यक्तीला फक्त एक मत, एक मूल्य असावे. बाबासाहेबांच्या मते, अपात्र मतदारांचा मतदारयादीत समावेश असू नये आणि पात्र मतदारांना वगळता कामा नये. हा आजच्या विशेष मतदार पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेचा आधार आहे. या प्रक्रियेअंतर्गत, कोणत्याही पात्र व्यक्तीला मतदार यादीतून आणि मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाऊ नये. त्याचप्रमाणे, अपात्र

मनोरंजक
निवडणूक किस्से

## महिलांनी त्यांची नावे सांगण्यास दिला नकार

देशात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी गावोगावी जाऊन निवडणुकीशी संबंधित माहिती किंवा असे म्हणूया की आकडेवारी गोळा करत होते. त्यांच्या गावभेटी दरम्यान त्यांना मोठ्या संख्येने महिला भेटल्या ज्यांनी त्यांची नावे अनोळखी व्यक्तींसोबत सामायिक करण्यास नकार दिला. त्याऐवजी, त्यांनी स्वतःची ओळख कोणाची तरी पत्नी, आई, मुलगी, बहीण किंवा विधवा म्हणून करून दिली. याचा परिणाम असा झाला की पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदार यादीतून 28 लाख नावे वगळण्यात आली.



**भारतातील पहिल्या लोकसभा निवडणुकीत मतदारांची संख्या 17.32 कोटी होती, जी 2024च्या निवडणुकीत 97 कोटींहून अधिक झाली. मतदारांच्या टक्केवारीतील ही पाच पटींहून अधिक वाढ हाताळणे, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटशिवाय शक्य झाले नसते.**

व्यक्ती यात सहभागी होऊ नयेत, हेच सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी एसआयआर प्रक्रिया राबविली जाते.

संविधानानुसार, भारतीय निवडणूक आयोगाला कलम 324 अंतर्गत मतदार यादी तयार करणे बंधनकारक आहे. हा अधिकार संविधान सभेने त्यांना प्रदान केला आहे. म्हणजेच मतदार यादी राखणे, ही आयोगाची संवैधानिक जबाबदारी आहे. हेच कलम मतदार यादी तयार करण्याचा आणि संसद आणि विधानसभा निवडणुकांच्या आयोजनाच्या दृष्टीने देखरेख, निर्देश आणि नियंत्रण करण्याचा अधिकार देतो. या संवैधानिक संस्थेला लोकप्रतिनिधी कायदा, 1950 आणि मतदार नोंदणी नियम, 1960 (आरईआर-1960) द्वारे सशक्त करण्यात आले आहे. कलम 326 मध्ये असेही नमूद केले आहे की भारतातील प्रत्येक नागरिक जो विशिष्ट तारखेला 18 वर्षे वयाचा झाला आहे आणि कोणत्याही कायद्यानुसार अपात्र ठरलेला नाही त्याला मतदार म्हणून नोंदणी करण्याचा अधिकार आहे. शिवाय, कलम 16, कलम 19 आणि लोकप्रतिनिधी कायदा, 1950 नुसार नामांकनासाठी मूलभूत पात्रता निकष निश्चित केले आहेत. या अटींमध्ये हे समाविष्ट आहेः अर्जदार भारतीय नागरिक असावा, मानसिकदृष्ट्या निरोगी असावा, विशिष्ट तारखेला त्याचे वय 18 वर्षे पूर्ण झालेले असावे आणि तो संबंधित मतदारसंघाचा रहिवासी असावा. मतदार यादीत फक्त पात्र नागरिकांनाच समाविष्ट करणे हे निवडणूक आयोगाचे संवैधानिक कर्तव्य आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी मतदार यादीची अचूकता आणि अखंडता राखणे आवश्यक आहे. अपात्र मतदारांना काढून टाकणे आणि त्याच व्यक्तीचे नाव अनेक ठिकाणांवरील मतदार यादीतून काढून टाकणे यामुळे पारदर्शकता सुनिश्चित होऊन पर्यायाने लोकशाही मजबूत होते.

## श्याम सरन नेगी



## स्वतंत्र भारताचे पहिले मतदार

*स्वतंत्र भारताचे पहिले मतदार असणारे श्याम सरन नेगी यांनी 70 वर्षांहून अधिक काळ सतत मतदान केले आणि जाता जाताही 2 नोव्हेंबर 2022 रोजी पोस्टल बॅलेटद्वारे आपले कर्तव्य बजावले. त्यांनी एकूण 34 वेळा मतदानाचा हक्क बजावला. 5 नोव्हेंबर 2022 रोजी श्याम सरन नेगी यांचे वयाच्या 106 व्या वर्षी त्यांच्या मूळ गावी, कल्पा, किन्नौर, हिमाचल प्रदेश येथे निधन झाले.*

1960च्या मतदार नोंदणी नियमांच्या कलम 21 मध्ये असे नमूद केले आहे की प्रत्येक मतदारसंघाची मतदार यादी वर्षातून चार वेळा विशेष गहन पुनरीक्षण किंवा सारांश पुनरीक्षणाद्वारे सुधारित केली जावी, जसे की निवडणूक आयोगाने निर्देशित केले आहे. संविधानाने निवडणूक आयोगाला मतदार यादीचे संपूर्ण पुनरीक्षण करण्याचे पूर्ण अधिकार दिले आहेत. देशात एसआयआर पहिल्यांदाच केले जात नाही; यापूर्वीही असे अनेक वेळा केले गेले आहे. सारांश पुनरीक्षण ही एक नियमित अद्ययावत प्रक्रिया आहे, तर एसआयआर ही एक व्यापक प्रक्रिया आहे. एसआयआर मधील बूथ

# निवडणूक आयोगाने केलेल्या सुधारणा

*निवडणूक आयोगाने अलीकडेच लोकशाहीला बळकट करण्यासाठी, मतदारांना अधिक सुविधा पुरवण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने तीस पेक्षा जास्त संस्थात्मक, प्रशासकीय आणि तांत्रिक सुधारणा केल्या आहेत...*

- कोणताही पात्र मतदार, मतदान प्रक्रियेपासून वंचित राहू नये तसेच कोणत्याही अपात्र व्यक्तीचे नाव मतदारयादीमध्ये समाविष्ट होऊ नये या उद्देशाने बिहार मध्ये दोन दशकांच्या कालावधीनंतर विशेष सखोल फेरतपासणी करण्यात आली.
- ऑनलाईन प्लॅटफॉर्ममुळे मतदारांसाठीच्या सेवा आता डिजिटल स्वरूपात प्राप्त झाल्या आहेत. आता मतदारयादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी, रद्द करण्यासाठी किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी मतदार ऑनलाईन अर्ज करु शकतात. ही प्रक्रिया आता सोपी झाली असून वेळेची बचत होत आहे.
- अठराव्या लोकसभेत पहिल्यांदाच 85 वर्ष आणि त्याहून अधिक वयोवृद्ध व्यक्ती तसेच दिव्यांग व्यक्तींना प्रथमच घरुन मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदान अधिकारी बॅलेट बॉक्स घेऊन या व्यक्तींच्या घरी जात होते.
- सर्वसाधारणपणे ईव्हीएम ची मतमोजणी सुरु होण्यापूर्वीच टपालाद्वारे झालेल्या मतदानाची मोजणी पूर्ण केली जाते मात्र आता ज्या मोजणी केंद्रावर पोस्टल मतदानाची मोजणी होत आहे तिथेच ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटमधील मतांच्या मोजणीचा दुसरा आणि अंतिम टप्पा हा पोस्टल बॅलेटची मोजणी पूर्ण झाल्यानंतरच सुरू केला जाईल असे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.
- मतदानाच्या दिवशी मतदारांच्या सोईसाठी मतदान केंद्रांवर मोबाईल जमा करण्याची सुविधा. गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने प्रत्येक मतदान केंद्रावर जास्तीतजास्त 1200 मतदार.
- वेगवेगळ्या व्यक्तींसाठी एकच इपिक(EPIC) क्रमांक असण्याची समस्या समाप्त करण्यात आली.
- मतदार माहिती पत्रिकेच्या रचनेत बदल. मतदार क्रमांक आणि भाग क्रमांक ठळकपणे दिसतो. उमेदवारांची छायाचित्र स्पष्टपणे ओळखू यावीत यासाठी ईव्हीएम वर आता उमेदवारांचे रंगीत फोटो असतील.
- नोंदणीविषयक अटींचे पालन न केल्याबद्दल निवडणूक आयोगाने आतापर्यंत 808 नोंदणीकृत मात्र राजकीय पक्ष म्हणून मान्यता नसलेल्या पक्षांना यादीतून हटवलं आहे.
- बूथ पातळीवर अधिकाऱ्यांना मानक ओळख पत्र जारी करण्यात आले आहे. त्यांचे मानधन दुप्पट करण्यात आले आहे. बीएलओ पर्यवेक्षक, मतदान / मतमोजणी कर्मचारी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, देखरेख पथक आणि सूक्ष्म निरीक्षकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या स्थापनदिनानिमित्त दरवर्षी 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो. यामध्ये देशातील राजकीय पक्ष, परदेशी प्रतिनिधींच्या सहभागाने निवडणूक आयोगाच्या वतीने एका समारंभाचे आयोजन केले जाते. या समारंभात सहभागी झालेले परदेशी प्रतिनिधी नेहमीच भारतीय निवडणूक आयोग, निवडणूक प्रणाली आणि निवडणूक व्यवस्थापन प्रक्रियेची भरभरून प्रशंसा करतात.

**मनोरंजक निवडणूक किस्से**

## १९५२ मध्ये फुलांनी सजवलेल्या मतपेट्या सापडल्या

देशात 1952 मध्ये ज्यावेळी पहिल्यांदाच मतदान झाले होते तेव्हा बॅलेट पेपर च्या साहाय्याने झालेल्या मतदानानंतर मतपत्रिका ठेवलेल्या मतपेट्यांमधील काही मतपेट्या फुलांनी सजवण्यात आल्या होत्या तर काहींना कुंकुमार्चन करण्यात आले होते. यावरुन हे दिसून येते की या निवडणुकीच्या दरम्यान मतपेट्या किंवा मतपत्रिकांना पूजनीय मानले जात असे. याशिवाय अनेक मतपेट्यांमध्ये मतपत्रिकेंसोबत इतर अनेक वस्तू आढळल्या होत्या, ज्यामध्ये शुभेच्छा देणारी पत्रे, चित्रपट तारकांचे फोटो, नाणी आणि चलनी नोटा होत्या.



# लोकशाहीच्या उत्सवात तंत्रज्ञानामुळे आली पारदर्शकता

*मतदारांसाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करण्यासोबत निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाने अनेक तांत्रिक उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. यामुळे मतदान प्रक्रिया अधिक सुलभ, सुटसुटीत आणि विश्वासार्ह झाली आहे..*



- निवडणूक प्रक्रियेत नागरिकांचा व्यापक सहभाग आणि पारदर्शकतेसाठी निवडणूक आयोगाने आयटी ॲप्लिकेशनचा वापर वाढवला आहे.

- निवडणुकांचा निकाल घोषित झाल्यानंतर ईव्हीएमची मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरची पडताळणी आणि सत्यापित प्रक्रियेसाठी तांत्रिक आणि प्रशासकीय मानक कार्य प्रणाली तयार करण्यात आली.



- मतदारसंघ स्तरावर निवडणुकीशी संबंधित माहितीचे संकलन जलद गतीने करण्याच्या उद्देशाने इंडेक्स कार्ड आणि सांख्यिकीय अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली आहे.

- **ECINET प्लॅटफॉर्म:** एकात्मिक डिजिटल **ECINET** प्लॅटफॉर्म सुरु करण्यात आला आहे, यामध्ये मतदार आणि इतर संबंधितांसाठी 40 पेक्षा अधिक ॲप आणि संकेतस्थळे एकत्र उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.




- मतदान प्रक्रियेवर सातत्यपूर्ण देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने सर्व मतदान केंद्रांवर 100 टक्के वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.
- अर्ज क्रमांक 17 आणि ईव्हीएम च्या आकडेवारीत कोणत्याही प्रकारे तफावत आढळल्यास प्रत्येक प्रकरणात व्हीव्हीपॅटची मतमोजणी केली जाईल.

- मतदारांच्या मृत्यूच्या आकडेवारीला आयटी ॲप्लिकेशन सोबत संलग्न करण्यात आले असून त्यामुळे निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना नोंदणीकृत मृत्यूंची माहिती वेळच्यावेळी मिळू शकेल.
- नवीन मानक कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे, यानुसार मतदार याद्यांमध्ये नाव समाविष्ट झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत ईपीआयसी कार्डांचे वितरण केले जाईल आणि प्रत्येक टप्प्यावर एसएमएस द्वारे माहिती दिली जाईल.

## आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारींसाठी सी व्हिजिल ॲप्लिकेशन




**सुविधा पोर्टल:** हे पोर्टल ऑनलाईन नामनिर्देशन, परवानग्या इत्यादींसाठी उमेदवार आणि राजकीय पक्षांना खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या सुविधा पुरवतात:

- उमेदवारांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी शपथपत्रे दाखल करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले आहे.




- **परवानगी मॉड्यूल:** सुविधा पोर्टलच्या परवानगी मॉड्यूलद्वारे, उमेदवार, राजकीय पक्ष किंवा उमेदवाराचा कोणताही प्रतिनिधी सभा, रॅली, लाऊडस्पीकर, तात्पुरती कार्यालये इत्यादींसाठी ऑनलाइन परवानगीसाठी अर्ज करू शकतो.

- उमेदवारांच्या गुन्हेगारी रेकॉर्डच्या स्थितीची माहिती देण्यासाठी निवडणूक आयोगाने नो युअर कॅन्डिडेट ॲप विकसित केले आहे.



- **मतदार सेवा पोर्टलः** (**https://voters.eci.gov.in/**) मतदार याद्या पाहणे, मतदार ओळखपत्रांसाठी अर्ज करणे, ऑनलाइन दुरुस्त्यांसाठी अर्ज करणे, बूथ लेव्हल ऑफिसर्स, निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक शोधणे अशा प्रकारची कामे मतदार हेल्पलाइन मोबाईल ॲप वापरून फोनवरून करता येतात.






- **दिव्यांग व्यक्ती (सक्षम) ॲप्लिकेशन ॲप :** सक्षम ॲप हे दिव्यांग व्यक्तींसाठी आहे.

- **राष्ट्रीय तक्रार सेवा पोर्टल (एनजीएसपी)** हे एक राष्ट्रीय तक्रार सेवा पोर्टल आहे या पोर्टलच्या माध्यमातून नागरिक **https://voters.eci.gov.in** या लिंकचा वापर करून सेवेचा लाभ घेऊ शकतात.



- **एकात्मिक निवडणूक खर्च देखरेख प्रणाली (आईईएमएस):** हा एक वापरकर्ता-अनुकूल, सुरक्षित ऑनलाइन प्लॅटफॉर्म असून यामुळे राजकीय पक्षांना योगदान अहवाल, वार्षिक लेखापरीक्षण खाती, निवडणूक खर्च इत्यादी कागदपत्रे ऑनलाइन सादर करणे शक्य होते.



- निवडणूक अधिकारी मतदार टर्नआउट ॲपचा वापर करुन लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांमधील प्रमाणित मतदानाची नोंद करतात.
- निवडणूक अधिकाऱ्यांनी निकाल वेबसाइट आणि निकालांच्या प्रवाहासंबंधी प्रविष्ट केलेला मतदान मोजणी डेटा 'आयोगाच्या निकाल वेबसाइट' वर उपलब्ध असतो.

**मनोरंजक निवडणूक किस्से**

## सियाचीन हिमशिखरांवर पाच मतदारांसाठी मतदान केंद्र

सियाचीन बेस कॅम्पपासून फक्त 17 किलोमीटर अंतरावर असलेल्या लडाखच्या एका दुर्गम भागात, वारशी येथे एकाच कुटुंबातील फक्त पाच मतदारांसाठी एक मतदान केंद्र उभारण्यात आले होते. सियाचीनच्या उंच शिखरांवरील चौक्यांपेक्षा अगदी आधीचे हे शेवटचे गाव आहे. मतदारांच्या घराशिवाय इतर कोणत्याही कायमस्वरूपी इमारती नव्हत्या, म्हणून मतदान केंद्र एका तंबूत उभारण्यात आले.



*भविष्यातील भारतात तुमच्यासाठी कोणत्या प्रकारच्या संधी उपलब्ध होतील, याची जबाबदारी या काळात देशाची व्यवस्था सांभाळणाऱ्या लोकांवर असेल. त्यामुळे योग्य लोकांची निवड होणे ही जबाबदारी तुम्हा तरुण मतदारांवर आहे. पुढील भारताचे भविष्य उज्ज्वल घडवण्यासाठी मतदान करणे तुमच्यासाठी अत्यावश्यक आहे. म्हणून लक्षात ठेवा, तुमचे एक मत आणि देशाच्या विकासाची दिशा हे दोन्ही एकमेकांशी घट्टपणे जोडलेले आहेत.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्या मार्फत घरोघरी जाऊन गणना केली जाते. सन 1952 मध्ये देशाची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि त्याच वर्षी एसआयआर (विशेष सखोल पुनरीक्षण) करण्यात आले. दुसरे एसआयआर 1957 मध्ये, तिसरे 1961 मध्ये, त्यानंतर 1965-66 मध्ये झाले. 1983- 84 मध्ये, 1987- 89 मध्येही एसआयआर करण्यात आले. त्यानंतर 1992, 1993 आणि 1995 मध्ये झाले. त्यानंतर 2002 आणि 2003 मध्ये एसआयआर झाले. मागील दोन दशकांत कोणतेही विशेष सखोल पुनरीक्षण करण्यात आलेले नाही. त्यामुळे 2003 नंतर थेट 2025-26 मध्ये असे पुनरीक्षण होत आहे.

## निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीबद्दल पहिल्यांदाच कायद्याची निर्मिती झाली

निवडणूक आयुक्तांची नियुक्ती – मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवा अटी आणि पदावधी) विधेयक, 2023 हे 2 मार्च 2023 रोजी मंजूर करण्यात आले. यापूर्वी यासंदर्भात कोणताही कायदा नव्हता; फक्त एका ठराविक व्यवस्थेच्या आधारेच नियुक्त्या केल्या जात होत्या. या बाबीकडे सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले आणि त्यानंतर संसदेनं हा कायदा केला. या देशात तब्बल 73 वर्षे निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. 1950 ते 1979 निवडणूक आयोग एक सदस्यीय होता. पंतप्रधान थेट नियुक्ती करु शकत होते. त्यानंतर निवडणूक आयोग बहुसदस्यीय स्वरूप प्राप्त झाले. म्हणजेच सन 1950 ते 2023 पर्यंत निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीकरता कोणताही कायदा नव्हता. 2023 मध्ये, अनुप बर्नवाल विरुद्ध भारतीय संघ असा एक खटला दाखल करण्यात आला. त्यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की निवडणूक आयुक्तांची नियुक्ती अधिक पारदर्शक असावी. ही सूचना होती, आदेश नव्हता.

### वाढीव पारदर्शकता

## ईव्हीएम-व्हीव्हीपॅटमुळे निवडणूक प्रक्रिया झाली सुलभ, अनेक स्तरांवर पडताळणी शक्य

*इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) आणि व्होटर व्हेरिफिकेशन पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) यांचा वापर आता प्रत्येक मतदान केंद्रावर केला जातो. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट कुठे आणि कोणती बसवली जाणार आहे, यासाठी एक निश्चित प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेनुसार यंत्रांचे रँडम (यादृच्छिक) पद्धतीने वाटप केले जाते. ईव्हीएममध्ये निवडणूक चिन्हे लोड केल्यानंतर 5% ईव्हीएमवर 1,000 मतांचे मॉक मतदान घेतले जाते. या मॉक मतदानास परवानगी देण्याचा अधिकार उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना असतो.*



## 1989 मध्ये ईव्हीएमसाठी कायद्यात बदल

**1982** 1982 मध्ये केरळमधील परावूर पोटनिवडणुकीत प्रथमच ईव्हीएमचा वापर करण्यात आला. मात्र त्यावेळी न्यायालयात आव्हान देण्यात आले, त्यामुळे 1989 पर्यंत ईव्हीएमचा वापर करता आला नाही.

**1989** 15 मार्च 1989 रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ईव्हीएम वापरण्यासाठी कायद्यात बदल केला.

**1998** सन 1998 मध्ये मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली येथे केवळ 16 विधानसभा मतदारसंघांमध्ये ईव्हीएमचा प्रयोग करण्यात आला.

**2002** ईव्हीएमविरोधात याचिका दाखल झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने 2002 मध्ये ईव्हीएमसंदर्भातील कायदेशीर बदल योग्य असल्याचा निर्णय दिला.

**2004** सन 2004 मध्ये प्रथमच संपूर्ण देशभरात ईव्हीएमचा वापर करण्यात आला. तेव्हापासून सातत्याने ईव्हीएमचा वापर होत आहे.






## व्हीव्हीपॅट




ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी GPS असलेले वाहन वापरण्याचे निर्देश राज्यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना 2024 लोकसभा निवडणुकीसाठी दिले गेले होते. निवडणूक सुरू होण्याच्या 90 मिनिटे आधी, प्रत्येक मतदान केंद्रावर 50 मतांचे मॉक मतदान घेतले जाते आणि त्याची पडताळणी केली जाते.

- आरोप-प्रत्यारोपांच्या दरम्यान, निवडणूक आयोगाने पाच वर्षांच्या संशोधनानंतर व्हीव्हीपॅट लागू केले.
- ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मधील तफावतीच्या आरोपांनंतर, निवडणूक आयोगाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट स्लिप पैकी 5% ची तुलना करण्याचा निर्णय घेतला. जेव्हा तुलना केली गेली तेव्हा दोन्ही प्रकरणांमध्ये मते समान होती. राजकीय पक्षाचे एजंट ईव्हीएमआणि व्हीव्हीपॅट निकालांवर स्वाक्षरी करतात.
- यादृच्छिक पद्धतीने निवडलेली व्हीव्हीपॅट स्लिपची मोजणी लॉट द्वारे उमेदवार किंवा त्यांच्या एजंटांच्या उपस्थितीत केली जाते, जेणेकरून कंट्रोल युनिटमधून मिळालेल्या निकालाचे पडताळणी केली जाऊ शकेल.

यावर सरकारने सहमती दर्शवली आणि सांगितले की याबाबत सर्व संबंधितांशी विचारविनिमय करावा लागेल, ज्याकरता थोडा वेळ लागेल. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, जोपर्यंत कायदा तयार होत नाही, तोपर्यंत एक समिती स्थापन करण्यात यावी, ज्यामध्ये पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विरोधी पक्षनेते हे सदस्य असतील. यास केंद्र सरकारने सहमती दिली. त्यानंतर 2023 मध्ये संसदेनं कायदा केला, ज्यामध्ये विरोधी पक्षनेते, पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेले मंत्री आणि स्वतः पंतप्रधान यांच्या चर्चेद्वारे मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली जाईल.

रोचक
चुनावी किस्से

## कारगिलमध्ये हेलिकॉप्टरने मतदान पथके आणि साहित्य पोहोचले

कारगिल जिल्ह्यातील झांस्कर उपविभागातील रालकांग, फेमा आणि शेड मतदान केंद्रे उंचावर आहेत आणि भूस्खलन होण्याची शक्यता असते, जिथे वाहतूक करणे खूप कठीण आहे. हे लक्षात घेता, 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी सुरक्षा कर्मचारी आणि सूक्ष्म निरीक्षकांसह मतदान पथकांना वाहून नेण्यासाठी हवाई दल आणि लष्कराने हेलिकॉप्टर तैनात केले. निवडणुका पूर्ण झाल्यानंतर, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटसह संपूर्ण यंत्रणा हेलिकॉप्टरने मतमोजणी केंद्रावर नेण्यात आली.



*मी सर्व पात्र मतदारांना—ते पुरुष असोत वा स्त्रिया—आपल्या मतदानाच्या हक्काचा वापर करण्याचे आवाहन करतो. तसेच माझ्या तरुण मित्रांना विनंती करतो की त्यांनी 18 वर्षे पूर्ण होताच मतदार म्हणून नोंदणी करावी.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## भारत - लोकशाही प्रक्रियेचा मार्गदर्शक

आपल्या लोकशाहीची भव्यता आणि वैविध्य ही अभिमानाची बाब आहे. लोकशाहीच्या या वैभवशाली प्रवासात निवडणूक आयोगाची महत्त्वाची भूमिका आहे. निवडणूक आयोगाच्या मार्फत आतापर्यंत 18 सर्वसाधारण निवडणुका आणि 400 पेक्षा अधिक विधिमंडळाच्या निवडणुका पार पाडल्या गेल्या आहेत. सन 2024 च्या निवडणुकीच्या दरम्यान 10 लाखांहून अधिक मतदान केंद्रावर सुरक्षारक्षक, मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह सुमारे दीड कोटी लोकांनी सक्रिय सहभाग

> निवडणुकीचे पर्व देशासाठी अभिमानाची बाब झाली आहे. ते अधिक प्रभावी करण्यासाठी, शिक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने निवडणूक आयोगाने अभ्यासक्रमात निवडणूक साक्षरतेचा समावेश केल्याने विद्यार्थ्यांना नागरिकत्वाच्या अत्यंत महत्त्वाच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात यश येईल कारण तरुण हे भारतीय लोकशाहीचे भविष्यातील नेते आहेत.

नोंदवला. या निवडणुकीत सुमारे 65 कोटी लोकांनी आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर केला. या आकड्याच्या भव्यतेचा अंदाज यावरून लावता येऊ शकेल की युरोपियन युनियनच्या 27 देशांची एकूण लोकसंख्या सुमारे 44 कोटी आहे. भारत आता एक देश एक निवडणूक या प्रणालीच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. या संदर्भात सप्टेंबर 2023 मध्ये माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या एक राष्ट्र एक निवडणूक समितीने सादर केलेल्या अहवालावर केंद्रीय मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे.

नित्य नवीन बदलांना आत्मसात करत एक नवीन अध्याय रचणाऱ्या भारतीय निवडणूक आयोगाच्या वाढत्या प्रभावाची फलश्रुती म्हणजे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार

**विशेष सखोल फेरतपासणी**

### योग्य माहिती आणि विश्वासार्हतेची खात्री

*मतदार याद्यांची सत्यता, योग्य माहिती आणि विश्वसनीयतेची खात्री करणे हा विशेष सखोल फेरतपासणीचा उद्देश आहे. ज्यावेळी निवडणूक आयोगाला असे जाणवते की आता मतदार याद्यांचे संपूर्णपणे परत एकदा परीक्षण करणे आवश्यक आहे, त्यावेळी विशेष सखोल फेरतपासणी केली जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 ते 2004 दरम्यान आठ वेळा विशेष सखोल फेरतपासणी करण्यात आली आहे. अशी मोहीम गेल्या दोन दशकांपासून हाती घेण्यात आली नव्हती आणि वर्ष 2025 मध्ये बिहारपासून या मोहिमेला सुरुवात झाली. एसआयआरची अंमलबजावणी स्पष्टपणे परिभाषित प्रक्रिया, निश्चित कालावधी आणि टप्प्याटप्प्याने केली जात आहे...*

गेल्या दोन दशकांमध्ये मतदार याद्यांमध्ये खूप प्रकारचे बदल झाले. लोकांनी आपले निवासस्थान बदलले, एकाच व्यक्तीचे नाव अनेक ठिकाणी दाखल करण्यात आले आहे, मृत व्यक्तींची नावे हटवण्यात आलेली नाहीत, अपात्र लोकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली. मतदार याद्यांच्या दर्जावर अनेक वेळा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आल्याने विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेची आवश्यकता जाणवली.

राज्यघटनेच्या कलम 326 द्वारे एसआयआर पात्रता काटेकोरपणे निश्चित केली जाते. मतदार हा भारतीय नागरिक असावा, त्याचे वय 18 वर्षे पूर्ण झालेले असावे, तो संबंधित क्षेत्राचा सामान्य रहिवासी असावा आणि कोणत्याही कायद्यानुसार त्याला अपात्र ठरवले जाऊ नये.


देशभरात विशेष सखोल फेरतपासणी अभियानाला 28 ऑक्टोबर 2025 पासून सुरुवात झाली आणि ते 7 फेब्रुवारी 2026 पर्यंत पूर्ण करायचे आहे. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात 12 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. या अभियानामुळे मतदारयाद्या अचूक होतील आणि देशात स्वतंत्र, निष्पक्ष आणि विश्वासार्ह निवडणुकांचा पाया अधिक मजबूत होईल.



अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्यात आली ज्यामध्ये कुठल्याही प्रकारचे अपील नोंदवण्यात आले नाही. निवडणूक आयोगाच्या मते यामुळे वैधानिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दुसऱ्या टप्प्यात अंदमान आणि निकोबार द्वीप समूह ,छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या टप्प्यात सुमारे 51 कोटी मतदारांचा समावेश आहे. या टप्प्यात 5.33 लाख मतदान केंद्रे उभारण्यात आली, जिथे बीएलओ आपली जबाबदारी पार पाडत आहे.

## आठ वेळा एसआयआर करण्यात आले

| | |
|---|---|
| पहिले | 1952-56 |
| दुसरे | 1957-61 |
| तिसरे | 1965-66 |
| चौथे | 1983-84 |
| पाचवे | 1987-89 |
| सहावे | 1992-93 |
| सातवे | 1995 |
| आठवे | 2002-04 |



## "एक व्यक्ती एक मत" हे तत्व झाले मजबूत

- आतापर्यंत जिथे जिथे एसआयआर करण्यात आले आहे, तिथे नवीन मतदार जोडले गेले आहेत. मृत आणि कायमस्वरूपी स्थानांतरित मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.
- मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनवण्यात आली.
- यामुळे 'एक व्यक्ती, एक मत' हे तत्व मजबूत होते आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास वाढतो.

## काय आहे प्रक्रिया

- या प्रक्रियेत सर्वात महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की गरज पडल्यास बीएलओ ला किमान तीन वेळा घरी भेट द्यावी लागते जेणेकरून गणनेचे अर्ज वितरित आणि एकत्र करता येऊ शकतील, जुन्या एसआयआर नोंदींशी त्या पडताळून घेता येतील.
- मृत्यू, कायमस्वरूपी स्थानांतरण किंवा एक हून अधिक ठिकाणी नाव नोंदले जाणे यासारख्या बाबी लक्षात येऊ शकतील.
- या संपूर्ण प्रक्रियेत निवडणूक नोंदणी अधिकारी (ईआरओ ), सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (एईआरओ), जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांद्वारे नियुक्त बुथ स्तरीय एजंट यांचा समावेश असतो.
- एसआयआर मध्ये घरोघरी जाऊन पडताळणी केली जाते. प्रत्येक मतदान केंद्राचा बूथ स्तरीय अधिकारी मतदाराच्या घरी जाऊन गणना अर्ज देतो आणि भरून घेतो.
- जुन्या नोंदीशी पडताळणी केली जाते आणि मृत्यू, कायमस्वरूपी स्थानांतरण किंवा एक हून अधिक ठिकाणी नाव नोंदणी होणे अशी प्रकरणे चिन्हांकित केली जातात. विवरणाची अनेक स्तरांवर पडताळणी केली जाते .
- त्यानंतर प्रारंभिक यादी प्रकाशित होते. असहमती असल्यास जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे पहिले अपील आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे दुसऱ्यांदा अपील करण्याची कायदेशीर व्यवस्था यामध्ये आहे.

यांनी सन 2026 साठी आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक सहाय्य संस्था (इंटरनॅशनल आयडीईए) च्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. हे अध्यक्षपद एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे, जी केंद्रीय निवडणूक आयोगाला जगातील सर्वात विश्वसनीय आणि अभिनव निवडणूक व्यवस्थापन संस्था (ईएमबी) मधील एक म्हणून जागतिक मान्यता प्रदान करते . इंटरनॅशनल आयडीईएच्या सदस्य देशांच्या परिषदेचा संस्थापक सदस्य या नात्याने भारताने संघटनेच्या शासन, लोकशाही संवाद आणि संस्थात्मक उपक्रमांमध्ये सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. संविधान निर्मात्यांद्वारे दाखवण्यात आलेला विश्वास निरंतर वाढत

*भारतात ज्या प्रमाणात निवडणुकांचे आयोजन होते, ते पाहून जगातील लोकांना आश्चर्य वाटते. आपला निवडणूक आयोग ज्या कौशल्याने याचे आयोजन करतो ते पाहून प्रत्येक देशवासीयांना निवडणूक आयोगाचा अभिमान वाटणं स्वाभाविक आहे. आपल्या देशात हे सुनिश्चित करण्यात कोणतीही कसर सोडली जात नाही की भारताचा प्रत्येक नागरिक, जो एक नोंदणीकृत मतदार आहे, त्याला मतदान करण्याची संधी मिळेल.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आहे.

भारत जगातील त्या देशांपैकी एक आहे, जिथे निवडणूक आयोग लोकांना नोटीस जारी करू शकतो अधिकाऱ्यांची बदली करू शकतो. असे अधिकार अनेक लोकशाही देशांच्या निवडणूक आयोगांकडे देखील नाहीत. म्हणूनच भारताचा निवडणूक आयोग, निवडणूक प्रक्रिया अनेक देशांसाठी एका मापदंड प्रमाणे आहे. जगभरात लोकशाहीला बळकटी देण्याचे प्रशंसनीय प्रयत्न लक्षात घेऊन सप्टेंबर 2020 मध्ये भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना असोसिएशन ऑफ वर्ल्ड इलेक्शन बॉडीजचे अध्यक्षपद देण्यात आले. स्वातंत्र्य मिळवल्यानंतर सात दशकांच्या आतच भारत लोकशाहीच्या विश्वव्यापी आदर्शाला पोषक म्हणून उदयाला आला आहे. या उल्लेखनीय कामगिरीत निवडणूक आयोगापासून ते देशातील छोट्या छोट्या गावांमधील सामान्य नागरिकांचे अमूल्य योगदान आहे. भारताच्या प्रत्येक घटनात्मक संस्थेने निवडणूक आयोगाची प्रतिष्ठा जपली आहे. भले तो कोणताही राजकीय पक्ष असो, त्याने नेहमीच निवडणूक आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील, आपल्या न्यायालयानी देखील, प्रत्येकाने निवडणूक आयोगाला नेहमीच आपले समर्थन दिले आहे. त्यांनी हे सुनिश्चित केले आहे की निवडणूक आयोगाच्या आदेशांचे निवडणूक प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण येऊ नये . पूर्वीच्या

**न्यायपालिका**

## निर्णयांमुळे घडून आल्या अनेक परिवर्तनात्मक सुधारणा

*तसं पाहिलं तर निवडणूक आयोग देशात स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुकांचा घटनात्मक संरक्षक आहे. मात्र संविधानात मौन राहिलेल्या तरतुदींमध्ये मतदानाचा अधिकार मजबूत करणाऱ्या अनेक ऐतिहासिक परिवर्तनात्मक सुधारणा न्यायपालिकेच्या माध्यमातून समोर आल्या आहेत. न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की मतदानाचा अधिकार केवळ कायदेशीर अधिकार नाही तर संविधानाच्या कलम 19(1) (a ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे एक महत्त्वपूर्ण रूप आहे...*


### उमेदवारांच्या पार्श्वभूमीचा खुलासा (प्रतिज्ञापत्र)

देशात 2002 पूर्वी मतदारांना उमेदवारांच्या पार्श्वभूमीशी संबंधित माहिती उपलब्ध होत नव्हती. तेव्हा एका प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने हे आदेश दिले की निवडणूक लढणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला एक प्रतिज्ञापत्र दाखल करणे अनिवार्य असेल ज्यामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी, स्वतः , जोडीदार आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांची मालमत्ता आणि देणी , शैक्षणिक पात्रता याबाबत माहिती द्यावी लागेल. यामुळे मतदारांना जात आणि पक्ष व्यतिरिक्त उमेदवारांचा प्रामाणिकपणा आणि क्षमतेबाबत माहिती मिळायला सुरुवात झाली. नेत्यांच्या संपत्तीमधील असामान्य वाढीवर देखरेख ठेवणं शक्य झाले .ज्यामुळे पारदर्शकता वाढली.



**1952 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानामध्ये 27 हजार 527 मतदान केंद्रे महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आली होती.**

## 'यापैकी कोणीही नाही' म्हणजेच नोटा




2013 मध्ये पीयूसीएल (पीपल्स यूनियन फॉर सिविल लिबर्टीज ) विरुद्ध भारत संघराज्य (**Union of India**) प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मतदार अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये सर्व उमेदवारांना नाकारण्याचा अधिकार देखील समाविष्ट आहे . न्यायालयाने निवडणूक आयोगाला ईव्हीएम मध्ये नोटा बटण देण्याचे निर्देश दिले . यापूर्वी जर एखाद्या मतदाराला मत द्यायचे नसेल तर त्याला फॉर्म 17 ए भरावा लागत होता, यामुळे त्याची ओळख उघडकीस येत होती.

## दोषी लोकप्रतिनिधी तत्काळ अपात्र



लिली थॉमस विरुद्ध भारत संघ (2013) प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधी कायदा 1951 चे कलम 8(4) रद्द केले. यापूर्वी या तरतुदी अंतर्गत दोषी खासदार किंवा आमदार अपील दाखल करून तीन महिन्यांपर्यंत पदावर राहू शकत होते. मात्र आता दोन वर्ष किंवा त्याहून अधिक शिक्षा झाल्यास त्वरित अपात्र ठरवण्यात येतात. राजकारणातील गुन्हेगारी विरोधात हे ठोस पाऊल आहे. यामुळे हे देखील निश्चित झाले की कायदा तोडणारे कायदे बनवणारे असू शकत नाहीत. कायद्यासमोर राजकीय नेते आणि सामान्य नागरिक एकसमान आहेत .

## व्हीव्हीपॅट (VVPAT) प्रणाली

वर्ष 2013 मध्ये निष्पक्ष निवडणुकीसाठी मतदाराचा विश्वास आवश्यक मानत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम बरोबरच व्हीव्हीपॅट प्रणाली लागू करण्याचे निर्देश दिले. यामुळे मतदार सात सेकंदापर्यंत चिठ्ठी पाहून पुष्टी करू शकतो की त्याचे मत योग्य उमेदवाराला गेले आहे.




मनोरंजक
निवडणूक किस्से

### एका मतासाठी 18 किलोमीटर अंतर पार करून पोहोचले मतदान कर्मचाऱ्यांचे पथक

निवडणूक आयोगाने 2024 च्या लोकसभा निवडणुकीत 85 वर्षाहून अधिक आणि दिव्यांग मतदारांसाठी 'घरून मतदान' ही सुविधा सुरू केली . या अंतर्गत केरळच्या इडुक्की लोकसभा मतदारसंघातील एडामलकुडी मधील अंथरुणावर खिळून असलेल्या एका 92 वर्षे वयाच्या वृद्ध नागरिकांनी अर्ज केला .मतपत्रिकेवर त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी तीन महिलांसह मतदान कर्मचाऱ्यांच्या पथकाने घनदाट जंगलातून चालत 18 किलोमीटर प्रवास केला, ज्यासाठी सुमारे पाच तास लागले.



काळात वेगवेगळ्या उमेदवारांच्या नावाने वेगवेगळे रंगातील चौकोन असायचे, ज्यामध्ये लोक मतदान करायचे. पूर्वी सार्वत्रिक निवडणुकीत असे देखील झाले आहे की मतपेटी वेगवेगळ्या रंगाची होती. प्रत्येक उमेदवार आणि पक्षाचे चिन्ह असायचे. त्या काळातून

*आपल्या देशात एक अतिशय महत्त्वपूर्ण संस्था आहे जी आपल्या लोकशाहीचा अविभाज्य भाग तर आहेच आणि आपल्या प्रजासत्ताकाहूनही अधिक जुनी आहे - 25 जानेवारी रोजी निवडणूक आयोगाचा स्थापना दिन असतो, जो 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून साजरा केला जातो. मी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त तुम्हा सर्वांना शुभेच्छा देतो. निवडणूक आयोगाच्या लोकशाहीतील महत्त्वपूर्ण भूमिकेला मी सलाम करतो. निवडणूक लोकशाहीचा उत्सव असतो. तो लोकांच्या इच्छा जाहीर करतो जे लोकशाहीत सर्वोपरी आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

बाहेर पडत आज भारतात ईव्हीएम च्या मदतीने मतदान होते. एक काळ होता मतदानानंतर मतमोजणी अनेक दिवस चालायची. मात्र आता ईव्हीएमच्या मदतीने काही तासांमध्येच निकाल जाहीर होतात.

निवडणुकीत मत देणे हे प्रजासत्ताकात यज्ञाप्रमाणे आहे जिथे प्रत्येक मत आहुती समान आहे. हे आयोजन आपणा सर्व भारतवासीयांना आपल्या देशाप्रती कर्तव्याची जाणीव करून देते की प्रत्येक मत आवश्यक आहे आणि प्रत्येक वयस्कर नागरिकांसाठी मतदान करणे आवश्यक आहे. लोकशाहीचे प्रतीक भारतीय संविधानात स्वतंत्र निवडणूक आयोग आणि निवडणूक प्रक्रियेची संकल्पना समानता आणि स्वातंत्र्याच्या अधिकारासह प्रत्येक व्यक्तीचे मत महत्त्वपूर्ण बनवते. यामुळेच भारतीय लोकशाही संपूर्ण जगात आपली परिपक्वता आणि स्थैर्यासाठी ओळखली जाते. याचे संपूर्ण श्रेय भारतीय मतदाराला जाते आणि मतदाराला आपल्या संविधानाने हे अधिकार दिले आहेत. भारताची राजकीय व्यवस्था आणि प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय मतदारांनी संविधान

## मिथक/सत्य

**मिथक:** **हरियाणाच्या एकाच घरातून 500 मते पडली**

**सत्य:** निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की घर क्रमांक 265 हे काही छोटं घर नाही . एक एकरच्या प्राचीन वडिलोपार्जित जमिनीवर अनेक कुटुंबे राहत आहेत. तिथे देखील प्रत्येक कुटुंबातील घरांची संख्या दिलेली नाही . सर्व ठिकाणी घर क्रमांक 265 हेच नमूद केले आहे. एकाच कुटुंबाच्या तीन पिढ्या एकत्र राहू शकतात.

**मिथक:** **बिहारमध्ये एका मतदाराचे वय 124 वर्ष,** सुबोध कुमार बीएलए यांचे नाव कधीही यादीत आले नाही, रंजू देवी यांचे नाव घेऊन जबरदस्तीने वगळण्यात आले.

**सत्य:** बिहारच्या मतदार मिनता देवी यांचे वय 34 वर्ष आहे, मात्र मिनता देवी यांनी स्वतः सांगितले आहे की त्यांनी ऑनलाईन अर्ज केला होता, ज्यामुळे 124 वर्ष छापले गेले. सुबोध कुमार बीएलए यांचे नाव मतदार यादीत नसल्याची माहिती चुकीची आढळली. रंजू देवी यांनी मान्य केले आहे की त्यांनी चुकीची माहिती दिली होती.



# आंतरराष्ट्रीय आयडीईएच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून स्वीकृती संबोधन


***जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाहीतील मान्यवर व्यक्ती, स्त्री आणि पुरुषगण***

- *मी भारतीय आहे आणि म्हणून मी तुम्हाला भारताबद्दल सांगून सुरुवात करेन.*
- *भारत लोकशाहीची जननी आहे आणि आज ती जगातील सर्वात मोठी लोकशाही देखील आहे.*
- *भारतीय निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे आणि ती आपली घटनात्मक जबाबदारी म्हणून राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, संसद, विधानसभा आणि विधान परिषदांच्या निवडणुका घेते.*
- *भारतातील 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांमधील 90 कोटींहून अधिक मतदारांसह, भारतीय निवडणूक आयोगाकडे पारदर्शकपणे निवडणुका घेण्याचा आणि पात्रतेनुसार अचूक मतदार याद्या तयार करण्याचा जवळपास 75 वर्षांचा अनुभव आहे.*
- *लोकसभा निवडणुका आयोजित करून, भारतीय निवडणूक आयोग 90 लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसह जगातील सर्वात मोठी संस्था बनली आहे.*
- *आज, प्रत्येक भारतीयाला आंतरराष्ट्रीय आयडीईएच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचा अध्यक्ष म्हणून या प्रतिष्ठित पदावर भारत विराजमान झाल्याचे पाहून गौरवान्वित वाटते, जी एक प्रतिष्ठित संस्था आहे ज्यामध्ये 35 लोकशाही देश आणि 2 पर्यवेक्षक राष्ट्रांचा समावेश आहे.*
- *भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त या नात्याने, मी, ज्ञानेश कुमार, भारतातील सर्व नागरिकांच्या वतीने, सर्व देशांच्या प्रतिनिधींना माझ्या शुभेच्छा देतो आणि आंतरराष्ट्रीय आयडीईएच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारतो.*
- *अध्यक्ष म्हणून, मी तुम्हाला ग्वाही देतो की माझ्या कार्यकाळात, सर्व लोकशाही देशांमधील सहकार्याद्वारे, आम्ही जगभरातील लोकशाही आणि लोकशाही प्रक्रियांमध्ये पारदर्शकता अधिक मजबूत करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी अनुकरणीय पद्धतीने काम करू.*

*जय हिंद, जय भारत*









निर्मात्यांचा हा विश्वास अधिक मजबूत केला आहे. निवडणूक आयोगाने या दिशेने उल्लेखनीय काम केले आहे. त्याचबरोबर निवडणूक आयोगाच्या समावेशक योजनेमुळे मतदान टक्केवारी वाढल्यामुळे मतदारांचा विश्वास अधिक मजबूत झाला आहे. यामुळे आज भारतीय निवडणूक आयोगाची संपूर्ण जगात प्रतिमा उंचावली आहे. या संदर्भात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणतात, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व निष्ठावंत अधिकारी आणि कर्मचारी राष्ट्र- सेवक म्हणवून घेण्यास पात्र आहेत. आपल्या देशाच्या निवडणूक प्रक्रियेला अधिक सक्षम बनवण्यात योगदान देणाऱ्या बिगर सरकारी संस्था देखील प्रशंसनेस पात्र आहेत.

*भारतात जेव्हा पहिल्यांदा 1951- 52 मध्ये निवडणुका झाल्या तेव्हा शंका उपस्थित केली जात होती की लोकशाही जिवंत राहणार नाही. मात्र सर्व शंका चुकीच्या सिद्ध करत लोकशाहीची जननी भारत आज जगासाठी मार्गदर्शक बनत आहे. निवडणूक आयोगाने नित्य नवे प्रयोग आणि आयामाद्वारे बोटांवर लागलेली शाई एक फॅशन स्टेटमेंट बनवली आहे. ही नेहमीच लक्षात ठेवण्यासाठी गोष्ट आहे की लोकशाही सशक्त करण्यासाठी मतदान सर्वात पवित्र दान आहे. निश्चितपणे भारताची लोकशाही जागतिक समुदायासाठी नवीन आदर्श स्थापित करत राहील आणि या प्रवासात देशातील मतदार आणि निवडणूक आयोग, भागीदारी आणि उत्कृष्टतेचे नवे मापदंड स्थापित करत राहतील.*

ग्रामीण भारतात रोजगाराची नवीन हमी

# मनरेगाचा नवा अवतार

## विकसित भारत-जी राम जी विधेयक

*गाव आणि गरीब कल्याणाला केंद्र सरकारचे उच्च प्राधान्य राहिले आहे. त्यांच्यासाठी रोजगार आणि स्वयंरोजगार वाढवण्याच्या दिशेने मागील एका दशकात,अनेक योजना आणि कार्यक्रम सुरू करण्यात आले . याच अनुषंगाने संसदेत विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका अभियान (ग्रामीण) विधेयक 2025 म्हणजेच 'विकसित भारत - जी राम जी ' संसदेत मंजूर करण्यात आले, जे राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर कायद्यात रूपांतरित झाले आहे. हा कायदा गावांचा कायापालट करेल आणि प्रत्येक कुटुंबाला एका आर्थिक वर्षात 125 दिवसांच्या रोजगाराची हमी देखील देईल. यामुळे महात्मा गांधींच्या आत्मनिर्भर आणि विकसित गावाच्या दृष्टिकोनाला बळकटी मिळेल...*

मनरेगाचे नवे स्वरूप 'विकसित भारत -जी राम जी विधेयक 2025 ' ही केवळ एक रोजगार योजना नाही तर ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनवण्याची एक विस्तृत रूपरेषा आहे. मनरेगामधून मिळालेल्या अनुभवातून शिकत सरकारला एक अशी व्यवस्था तयार करायची आहे , जी रोजगारासह ग्रामीण भागात शाश्वत विकास आणि उपजीविकेची साधने बळकट करेल. कारण विकसित भारत @ 2047 चा उद्देश साध्य करण्यासाठी ग्रामीण विकासात एका परिवर्तनात्मक दृष्टिकोनाची गरज आहे. म्हणूनच एका वित्तीय वर्षात ग्रामीण कुटुंबांसाठी मजुरी रोजगार हमी वार्षिक 100 दिवसांवरून वाढवून 125 दिवस करण्यात आली आहे. या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण विकास चौकटीला विकसित भारत 2047 च्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी जोडणे हे आहे. हे गरीबी कमी करण्यासाठी आणि गावांमध्ये शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल ठरू शकते.

2005 मध्ये लागू झाल्यापासून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा ( मनरेगा ) ने वेतन रोजगार प्रदान करण्यात, ग्रामीण उत्पन्न स्थिर करण्यात आणि मूलभूत पायाभूत सुविधांच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावली. काळानुरूप , ग्रामीण भारतातील पायाभूत सुविधा आणि उद्दिष्टे यात आमूलाग्र बदल झाला. त्याचबरोबर , वाढते उत्पन्न, वाढलेली कनेक्टिव्हिटी, व्यापक स्तरावर डिजिटल पोहोच आणि विविध प्रकारच्या उपजीविकांनी ग्रामीण रोजगाराच्या गरजांचे स्वरूप पालटून टाकले. याचसाठी केंद्र सरकारने संसदेत विकसित भारत-रोजगार आणि उपजीविका अभियान ( ग्रामीण ) विधेयक,2025 सादर केले. या विधेयकाअंतर्गत मनरेगामध्ये व्यापक वैधानिक बदल करून हे सादर केले आहे जे उत्तरदायी, पायाभूत सुविधांचे परिणाम आणि उत्पन्न सुरक्षा यांना बळकटी प्रदान करते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 21 डिसेंबर रोजी विकसित भारत -जी राम जी विधेयक, 2025 ला मंजुरी दिली.



# ग्रामीण रोजगाराचे चार स्तंभ मजबूत करतील पायाभूत सुविधा

सक्षमीकरण,विकास,अभिसरण आणि संपृक्तता या तत्त्वांवर आधारित,विकसित भारत - जी राम जी कायदा समृद्ध,सक्षम आणि स्वावलंबी ग्रामीण भारताचा पाया मजबूत करेल.ग्रामीण भागातील कुटुंबांची उत्पन्न सुरक्षा सुदृढ होईल,त्याचबरोबर प्रशासन आणि उत्तरदायित्वाला आधुनिकीकरणाची जोड मिळेल.सर्वात महत्त्वाचे म्हणजे,नवीन कायद्यात रोजगाराचे चार स्तंभ निश्चित आहेत,जे ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करतील.यामुळे समृद्ध आणि सक्षम ग्रामीण भारताचा पाया आणखी मजबूत होईल.

1



### जल सुरक्षा आणि पाण्याशी संबंधित कामे

सिंचन, जलसंचयांचे पुनर्संचयितीकरण,वृक्षारोपण, कालवे, पूराचे पाणी वाहून नेणारे जलमार्ग, भूमिगत धरणांचे बांधकाम,तलाव,विहिरींचे बांधकाम,सामुदायिक जलभरण जमिनीची सुधारणा,छतावरील पाणी साठवण यांचा समावेश आहे.

2



### मुख्य ग्रामीण पायाभूत सुविधा

शिक्षण,आरोग्य,पिण्याचे पाणी,स्वच्छता,अक्षय ऊर्जा,ग्रामीण रस्ते,ग्रामपंचायत इमारती,शाळांमधील अतिरिक्त खोल्या किंवा आवार,अंत्यसंस्कार विधींची सोय,ग्रामीण वाहनतळ,वाहतूक शेड आणि जल जीवन मिशनची कामे अशा सामुदायिक पायाभूत सुविधा.

3



### उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा

ग्रामीण बाजार,आठवडी बाजार,अन्न आणि कृषी साठवणूक,रोपवाटिका शेतीला प्रोत्साहन,बांधकाम साहित्याचे उत्पादन यासह शेती,पशुधन,मत्स्यव्यवसाय,कौशल्य विकास,उद्योग विकास.

4



### हवामानाशी संबंधित घटनांचा प्रभाव कमी करणारी कामे


आपत्तीची जोखीम कमी करणे, हवामान अनुकूलन, चक्रीवादळ आणि पूर परिस्थितीत निवारा, पूर व्यवस्थापनासाठी तलाव आणि पाण्याच्या संरचनेचे बांधकाम. केंद्र सरकारने अधिसूचित केलेली कोणतीही सार्वजनिक कामे. पंतप्रधान आवास योजना आणि स्वच्छतेशी संबंधित कामे.

## मनरेगाच्या पुढचे पाऊल : विकसित भारत जी राम जी

विकसित भारत-जी राम जी योजना ही मनरेगापेक्षा एक पाऊल पुढे असल्याचे केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे.आता 100 नाही तर 125 दिवसांच्या कामाची कायदेशीर हमी आहे. काम न मिळाल्यास बेरोजगार भत्त्याची तरतूद आणखी सक्षम करण्यात आली आहे.मजुरी विलंबाने मिळाल्यास अतिरिक्त भरपाई देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.एवढेच नाही तर या वर्षी या योजनेसाठी 1,51,282 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम प्रस्तावित आहे.विकसित भारतासाठी विकसित गावे,स्वावलंबी गावे तसेच दारिद्र्यमुक्त आणि रोजगार समृद्ध गावे निर्माण करण्यासाठी,जलसंधारण,गावात पायाभूत सुविधांची कामे,उपजीविकेची कामे आणि नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण करण्यास उपयुक्त कामे हाती घेतली जातील. आणखी एक

## कायद्यातील ठळक मुद्दे

- एका आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांसाठी मनरेगा अंतर्गत 100 दिवसांसाठी असणारी रोजगार हमी नव्या कायद्यात 125 दिवसांपर्यंत वाढवण्यात आली आहे.
- पेरणी आणि कापणीच्या हंगामात शेतीच्या कामांसाठी शेती कामगारांची उपलब्धता सुलभ करण्यासाठी,हा कायदा राज्यांना एका आर्थिक वर्षात एकूण 60 दिवसांचा विराम देण्याचा अधिकार देतो.125 दिवसांचा एकूण रोजगार हक्क कायम राहील.
- राज्य शासन या कायद्याअंतर्गत तयार केलेल्या योजनेचा सारांश दोन वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करेल, अटी आणि शर्ती नमूद करेल.
- केंद्र सरकार या कायद्यांतर्गत नवी मजुरी अधिसूचित करत नाही तोपर्यंत,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 अंतर्गत अधिसूचित केलेल्या सध्याच्या मजुरीपेक्षा कमी मजुरी दिली जाणार नाही.
- एखाद्या अर्जदाराला पंधरा दिवसांच्या आत रोजगार मिळाला नाही,तर त्याला दैनिक बेरोजगारी भत्ता मिळेल.हा भत्ता राज्य सरकार अधिसूचित करेल,परंतु पहिल्या 30 दिवसांसाठी तो वेतन दराच्या एक चतुर्थांशपेक्षा कमी नसेल.उर्वरित आर्थिक वर्षासाठी,वेतन दर निम्म्यापेक्षा कमी नसेल.
- दैनिक मजुरी आठवड्याला प्रदान केली जाईल,कोणत्याही परिस्थितीत कामाच्या दिवसापासून जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या आत पैसे दिले जातील.
- या कायद्यांतर्गत होणाऱ्या सर्व कामांवर ग्रामसभा देखरेख ठेवेल आणि यासाठी ग्रामपंचायत सर्व कागदपत्रे पुरवेल.
- या कायद्यांतर्गत कामांसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारमधील खर्चाचे प्रमाण ईशान्येकडील राज्ये, हिमालयीन राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश – उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरसाठी 90:10 असेल तर इतर राज्ये आणि विधिमंडळ असलेल्या राज्यांसाठी 60:40 असेल.
- देखरेखीसाठी बायोमेट्रिक प्रमाणीकरण,भू-संदर्भ,उपग्रह प्रतिमा आणि कामांचे डिजिटल मॅपिंग यांचा वापर केला जाईल.मागणी,काम,मजुरांची तैनाती आणि प्रगतीचा वास्तव कालीन मागोवा घेण्यासाठी डॅशबोर्ड-आधारित देखरेख प्रणाली असणारे एक मोबाइल ॲप उपलब्ध असेल.
- तालुका आणि जिल्हा पातळीवर तक्रार निवारण यंत्रणा विकसित केल्या जातील,अशा तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रिया केंद्र सरकार ठरवेल.
- कायद्याचे उल्लंघन केल्यास दहा हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.



*बापूंनी स्वतः रामराज्याचा उल्लेख केला होता.या देशात श्री राम नाम दुमदुमते.कोणत्याही कारणास्तव,जेव्हा व्हीबी-जी राम जी हे नाव समोर आले,तेव्हा काही लोक प्रफुल्लीत झाले. महात्मा गांधींनी स्वतः रामराज्याच्या स्थापनेचा उल्लेख केला होता,त्यांचे शेवटचे शब्द "हे राम" होते.बापूंबद्दल आम्हाला अत्यंत आदर आहे.*

**-शिवराजसिंह चौहान,**
**केंद्रीय कृषी आणि कृषक कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री**

विशेष तरतूद करण्यात आली आहे.प्रशासकीय खर्च 6% वरून 9% पर्यंत वाढवण्यात आला आहे.1,51,282 कोटी रूपये या प्रस्तावित रकमेचे आपण 9% काढले तर अंदाजे 13,000 कोटी रुपये होतात.या रकमेतून कामात सहभागी असलेले सहकारी - पंचायत सचिव,रोजगार सहायक आणि तांत्रिक कर्मचारी यांना वेळेवर पुरेसे वेतन मिळेल, जेणेकरून ते त्यांची कर्तव्ये पूर्ण क्षमतेने पार पाडू शकतील.

### नवीन कायदेशीर चौकटीचे औचित्य

मोठ्या सामाजिक-आर्थिक बदलांसाठी सुधारणांची सतत आवश्यकता असते.2005 साली मनरेगा लागू करण्यात आला होता. मात्र ग्रामीण भारतात आता परिवर्तन घडते आहे.2011-12मध्ये 27.1 टक्के असणारे गरिबीचे प्रमाण 2022-23 मध्ये 5.3 टक्के इतके घटले आहे. वाढत्या उपभोगामुळे आणि उत्तम वित्तीय



# संसदेचे हिवाळी अधिवेशन
## संकल्पापेक्षा जास्त झाले कामकाज

*संसदेच्या हिवाळी अधिवेशनात 15 बैठका झाल्या.लोकसभा आणि राज्यसभेने त्यांच्या नियोजित संकल्पापेक्षा जास्त काम केले (लोकसभेत 111% आणि राज्यसभेत 121% ).अधिवेशनादरम्यान, व्हीबी-जी राम जी विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके सादर करण्यात आली आणि मंजूरही करण्यात आली."वंदे मातरम्" या राष्ट्रीय गीताच्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त संसदेच्या दोन्ही सभागृहात झाली विशेष चर्चा...*

हिवाळी अधिवेशनादरम्यान **राज्यसभा** आणि लोकसभेत गदारोळ असतानाही उत्तम चर्चा झाली.त्याचबरोबर सरकारने अनेक महत्त्वाची विधेयके मांडली,त्यापैकी अनेक विधेयके मंजूर झाली. लोकसभेत दहा विधेयके मांडण्यात आली आणि आठ विधेयके मंजूर झाली,तसेच राज्यसभेनेही आठ विधेयके मंजूर केली.अशाप्रकारे, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकूण आठ विधेयके मंजूर केली.लोकसभा अधिवेशनाचा एकूण बैठकीचा कालावधी 92 तास 25 मिनिटे होता. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वंदे मातरमवर चर्चा सुरू केली,ज्यामध्ये 65 सदस्य सहभागी झाले आणि सदनाचे कामकाज 11 तास 32 मिनिटे चालले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत चर्चा सुरू केली,ज्यामध्ये 81 सदस्य सहभागी झाले आणि या चर्चेमध्ये सदनाचे कामकाज एकूण 12 तास 49 मिनिटे चालले.

याव्यतिरिक्त,निवडणूक सुधारणांबाबत लोकसभेत 9 आणि 10 डिसेंबर रोजी आणि राज्यसभेत 11,15 आणि 16 डिसेंबर 2025 रोजी चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत चर्चेचे समापन केले.चर्चेत 62 सदस्यांनी भाग घेतला.राज्यसभेत 57 सदस्यांनी भाग घेतला आणि चर्चा 10 तास 37 मिनिटे चालली.

### संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेली विधेयके



- ✓ मणिपूर वस्तू आणि सेवा कर (दुसरी सुधारणा)विधेयक, 2025
- ✓ केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक, 2025
- ✓ आरोग्य सुरक्षा उपकर विधेयक, 2025
- ✓ विनियोजन (क्र. 4) विधेयक, 2025
- ✓ निरसन आणि सुधारणा विधेयक, 2025
- ✓ सर्वांसाठी विमा,सर्वांसाठी संरक्षण (विमा कायद्यांमध्ये सुधारणा) विधेयक, 2025
- ✓ भारताच्या परिवर्तनासाठी अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि संवर्धन विधेयक, 2025
- ✓ विकसित भारत – रोजगार आणि उपजिविका अभियान (ग्रामीण) यासाठी हमी : जी राम जी विधेयक 2025

सुविधा आणि वाढलेल्या कल्याणकारी कार्यक्रमांच्या व्याप्तीमुळे याला हातभार लागला आहे. ग्रामीण उपजीविका अधिक वैविध्यपूर्ण आणि डिजिटल पद्धतीने जोडलेली असण्याबरोबरच,मनरेगाची व्यापक आणि मागणी आधारित रचना आता आजच्या खेड्यांच्या गरजांशी पूर्णपणे जुळत नाही. विकसित भारत – जी राम जी विधेयक 2025 या गरजा पूर्ण करेल. ■

मुलीचा जन्म ओझे नाही,आनंदोत्सव व्हावा..

# सक्षम मुली: समृद्ध आणि विकसित भारत



*समाज घडवण्यात आणि आर्थिक विकासाला चालना देण्यात मुलींची भूमिका महत्त्वाची असते.असे असूनही लिंग गुणोत्तर घटत होते.त्यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली "बेटी बचाओ,बेटी पढाओ" योजना 22 जानेवारी रोजी 12 व्या वर्षात प्रवेश करत आहे.देश 24 जानेवारी रोजी राष्ट्रीय बालिका दिन देखील साजरा करत आहे.मुलींना पोषण,शिक्षण आणि आदर मिळतो तेव्हा राष्ट्र अधिक मजबूत होते,याची आठवण हा दिवस आपल्याला करून देतो.मुली आणि महिलांना आयुष्यभर सुरक्षा, संरक्षण आणि सक्षमीकरण प्रदान करण्याला केंद्र सरकारचे कशा प्रकारे प्राधान्य आहे हे जाणून घेऊया....*

देशभरात बाल लिंग गुणोत्तरात घट आणि मुली आणि महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंधित समस्या सोडवणे आवश्यक होते.यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 22 जानेवारी 2015 रोजी हरियाणातील जिंद येथून बेटी बचाओ,बेटी पढाओ योजनेचा शुभारंभ केला.त्यानंतर 15 व्या वित्त आयोगादरम्यान या योजनेचा विस्तार करण्यात आला जेणेकरून सर्व जिल्ह्यांना या योजनेचा लाभ मिळावा, तळाच्या स्तरापर्यंत प्रभावी उपक्रमांकरिता खर्च करण्यासाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा. प्रत्येक मुलीच्या जन्म घेण्याच्या,सुरक्षित राहण्याच्या,अभ्यास करण्याच्या,स्वप्ने पाहण्याच्या आणि नेतृत्व करण्याच्या अधिकाराला बळ देण्यासाठी,केंद्र सरकार बेटी बचाओ,बेटी पढाओ,सुकन्या समृद्धी खाते,मातृत्व वंदना योजना,पंतप्रधान मुद्रा योजना,स्टँडअप इंडिया आणि पंतप्रधान आवास योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना प्राधान्य देत आहे.इतकेच नाही तर विकसित भारतात,राष्ट्र महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर लक्ष केंद्रित करत आहे. त्याचमुळे जन्म समयी लिंग गुणोत्तरात सातत्याने वृद्धी होत आहे.

## बेटी बचाओ,बेटी पढाओ मुळे होत आहे वर्तनात बदल

नीती आयोगाने, महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या 2019 ते 2024 या आर्थिक वर्षांतील योजनांचे मूल्यमापन केले.बेटी बचाओ,बेटी पढाओ (बीबीबीपी) आणि वन स्टॉप सेंटर (ओएससी) हे कार्यक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचे,या मूल्यमापनात दिसून आले.बीबीबीपी च्या माध्यमातून वर्तन बदलाला प्रोत्साहन देत हा उपक्रम देशभरातील महिलांच्या सुरक्षेला आणि सक्षमीकरणाला बळ देत आहे. देशातील मुलींचे जीवन सुधारण्यासाठी बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना मोलाची भूमिका बजावते आहे.



## वाढ

- आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणालीनुसार,संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण 2014-15 मध्ये 61% इतके होते,2023-24 मध्ये ते वाढून 97.3% इतके झाले.गर्भधारणेच्या पहिल्या तिमाहीत काळजी घेण्यासाठीच्या नोंदणीचे प्रमाणसुद्धा 61% वरून 80.5% पर्यंत वाढले.
- 2014-15 मध्ये जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर 918 होते, 2023-24 मध्ये ते वाढून 930 झाले.
- 1876 मध्ये पहिल्या राष्ट्रीय जनगणनेनंतर पहिल्यांदाच,दर 1000 पुरुषांमागे महिलांची संख्या जास्त झाली. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण 5 मध्ये दर 1000 पुरुषांमागे 1,020 महिलांची नोंद झाली.
- 18 वर्षांखालील मुलींच्या लग्नाचे प्रमाण राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-3 च्या तुलनेत आता निम्मे झाले असल्याचे,राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण अहवाल-5 मध्ये दिसून आले आहे.

## अध्ययन

- 2024-25 मध्ये शैक्षणिक संस्थांमध्ये सकल नोंदणी प्रमाणाचा लैंगिक समता निर्देशांक पायाभूत टप्पा,प्राथमिक टप्पा आणि मध्य टप्प्यासाठी 1.0 राहिला आहे,तर माध्यमिक टप्प्यासाठी 1.1 आहे. यावरून मुले आणि मुलींच्या नोंदणीमध्ये कोणताही फरक नसल्याचे दिसून येते.
- 97.1 % शाळांमध्ये स्वतंत्र शौचालये उपलब्ध आहेत आणि 99.3 % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे.शालेय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणांमुळे मुलींची नोंदणी वाढली आहे आणि गळतीचे प्रमाण कमी झाले आहे.
- 2014 नंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या दुप्पट झाली आहे.
- केंद्र सरकारच्या मॅट्रिकपूर्व,मॅट्रिकोत्तर आणि गुणवत्ता-सह-साधनांवर आधारित शिष्यवृत्तींपैकी 30 % रक्कम मुलींसाठी राखीव आहे.
- 'प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा प्रोत्साहन योजना' (पीएम-युएसपी) अंतर्गत 50 % शिष्यवृत्ती स्लॉट विद्यार्थिनींसाठी राखीव आहेत.
- खेलो इंडिया योजनेअंतर्गत महिला क्रीडास्पर्धा लीग सुरू झाली. ज्यामध्ये 29 क्रीडा प्रकारांमध्ये 1.39 लाख महिला सहभागी झाल्या.
- भारतीय क्रीडा प्राधिकरणाने महिला खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी हिमाचल,पंजाब,केरळ आणि आसाममध्ये चार क्रीडा प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत.

## जिंकल्या

- केंद्र सरकारने 2025-26 या आर्थिक वर्षात लैंगिक समतेसाठी 4.49 लाख कोटी रुपयांची तरतूद केली,जी एकूण बजेटच्या 8.86 % आहे.
- एनडीए आणि सैनिक शाळांमध्ये मुलींचे प्रवेश सुरू झाले.
- महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या दिशेने 2023 चा नारी शक्ती वंदन कायदा ही एक मोठी कामगिरी आहे.लोकसभा आणि विधानसभेत 33 % जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.
- ऑगस्ट 2025 पर्यंत 4.31 कोटी सुकन्या समृद्धी खाती उघडली.
- उज्ज्वला योजनेअंतर्गत महिलांच्या नावे 10.3 कोटी गॅस जोडण्या.
- दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत 10 कोटी सदस्यांसह सुमारे 90 लाख बचत गट, महिलांसाठी स्वयंरोजगाराचे स्वरूप बदलत आहेत.
- पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर 3 कोटींहून अधिक घरे.
- महिलांना 35.40 कोटी पीएम मुद्रा कर्ज देण्यात आले,जे एकूण कर्जाच्या सुमारे 68 टक्के आहे.
- महिलांच्या मालकीचे 2.21 कोटी एमएसएमई नोंदणीकृत आहेत.
- 48 % स्टार्ट-अप्समध्ये किमान एक महिला संचालक आहे,तर देशात 2.05 लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्ट-अप्स.
- भारतातील जवळजवळ एक चतुर्थांश अवकाश शास्त्रज्ञ महिला आहेत.

“


*आमच्या सरकारने सुरू केलेल्या प्रत्येक विकास उपक्रमात,आम्ही मुलींचे सक्षमीकरण आणि महिला शक्ती बळकट करण्याला सर्वोच्च प्राधान्य देतो. मुलींना सन्मान आणि त्याबरोबरच संधी सुनिश्चित करण्याकडे आमचे लक्ष आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

यामुळे जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी, शिक्षणापर्यंतची पोहोच वाढविण्यासाठी,आरोग्यसेवेचा विस्तार करण्यासाठी आणि महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मदत झाली आहे. सरकारच्या वचनबद्धतेमुळे केवळ सरकारी संस्थांमध्येच नव्हे तर बिगर-सरकारी संस्थांमध्येही मुलींबद्दलच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे.प्रत्येक मुलीला महत्व देण्यासाठी आणि सुरक्षेसाठी देशात एक मजबूत पाया स्थापन झाला आहे. आता बाराव्या वर्षात प्रवेश करत असताना ही योजना देशात लैंगिक समानता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रगतीची खातरजमा करेल. ▪

पारंपारिक उपचार पद्धती

# गंभीर आरोग्य समस्यांवर उपाय




*पारंपारिक उपचार पद्धती ही जगातील सर्वात प्राचीन समग्र उपचार पद्धतींपैकी एक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या 170 देशांमध्ये पारंपारिक,पूरक आणि एकात्मिक औषध पद्धती वापरल्या जातात.भारत,चीन आणि जपान यासारख्या देशांमध्ये पारंपारिक उपचारांच्या पद्धती दीर्घकाळापासून प्रचलित आहेत तर आफ्रिका आणि अमेरिकेतही अशा पद्धती मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात.गंभीर आरोग्य समस्यांवर उपाय बनलेल्या पारंपारिक उपचार पद्धतीवर 17 ते 19 डिसेंबर 2025 या काळात,जागतिक आरोग्य संघटनेच्या दुसऱ्या जागतिक शिखर परिषदेचे यजमानपद भारताने भूषविले,ज्याच्या समारोप समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले संबोधित...*

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने आणि जागतिक आरोग्य संघटनेने संयुक्तपणे नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'संतुलन पुनर्संचयित करणेः आरोग्य आणि निरामयता विज्ञान आणि सराव' या संकल्पनेवर आधारित पारंपारिक औषध शिखर परिषदेचे आयोजन केले.सलग दुसऱ्या वर्षी भारतात आयोजित केलेली ही शिखर परिषद, देशाच्या वाढत्या नेतृत्वाचे,जागतिक,विज्ञान-आधारित आणि लोक-केंद्रित पारंपारिक औषध अजेंडा तयार करण्यासाठीच्या अग्रगण्य प्रयत्नांचे तसेच पंतप्रधान मोदींच्या दृढनिश्चयाचे प्रतीक आहे.पारंपारिक उपचार पद्धती ही निरामयता आणि जीवनशैलीच्या सीमांच्या पलिकडे जात गंभीर आरोग्य आव्हानांवर उपाय पुरवते.तीन दिवसांच्या या शिखर परिषदेने गुजरात घोषणापत्र स्वीकारले,ज्याने पुराव्यावर आधारित टीसीआयएम प्रति जागतिक वचनबद्धतेची पुष्टी केली.उत्तम डेटा आणि नियामक चौकटींची मागणी केली आणि समग्र,सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेला आणि वैज्ञानिकदृष्ट्या संरेखित जागतिक आरोग्य अजेंडा तयार करण्याच्या कामी भारताच्या नेतृत्वाचा स्वीकार केला.

पारंपरिक औषधोपचार यावरील जागतिक आरोग्य संघटनेचे जागतिक



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक आयुष उपक्रमांचा केला शुभारंभ

- मेरा आयुष एकीकृत सेवा पोर्टल हे आयुष क्षेत्रासाठी एक प्रमुख डिजिटल पोर्टल आहे. हे पारंपारिक, पूरक आणि एकात्मिक औषधांवरील जगातील सर्वात व्यापक डिजिटल भांडार आहे, यात 1.5 दशलक्षाहून अधिक नोंदी आहेत.
- आयुष चिन्हाचे अनावरण केले. आयुष उत्पादने आणि सेवांच्या गुणवत्तेच्या जागतिक मानकांशी सुसंगत राहणे ही त्यामागील संकल्पना आहे.
- योगाभ्यास प्रशिक्षणावरील जागतिक आरोग्य संघटनेचा तांत्रिक अहवाल आणि 'मूलाधारापासून जागतिक स्तरापर्यंतः आयुष्यातील परिवर्तनाची 11 वर्षे' या पुस्तकाचे प्रकाशनही केले.
- भारताच्या पारंपारिक औषध वारशाच्या जागतिक प्रतिबिंबाचे प्रतिक म्हणून अश्वगंधावरील स्मारक टपाल तिकिटाचे देखील अनावरण करण्यात आले. जागतिक आरोग्य संघटनेच्या दिल्ली इथल्या आग्नेय आशिया प्रादेशिक कार्यालयाच्या संकुलाचे उद्घाटनही झाले, या संकुलात जागतिक आरोग्य संघटनेचे भारत विभागीय कार्यालय देखील आहे.
- योगाभ्यासाच्या प्रचार आणि विकासात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल 2021-2025 या वर्षासाठीच्या पंतप्रधान पुरस्कार विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.
- पारंपरिक औषध संशोधन परिसर या प्रदर्शनालाही पंतप्रधानांनी भेट दिली. या प्रदर्शनातून भारतासह जगभरातील पारंपरिक औषध ज्ञान व्यवस्थेतील विविधता, सखोलता आणि समकालीन प्रासंगिकतेची प्रचिती येते.

*पारंपरिक औषधोपचाराशी निगडीत डेटा आणि धोरणात्मक दस्तऐवज एका जागी सुरक्षित राखणारा पारंपरिक औषधोपचार जागतिक लायब्ररी हा जागतिक मंच सुरु करण्यात आला आहे. उपयुक्त माहिती प्रत्येक देशापर्यंत सारखेपणाने पोहोचण्याचा मार्ग यामुळे सुलभ होईल. भारताच्या जी-20 अध्यक्षपदाच्या काळात जागतिक आरोग्य संघटनेच्या पहिल्या जागतिक परिषदेत या लायब्ररीची घोषणा करण्यात आली होती. आज हा संकल्प साकार झाला आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

**भारतात 3,844 आयुष रुग्णालये, 36, 848 दवाखाने, 886 पदवीपूर्व आणि 251 पदव्युत्तर महाविद्यालये आणि 7.5 लाखांहून अधिक नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक आहेत. भारत सरकारने 2014 मध्ये राष्ट्रीय आयुष अभियान देखील सुरु केले, ज्याचा उद्देश देशभरात आयुष सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देणे असा आहे.**

## जागतिक आरोग्य संघटनेचा दिल्ली जाहीरनामा

शिखर परिषदेदरम्यान पारंपारिक औषधांवरील जागतिक आरोग्य संघटनेचा दिल्ली जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. 'दिल्ली जाहीरनाम्यात' पारंपारिक औषधांची सार्वत्रिकता, त्याचा मजबूत वैज्ञानिक आधार, नवोपक्रम आणि आरोग्यविषयक आव्हानांवर नवीन उपायांची क्षमता यावर प्रकाश टाकला आहे, यात चार प्रमुख क्षेत्रांमधील संकल्पांवर लक्ष केंद्रित केले जातेः

- साक्ष्य- पुराव्यावर आधारित ज्ञान मजबूत करणे.
- सुरक्षितता, गुणवत्ता आणि नागरिकांचा विश्वास संपादित करणे.
- सुरक्षित- प्रभावी पारंपारिक उपचार पद्धतींचे एकत्रीकरण.
- नवोन्मेष आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे.

केंद्र भारतातील जामनगर येथे स्थापन झाले आहे ही भारतासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगून पंतप्रधान म्हणाले की या शिखर परिषदेत पारंपारिक ज्ञान आणि आधुनिक पद्धती यांचा संगम होत आहे. जेव्हा परंपरा आणि तंत्रज्ञान एकत्र येतात तेव्हा जागतिक आरोग्य अधिक प्रभावी बनवण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढते. म्हणूनच, या परिषदेचे यश जागतिक स्तरावर खूप महत्त्वाचे आहे. 21 व्या शतकात जीवनात संतुलन राखण्याचे आव्हान आणखी मोठे होणार आहे, यावर पंतप्रधान मोदी यांनी भर दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्ससह नवीन तांत्रिक युगाचा उदय हा मानवी इतिहासातील सर्वात मोठे परिवर्तन आहे, असे ते म्हणाले. अशा अचानक होणाऱ्या जीवनशैलीतील बदलांमुळे, तसेच शारीरिक श्रमाशिवाय संसाधने आणि सुविधा सुलभतेने उपलब्ध होऊ लागल्याने मानवी आरोग्यासाठी अनपेक्षित आव्हाने निर्माण होतील, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे, त्यामुळेच पारंपरिक उपचार आपल्याला केवळ सध्याच्या गरजांवरच लक्ष केंद्रित करण्याऐवजी भविष्यातील जबाबदाऱ्यांकडेही लक्ष देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. संतुलनाचे पुनर्संचयन हे आज केवळ एक अभियान नव्हे तर ती एक जागतिक समस्या देखील आहे. तिची सोडवणूक करण्यासाठी आपल्याला आणखी वेगाने पावले उचलावी लागतील. ■




# आसाम आणि ईशान्य भारत

## भारताच्या विकासाचे नवे प्रवेशद्वार

*आसाम आणि संपूर्ण ईशान्य प्रदेश आज भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार झाले आहे. मल्टी-मॉडल संपर्कव्यवस्थेच्या वचनबद्धतेमुळे या क्षेत्राची दिशा बदलली आहे. आसाममधील विकासकामांचा वेग स्वप्नांचे रूपांतर वास्तवात करत आहे. या संदर्भात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 20 आणि 21 डिसेंबर रोजी आसामला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी सुमारे 15,600 कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे अनावरण केले. त्यांनी आसामच्या भूमीला असेहीं सांगितले की देशाच्या भविष्याची नवी पहाट ईशान्येकडून होईल..*

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

भारताचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आज बदलला आहे. त्याचप्रमाणे देशाच्या भूमिकेतही बदल झाला आहे. यामध्ये सर्वात मोठी भूमिका आधुनिक पायाभूत सुविधांची आहे. भारत 2047 साठी सज्ज होत आहे. यामध्ये पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. देशाच्या प्रत्येक राज्याने एकत्र प्रगती करावी आणि विकसित भारताच्या अभियानात आपले योगदान द्यावे, या दिशेने केंद्र सरकार कार्य करत आहे. आसाममधील गुवाहाटी येथील लोकप्रिय गोपीनाथ बारदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की मला आनंद आहे की आज आसाम आणि संपूर्ण ईशान्य भारत या मिशनचे नेतृत्व करत आहेत. गेल्या 10-11 वर्षांपासून जो हिंसाचार फोफावला होता, तो नष्ट करण्याच्या दिशेने देश आगेकूच करत आहे. आसामची साधनसंपत्ती आता आसामच्या लोकांसाठीच उपयोगाला येत आहे. एकेकाळी हिंसाग्रस्त म्हणून ओळखले जाणारे जिल्हे आता आकांक्षी जिल्हे म्हणून विकसित होत आहेत आणि येत्या काळात हेच प्रदेश औद्योगिक कॉरिडॉर बनतील. आज आसाम भारताचे 'पूर्वेकडील प्रवेशद्वार' म्हणून उदयास येताना दिसत आहे.आसाम अनेक क्षेत्रांत विकसित भारताचे इंजिन बनेल.

विकसित भारताच्या उभारणीत देशातील शेतकरी महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच, केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्यासाठी दिवसरात्र काम करत आहे. कृषी कल्याणकारी योजनांमध्ये, शेतकऱ्यांना खतांचा सातत्यपूर्ण पुरवठा होणे अत्यंत आवश्यक आहे. विकसित भारताच्या उभारणीत देशातील शेतकरी आणि अन्नदात्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्यक्रम देऊन सरकार दिवस रात्र काम करत आहे. कृषी कल्याण विषयक उपक्रमांसोबतच शेतकऱ्यांना खतांचा निरंतर पुरवठा सुनिश्चित करणे आवश्यक आहे, या खत प्रकल्पासाठी सुमारे 11,000 कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून, या प्रकल्पाअंतर्गत दरवर्षी 12 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त खताचे उत्पादन घेतले जाणार आहे. नामरूप युनिटमुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या हजारो नव्या संधी निर्माण होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या नागरिकांना आवाहन करताना सांगितले की भारताच्या भविष्याचा नवा सूर्योदय ईशान्येकडूनच होणार आहे.

हे साध्य करण्यासाठी, आपण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी एकत्र काम केले

## विकास आणि वारसा यांचा संगम साधणारी गोपीनाथ बर्दोलोई विमानतळाची नवीन टर्मिनल इमारत

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुवाहाटी येथे लोकप्रिय गोपीनाथ बर्दोलोई विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे उद्घाटन केले. ही टर्मिनल इमारत "विकासही आणि वारसाही" या मंत्राचे महत्त्व दर्शवते.**

- ही नवी इमारत म्हणजे आसाममधील जोडणी व्यवस्था, आर्थिक विस्तार आणि जागतिक सहभाग याबाबतीत एक परिवर्तनकारी टप्पा ठरेल..
- या टर्मिनलची इमारत सुमारे 1.4 लाख चौरस मीटर परिसरात विस्तारली असून, तिची रचना दरवर्षी 1.3 कोटी प्रवासी हाताळण्यासाठी निर्माण करण्यात आली आहे.
- याठिकाणी धावपट्टी, एअरफील्ड प्रणाली, ॲप्रन आणि टॅक्सी वे इत्यादी प्रमुख सुधारणा झाल्या आहेत.
- निसर्ग संकल्पनेवर आधारित असलेल्या भारताच्या पहिल्या विमानतळ टर्मिनलचे डिझाईन आसामच्या जैवविविधता आणि सांस्कृतिक वारशातून प्रेरणा घेऊन, 'बांबू ऑर्किड्स' या संकल्पनेपासून प्रेरित आहे.
- या टर्मिनलमध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या सुमारे 140 मेट्रिक टन ईशान्येकडील बांबूचा नाविन्यपूर्ण वापर करण्यात आला आहे.
- जवळपास एक लाख स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींनी सजलेले एक अनन्यसाधारण 'आकाश वन' आगमन करणाऱ्या प्रवाशांना वनाचा अनुभव देते.
- हे टर्मिनल प्रवाशांच्या सोयी आणि डिजिटल नवोपक्रमाच्या बाबतीत नवे मापदंड स्थापित करते.वेगवान, बिनधोक सुरक्षा तपासणीसाठी फुल-बॉडी स्कॅनर, डिजीयात्रा-सक्षम संपर्करहित प्रवास, स्वयंचलित सामान हाताळणी, फास्ट-ट्रॅक इमिग्रेशन आणि कृत्रिम प्रज्ञा-आधारित विमानतळ कार्यप्रणाली यांसारखी वैशिष्ट्ये यात समाविष्ट आहेत.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा






## नवीन अमोनिया-युरिया खत प्रकल्पाची पायाभरणी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ब्रह्मपुत्रा व्हॅली फर्टिलायझर कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सध्याच्या आवारात उभारण्यात येणाऱ्या नवीन ब्राउनफील्ड अमोनिया-युरिया खत प्रकल्पाचे भूमिपूजन झाले.
- पंतप्रधानांच्या शेतकरी कल्याणाच्या दृष्टिकोनाला पुढे नेत, 10,600 कोटी रुपयांपेक्षा जास्त अंदाजित गुंतवणुकीचा हा प्रकल्प आसाम आणि शेजारील राज्यांच्या खतांची गरज पूर्ण करेल.
- यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईलआणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना मिळेल. हा प्रकल्प औद्योगिक पुनरुज्जीवन आणि शेतकरी कल्याणाचा आधारस्तंभ आहे.

> *आसामच्या भूमीबद्दलची माझी ओढ, तिथल्या लोकांचे प्रेम आणि आपुलकी, माझ्या माता आणि बहिणींचे प्रेम मला प्रेरणा देत आहे आणि ईशान्येकडील विकासाच्या आमच्या संकल्पाला बळकटी देत आहे.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## पंतप्रधानांनी हुतात्म्यांना वाहिली श्रद्धांजली



ऐतिहासिक आसाम आंदोलनातील हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पंतप्रधानांनी बोरगाव येथील शहिद स्मारक क्षेत्राला भेट दिली. सहा वर्षे चाललेले हे जनआंदोलन परकीयमुक्त आसाम आणि राज्याच्या अस्मितेच्या संरक्षणासाठीच्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक होते. शहिद स्मारकाला भेट देण्याचा क्षण भावुक होता असे सांगून पंतप्रधान म्हणाले की आम्ही आसामची प्रगती, समृद्धी आणि सांस्कृतिक वैभवाच्या वाढीसाठी अथक प्रयास करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

## बियाण्यांपासून बाजारपेठेपर्यंत शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे सरकार

- 2014 मध्ये देशात केवळ 225 लाख मेट्रिक टन युरियाचे उत्पादन होत होते, गेल्या 11 वर्षात त्यात वाढ होऊन ते जवळपास 306 लाख मेट्रिक टनांपर्यंत पोहोचले आहे.
- शेतकऱ्यांना युरियाची एक गोणी केवळ 300 रुपयांमध्ये मिळते, तर त्याच गोणीसाठी सरकारला इतर देशांना जवळपास 3,000 रुपये द्यावे लागतात.
- आतापर्यंत पीएम किसान सन्मान निधीअंतर्गत जवळपास 4 लाख कोटी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आले.
- 2025 मध्ये शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पीएम धन-धान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता अभियान, या 35,000 कोटींच्या दोन योजना सुरू करण्यात आल्या.
- किसान क्रेडिट कार्डद्वारे शेतकऱ्यांना या वर्षी 10 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक मदत मिळाली.
- ईशान्येकडील राज्यांकडे विशेष लक्ष केंद्रित करत सरकारने पाम तेलाशी निगडीत अभियान सुरू केले आहे.

पाहिजे. आपण आसामच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. मला विश्वास आहे की आपले सामूहिक प्रयत्न आसामला नवीन उंचीवर घेऊन जातील.

### आसामच्या विकासाला नवीन गती

ब्रह्मपुत्रा नदीवर बांधण्यात आलेल्या पुलांनी आसामला संपर्क व्यवस्थेच्या बाबतीत नवी ताकद आणि विश्वास दिला आहे. आपण विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करू. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहा ते सात दशके उलटूनदेखील आसाममध्ये केवळ तीन मोठे पूल उभारले गेले होते, मात्र गेल्या दशकभरात, चार नव्या भव्य पुलांचे काम पूर्ण झाले असून इतर अनेक ऐतिहासिक प्रकल्प आकाराला येत आहेत. बोगीबील आणि धोला-सदिया यांसारख्या सर्वाधिक लांबीच्या पुलांनी आसामला व्यूहात्मक दृष्ट्या अधिक सशक्त केले आहे. रेल्वेद्वारे संपर्काच्या व्यवस्थेत देखील क्रांतिकारक बदल घडून आले. बोगीबीळ पुलामुळे उन्नत आसाम आणि देशाचा उर्वरित भाग यांतील अंतर आता कमी झाले आहे. गुवाहाटी आणि न्यू जलपायगुडी यांच्यादरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेस गाडीमुळे या स्थानकांतील प्रवासाच्या वेळेत बचत झाली आहे. आसाम राज्याला जलमार्गांच्या विकासाचा देखील लाभ झाला असून येथील कार्गो वाहतुकीत 140 टक्के वाढ झाली आहे. ब्रह्मपुत्रा ही केवळ येथील एक नदी नसून आर्थिक सामर्थ्याचा ओघ देखील आहे. पांडू येथे पहिली जहाज दुरुस्ती सुविधा विकसित करण्यात येत आहे आणि वाराणसी ते दिब्रुगड दरम्यान कार्यरत गंगा विलास जहाज पर्यटन सेवेबद्दलच्या उत्सुकतेने ईशान्य प्रदेशाला जागतिक जहाज पर्यटनाच्या नकाशावर मजबुत स्थान मिळवून दिले आहे. ▪



कॅबिनेट निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

# दिल्ली मेट्रोचा विस्तार होणार

## महाराष्ट्र आणि ओडिशासाठी प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी

*पायाभूत सेवा सुविधा आणि संपर्कयंत्रणा यांचा देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण वाटा आहे आणि केंद्र सरकार या विकासकामांना सातत्याने गती देत आहे. याच मालिकेचा भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्र सरकारने नवीन वर्षाची भेट म्हणून दिल्ली मेट्रोच्या विस्ताराला मंजुरी दिली. महाराष्ट्र आणि ओडिशाच्या प्रमुख पायाभूत प्रकल्पांना देखील मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे संपर्कयंत्रणेत सुधारणा तर होईलच शिवाय दैनंदिन प्रवास देखील सुखकर होईल...*

**निर्णय : दिल्ली मेट्रो प्रकल्पाच्या पाचव्या टप्प्याचा (ए) भाग असलेल्या तीन नव्या मार्गिकांच्या उभारणीला मंजुरी**

**परिणाम :** 16.076 किमी लांबीच्या या योजनेमुळे राष्ट्रीय राजधानीतील संपर्क व्यवस्थेत भरीव वाढ होईल. दिल्ली मेट्रोच्या पाचव्या टप्प्याच्या (ए) प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे 12014.91 कोटी रुपये आहे.

तीन नवीन मार्गिकाः

1. आर.के. आश्रम मार्ग ते इंद्रप्रस्थ (9.913 कि.मी. )
2. एअरोसिटी ते आयजीडीटी टी-1 (2.263 कि.मी.)
3. तुघलकाबाद ते कालिंदी कुंज (3.9 कि.मी.)

- सेंट्रल व्हिस्टा मार्गिका दिल्लीतील सर्व कर्तव्य भवनांपर्यंत जोडणी उपलब्ध करून देऊन या भागातील कार्यालयांमध्ये जाणारे कर्मचारी तसेच इतर अभ्यागत यांच्यासाठी या भवनांमध्ये थेट पोहोचण्यासाठी जोडणीची सोय करेल.
- दैनंदिन पातळीवर सुमारे 60,000 कर्मचारी आणि 2 लाख अभ्यागतांना या जोडणीचा लाभ होण्याची अपेक्षा.
- जीवनमानातील सुलभतेत वाढ करत या मार्गिका प्रदूषण तसेच जीवाश्म इंधनाचा वापर आणखी कमी करण्यात मदत करतील.
- सध्या दिल्ली मेट्रो दररोज सरासरी 65 लाख प्रवाशांना सेवा देते. आज, दिल्ली मेट्रोचे जाळे भारतातील सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क आहे आणि जगातील सर्वात मोठ्या मेट्रोपैकी एक आहे.

**निर्णय : ओडिशा राज्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-326 च्या 68.600 ते 311.700 किमी दरम्यानच्या सध्याच्या दोन पदरी रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दोन पदरी रुंदीकरण आणि मजबुतीकरण प्रकल्पाला ईपीसी (अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम) पद्धतीने मंजुरी.**

**परिणाम :** एनएच -326 च्या श्रेणीसुधारणामुळे प्रवास वेगवान, सुरक्षित आणि अधिक विश्वासार्ह होईल, परिणामी दक्षिण ओडिशाचा सर्वांगीण विकास होईल आणि विशेषत्वाने गजपती, रायगडा आणि कोरापुट जिल्ह्यांना याचा फायदा होईल. सुधारलेल्या रस्ते जोडणीमुळे स्थानिक समुदाय, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि पर्यटन केंद्रांना बाजारपेठा, आरोग्यसेवा आणि रोजगाराच्या संधींपर्यंत पोहोचणे सुलभ होईल, ज्यामुळे प्रदेशाच्या सर्वसमावेशक वाढीस हातभार लागेल. या प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च 1,526.21 कोटी रुपये आहे.

**निर्णय : महाराष्ट्रात 6-पदरी ग्रीनफिल्ड ॲक्सेस-कंट्रोल्ड नाशिक-सोलापूर-अक्कलकोट मार्गिकेच्या बांधकामाला मंजुरी**

**परिणाम :** हा प्रकल्प 374 किमी. लांबीचा असेल त्यासाठी 19,142 कोटी रुपये गुंतवणूक केली जाणार आहे. हा प्रकल्प नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर यांसारख्या महत्त्वाच्या प्रादेशिक शहरांना जोडत पुढे कुर्नुलला संपर्कव्यवस्था प्रदान करेल. या प्रकल्पामुळे सुमारे 251.06 लाख मनुष्य-दिवस प्रत्यक्ष रोजगार आणि 313.83 लाख मनुष्य-दिवसांचा अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. या प्रस्तावित मार्गिकेच्या आसपासच्या परिसरात आर्थिक घडामोडी वाढल्यामुळे अतिरिक्त रोजगाराच्या संधी देखील निर्माण होतील.





# पश्चिम बंगालच्या प्रगतीला नवीन वेग

*सबका साथ सबका विकास या मंत्रानुसार सर्वांचा विकास व्हावा यासाठी केंद्रसरकार निरंतर प्रयत्नशील आहे. देशातले जे भाग गेली कित्येक वर्ष दुर्लक्षित राहिले त्या भागांना देखील संपर्कव्यवस्थेचा लाभ व्हायला हवा. याच मालिकेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 20 डिसेंबर रोजी पश्चिम बंगालला भेट दिली आणि अंदाजे 3,200 कोटी रुपयांच्या दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्‌घाटन आणि पायाभरणी केली. या प्रकल्पांमुळे राज्यातील आर्थिक घडामोडी आणि पर्यटनाला चालना मिळेल.*

पश्चिम बंगालमधील नादिया ही ती भूमी आहे जिथे प्रेम, करुणा आणि भक्तीचे जिवंत अवतार श्री चैतन्य प्रभू प्रकट झाले. या भूमीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालच्या प्रगतीला नवीन चालना देण्यासाठी नादिया जिल्ह्यातील राणाघाट येथे दोन प्रमुख महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्‌घाटन केले. या नवीन प्रकल्पामुळे कोलकाता आणि सिलिगुडीशी या प्रदेशाची कनेक्टिव्हिटी आणखी सुधारेल. विकसित भारताचे स्वप्न साध्य करण्यात आधुनिक पायाभूत सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच केंद्र सरकार पश्चिम बंगालमध्ये आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, बराजमदा ते कृष्णनगर या चार पदरी रस्त्याचा उत्तर २४ परगणा, नादिया, कृष्णनगर आणि इतर भागातील लोकांना मोठा फायदा होईल. यामुळे कोलकाता ते सिलिगुडी प्रवासातील वेळ अंदाजे दोन तासांनी कमी होईल. बारासत ते राजगुडी या चार पदरी रस्त्याचे कामही सुरू झाले आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे संपूर्ण परिसरात आर्थिक उपक्रमांना चालना मिळेल आणि पर्यटनाचा विस्तार होईल.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

## दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उदघाटन आणि पायाभरणी

- प्रधानमंत्री पंतप्रधान मोदी यांनी पश्चिम बंगालमध्ये जवळपास 3200 कोटी रुपयांच्या दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उदघाटन केले आणि पायाभरणी केली.
- नादिया जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग 34 च्या बाराजागुली-कृष्णनगर क्षेत्रावर 66.7 किलोमीटर लांबीच्या चौपदरी पथाचे उदघाटन केले.
- उत्तर 24 परगणा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग 34 च्या बारासात-बाराजागुली क्षेत्रावर 17.6 किमी लांबीच्या चौपदरी पथाची पायाभरणी केली.
- हे प्रकल्प कोलकाता आणि सिलिगुडी दरम्यान महत्त्वपूर्ण संपर्क मार्ग म्हणून काम करतील.
- या प्रकल्पामुळे प्रवासाच्या वेळेत जवळपास 2 तासांची बचत होईल. सुरळीत प्रवासासाठी वाहनांची जलद आणि सुगम वाहतूक सुनिश्चित होईल.
- वाहनांचा परिचालन खर्च कमी होईल आणि कोलकाता तसेच पश्चिम बंगालच्या इतर शेजारी जिल्ह्यांसोबतच शेजारी देशांसोबतच्या दळणवळणात सुधारणा होईल.



*मी तुमच्यासाठी, तुमची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी, बंगालच्या उज्ज्वल भविष्यासाठी संपूर्ण शक्तीसह खांद्याला खांदा लावून तुमच्यासोबत मिळून काम करेन.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पश्चिम बंगालच्या विकासासाठी पैशांची कमतरता नाही, इच्छाशक्तीचा अभाव नाही आणि योजनांची कमतरताही नाही. इतकेच नाही, तर केंद्र सरकार अशी धोरणे तयार करत आहे आणि निर्णय घेत आहे, ज्यामुळे प्रत्येक देशवासियाचे सामर्थ्य वाढेल. पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी आपल्याला एक उदाहरण देतो. काही दिवसांपूर्वी आपण जीएसटी बचत उत्सव साजरा केला. देशवासियांना कमीत कमी किमतीत गरजेचे सामान मिळेल, हे केंद्र सरकारने सुनिश्चित केले. त्यामुळे दुर्गापूजा आणि इतर सणावारांच्या काळात पश्चिम बंगालमधल्या लोकांनी खूप खरेदी केली.

### नादियाची भूमी... प्रेम, करुणा आणि भक्तीचे जीवंत स्वरूप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 20 डिसेंबर रोजी पश्चिम बंगाल दौऱ्यात एका सभेला संबोधित केले. नादिया अशी भूमी आहे, जिथे प्रेम,करुणा आणि भक्तीचे जीवंत स्वरूप चैतन्य महाप्रभू प्रकट झाले. नादियाच्या गावागावात, गंगेच्या प्रत्येक घाटावर जेव्हा हरिनाम संकीर्तनाचा गजर होत असे तो केवळ भक्तीचा नसे... सामाजिक एकतेचे ते आवाहन असे. होरिनाम दिये जोगोत माताले... आमार एकला निताई ! ही भावना.. आजही तिथल्या मातीत, तिथल्या हवेत, जलात आणि तिथल्या जनमानसात जीवित आहे.

### पंतप्रधान मोदी यांचे आवाहन.. वंदे मातरम, राष्ट्र निर्माणाचा मंत्र

बंगालने, बंगाली भाषेने भारताच्या इतिहासाला, भारताच्या संस्कृतीला निरंतर समृद्ध केले आहे. वंदे मातरम.. असेच एक श्रेष्ठ योगदान आहे. वंदे मातरमला 150 वर्ष पूर्ण होण्याचा उत्सव संपूर्ण देश साजरा करत आहे. नुकताच संसदेत वंदे मातरमचा गुणगौरव झाला. पश्चिम बंगालची धरती... वंदे मातरमच्या अमरगानाची भूमी आहे. या धरतीने बंकिम बाबूंसारखे महान ऋषी देशाला दिले... ऋषी बंकिम बाबूंनी गुलाम भारतात वंदे मातरमच्या माध्यमातून नवे चैतन्य निर्माण केले. इतकेच नव्हे, वंदे मातरम 19 व्या शतकात गुलामीतून मुक्त होण्याचा मंत्र बनला. पंतप्रधान मोदी यांनी आवाहन केले की 21 व्या शतकात वंदे मातरम हा आपल्या राष्ट्रनिर्माणाचा मंत्र बनवायचा आहे. आता वंदे मातरम विकसित भारतासाठी प्रेरणा व्हावे.. या गीतातून आम्हाला विकसित पश्चिम बंगालची चेतना जागवायची आहे. ■

नेताजींना जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्राचे नमन

# नेताजींच्या पराक्रमाने दिली स्वातंत्र्यलढ्याला नवी शक्ती



*ओजस्वी विद्यार्थी, कुशल प्रशासक आणि सर्वात संघर्षशील नेते सुभाषचंद्र बोस यांनी आपलं साहस तसंच पराक्रमाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी शक्ती प्रदान केली. प्रतिकूल परिस्थितीत आपल्या तेजस्वी नेतृत्वानं त्यांनी देशाच्या युवाशक्तीला संघटित केलं. राष्ट्राप्रती नेताजींच्या निःस्वार्थ सेवेच्या सन्मानार्थ 2021 पासून भारत सरकारने 23 जानेवारी हा नेताजींचा जन्मदिन दरवर्षी पराक्रम दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. मातृभूमीसाठी त्यांचा अतुलनीय त्याग, ध्यास आणि संघर्ष सदैव देशाला मार्गदर्शन करत राहील...*

आपल्या संपूर्ण जीवनात सुखाचा त्याग करत जवळपास 35,000 किलोमीटरचा प्रवास कार किंवा पाणबुडीने करणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी देशवासियांना स्वतंत्र आणि सार्वभौम भारताचा विश्वास दिला. कलकत्याहून बर्लिनमार्गे जपानपर्यंत प्रवास करून भारताला स्वतंत्र करण्याचा एक भव्यदिव्य प्रयत्न करणाऱ्या नेताजींनी मोठ्या अभिमानाने, आत्मविश्वास आणि साहसाने इंग्रजी सत्तेसमोर सांगितले होते-"मी स्वातंत्र्याची भीक मागणार नाही, मी ते प्राप्त करेन." भारताच्या भूमीवर पहिले स्वतंत्र सरकार स्थापन करणाऱ्या नेताजींची 129 वी जयंती 23 जानेवारी 2026 ला साजरी होत आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा एक संकल्प म्हणजे भारताच्या स्व ओळखीचे आणि प्रेरणांचे पुनरुज्जीवन. याच अनुषंगाने, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक वारसा देश अभिमानाने जपत आहे. नेताजी म्हणाले होते- "भारत बोलावत आहे. रक्त रक्ताला पुकारत आहे. उठा,आपल्याला वेळ दवडून चालणार नाही." अशी उमेदीची साद केवळ नेताजीच देऊ शकत होते. आणि त्यांनी हेही दाखवून दिले की ज्या सत्तेचा सूर्य कधी मावळत नसे त्या सत्तेला भारताचे वीर रणांगणात पराभूत करू शकतात. भारताच्या जमिनीवर, स्वतंत्र भारताच्या स्वतंत्र सरकारची स्थापना करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. नेताजींनी आपलं हे वचन पूर्ण केलं. त्यांनी अंदमानमध्ये आपल्या सैनिकांसह तिरंगा फडकावला.

## नेताजींशी संबंधित फाईली सार्वजनिक

भारत सरकारने2015 मध्ये, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी संबंधित गोपनीय फायली सार्वजनिक करण्याचा आणि त्या जनतेसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला. 4 डिसेंबर 2015 रोजी 33 फायलींचा पहिला संच प्रसिद्ध करण्यात आला. दीर्घकाळापासून सुरू असलेली जनतेची मागणी पूर्ण करण्यासाठी, 23 जानेवारी 2016 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेताजींशी संबंधित 100 फायलींच्या डिजिटल प्रती प्रकाशित केल्या.



# नेताजींचा वारसा जपण्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे

- 19 जानेवारी 2021 रोजी, देश दरवर्षी 23 जानेवारी हा दिवस पराक्रम दिवस म्हणून साजरा करेल अशी घोषणा करण्यात आली.
- 23 जानेवारी 2021 रोजी, नेताजींच्या 125 व्या जयंतीनिमित्त, भारत सरकारने वर्षभर चालणाऱ्या स्मरणोत्सव कार्यक्रमाचा प्रारंभ केला.
- 14 ऑक्टोबर 2015 रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कुटुंबातील 35 सदस्यांची पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानी भेट घेतली.
- आझाद हिंद सरकारच्या स्थापनेच्या 75 व्या वर्धापन दिनाच्या स्मृतिनिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 21 ऑक्टोबर 2018 रोजी लाल किल्ल्यावर ध्वजारोहण केले.
- आझाद हिंद सेनेचे (आयएनए) चार माजी सैनिक 2019 मध्ये प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी झाले
- 23 जानेवारी 2021 रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोलकाता येथील नेताजींच्या वडिलोपार्जित घराला भेट दिली. नेताजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक स्मृती नाणे आणि टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले. नेताजींच्या पत्रांवर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.
- नेताजींच्या जीवनावरील प्रदर्शन आणि प्रोजेक्शन मॅपिंग शो 23 जानेवारी 2021 रोजी कोलकाता येथे सुरू झाला. हावडा येथून निघणाऱ्या हावडा-कालका मेल या गाडीचे नाव बदलून नेताजी एक्सप्रेस असे ठेवण्यात आले.
- कर्तव्य पथावर नेताजींचा पुतळा उभारण्यात आला. कर्तव्य पथाला भेट देणाऱ्या प्रत्येक देशवासीयाला नेताजींच्या कर्तव्याप्रति समर्पणाचे स्मरण राहावे, हा यामागचा हेतू आहे.
- जिथे आझाद हिंद सरकारने पहिल्यांदा तिरंगा फडकावला होता, त्या अंदमान आणि निकोबार बेटांना नेताजींचे नाव देण्यात आले. रॉस बेटाचे नाव नेताजी सुभाषचंद्र बोस बेट असे ठेवण्यात आले, तर हॅवलॉक आणि नील बेटांचे नाव स्वराज आणि शहीद बेटे असे ठेवण्यात आले.
- 23 जानेवारी 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस बेटावर बांधल्या जाणाऱ्या आणि नेताजींना समर्पित असलेल्या राष्ट्रीय स्मारकाच्या प्रारूपाचे अनावरण केले.
- लाल किल्ल्यावर नेताजी आणि आझाद हिंद सेनेच्या योगदानाला समर्पित संग्रहालय बांधण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन पुरस्काराच्या स्वरूपात प्रथमच, नेताजींच्या नावाने राष्ट्रीय पुरस्कार घोषित करण्यात आला.

*बालपणापासूनच नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव ऐकले की एक नवी ऊर्जा मिळायची. त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके उत्तुंग आहे की वर्णनासाठी शब्द अपुरे आहेत. दूरदृष्टी तर इतकी की तिथपर्यंत पाहण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतील. प्रतिकूल परिस्थितीतही एवढे साहस की जगातले मोठ्यातले मोठे आव्हानही त्यांना रोखू शकले नाही. मी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या चरणी वंदन करतो.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### पराक्रम दिवसानिमित्त संविधान सदनाच्या केंद्रीय कक्षात संवाद

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती, 'पराक्रम दिवस'निमित्त, 20 जानेवारी 2025 रोजी संविधान सदनाच्या केंद्रीय कक्षात 'अपने नेताओं को जानें ' कार्यक्रमांतर्गत अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आदरांजली वाहिली. हा कार्यक्रम 'पार्लमेंट्री रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसीज (प्राइड)' द्वारे आयोजित करण्यात आला होता. या काळात अनेक युवा सहभागींनी स्वातंत्र्यलढ्यातील नेताजींच्या योगदानावर विचार व्यक्त केले आणि त्यांच्या जीवन मूल्यांचे आणि आदर्शांचे स्मरण केले.



राष्ट्र प्रेरणा स्थळ

# आत्मसन्मान, एकता आणि सेवेचे प्रतीक

*सुशासन प्रत्यक्षात आणण्यासोबतच पोखरण आणि कारगिल विजयाने शौर्याची अमीट गाथा लिहिणाऱ्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या 101 व्या जयंतीनिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 25 डिसेंबर रोजी लखनौ येथे राष्ट्र प्रेरणा स्थळाचे लोकार्पण केले. या परिसरात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे 65 फूट उंच कांस्य पुतळे आहेत, जे राजकीय विचार, राष्ट्र उभारणी आणि सार्वजनिक जीवनात त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचे प्रतीक आहेत...*

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश में दो विधान, दो प्रधान और दो निशान नहीं चलेंगे' या मंत्राने अखंड भारताचा पाया रचला. तर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी 'एकात्म मानवतावाद' सिद्धांत देऊन समाजाच्या प्रत्येक वर्गाच्या उत्थानासाठी अंत्योदयाचे लक्ष्य दिले. राष्ट्र कल्याणाचा हाच प्रवाह पुढे नेण्याचे कार्य राष्ट्रवादी विचारांचे महाकवी आणि राष्ट्रनायक अटलबिहारी वाजपेयी यांनी केले. उत्तर प्रदेशातल्या लखनौ येथे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे जीवन आणि आदर्शांना आदरांजली अर्पण करत राष्ट्र प्रेरणा स्थळाचे उदघाटन करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की 25 डिसेंबर हा दिवस देशातील दोन महान विभूतींच्या जन्माचा अद्भुत सुयोग आहे. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आणि भारतरत्न महामना मदनमोहन मालवीय, या दोन्ही महापुरुषांनी भारताची ओळख, एकता आणि अभिमान जपला आणि राष्ट्र उभारणीत आपली अमिट छाप सोडली. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे एक दूरदर्शी नेते होते. त्यांनी आपले जीवन एकता, अखंडता आणि बलशाली राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारताला त्याच्या मुळांशी जोडताना, एक आत्मनिर्भर, समृद्ध आणि सांस्कृतिकदृष्ट्या मजबूत राष्ट्र करण्याचा मार्ग प्रशस्त केला. अटलबिहारी वाजपेयी यांनी जागतिक पटलावर भारताला निर्विवादपणे एक मजबूत, जागतिक शक्ती म्हणून स्थापित केले. अशा या तीन महान राष्ट्र नायकांचे 65 फूट उंचीचे कांस्य पुतळे लखनौमधील राष्ट्र प्रेरणा स्थळ येथे राष्ट्रवादी विचार आणि आदर्शांच्या मूर्त प्रतिकृती म्हणून स्थापित करण्यात आले आहेत. विचार, संस्कृती आणि राष्ट्र चेतनेचा हा अद्भुत संगम विकसित भारत आणि विकसित उत्तर प्रदेशाची एक नवी प्रेरणादायी कहाणी रचण्यास सज्ज आहे.

# देशाच्या सोनेरी भविष्याचा मार्ग दाखवणारे राष्ट्र प्रेरणा स्थळ

- लखनौ विकास प्राधिकरणाने 65 एकर जागेवर कमळाच्या फुलासारखा आकार असलेले राष्ट्र प्रेरणा स्थळ विकसित केले आहे.
- हे ते ठिकाण आहे जिथे काही महिन्यांपूर्वीपर्यंत 6.5 लाख मेट्रिक टन कचऱ्याचा एक मोठा डोंगर होता.
- केंद्र आणि राज्य सरकारांच्या दृढ निश्चयामुळे, कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आणि संपूर्ण परिसर हरित आणि स्वच्छ झाला.
- परिसरात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे 65 फूट उंचीचे कांस्य पुतळे उभारण्यात आले आहेत, जे भारताचे राजकीय विचार, राष्ट्र निर्माण आणि सार्वजनिक जीवनात त्यांच्या अमीट योगदानाचे प्रतीक आहेत.
- 230 कोटी रुपये खर्चून बांधलेले हे नेत्रदीपक स्थळ 2 लाख लोकांना सामावून घेऊ शकते. परिसरात एक ध्यान कक्ष, ग्रंथालय, तीन हजार लोकांच्या क्षमतेचे मोठे ॲम्फीथिएटर आणि सुसज्ज उद्यान आहे.
- हे संग्रहालय, नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि अटलबिहारी वाजपेयी यांचे गौरवशाली जीवन, तत्त्वज्ञान, संघर्ष आणि विचार चित्रकथांद्वारे सादर करते.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

*राष्ट्र प्रेरणा स्थळ, ज्या विचारांनी भारताला आत्मसन्मान, एकता आणि सेवेचा मार्ग दर्शवला त्या विचारांचे प्रतीक आहे. डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि अटलबिहारी वाजपेयी यांचे विशाल पुतळे जितके उंच आहेत तितकेच त्यांच्याकडून मिळणारी प्रेरणा त्याहूनही मोठी आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधान मोदी म्हणाले की डॉक्टर मुखर्जी, पंडित दीनदयाळ आणि अटलजी यांची प्रेरणा, त्यांचे दूरदर्शी कार्य आणि हे विशाल पुतळे विकसित भारताचा एक मोठा आधार आहेत. आज त्यांचे पुतळे आपल्याला नवी ऊर्जा देत आहेत. आज मी अत्यंत अभिमानाने सांगू शकतो की उत्तर प्रदेशातील कष्टकरी लोक एक नवे भविष्य लिहित आहेत. पूर्वी उत्तर प्रदेशची चर्चा त्याच्या खराब कायदा आणि सुव्यवस्थेसाठी होत असे, परंतु आज त्याची चर्चा त्याच्या विकासासाठी होते. आज, उत्तर प्रदेश देशाच्या पर्यटन नकाशावर वेगाने उदयास येत आहे. अयोध्येतील भव्य राम मंदिर आणि काशीतील विश्वनाथ धाम जगात एका नवीन ओळखीचे प्रतीक बनत आहेत. राष्ट्र प्रेरणा स्थळ यासारख्या आधुनिक निर्माणामुळे उत्तर प्रदेशची नवी प्रतिमा आणखी उजळते.

## महाराजा बिजली पासी यांना श्रद्धापूर्वक नमन

25 डिसेंबर या दिवशी महाराजा बिजली पासी यांची जयंतीदेखील असते. लखनौचा प्रसिद्ध बिजली पासी किल्ला राष्ट्र प्रेरणा स्थळापासून फार दूर नाही. महाराजा बिजली पासी यांचा शौर्य, सुशासन आणि समावेशकतेचा वारसा पासी समाजाने अभिमानाने पुढे नेला आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी वर्ष 2000 मध्ये महाराजा बिजली पासी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकिटाचे अनावरण केले, हा देखील योगायोग आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ₹या शुभ दिवशी मी महाराजा बिजली पासी यांना श्रद्धापूर्वक नमन, वंदन करतो.

वीर बाल दिवस

# साहसी आणि प्रतिभावान युवानिर्माणासाठी एक मंच

*साहिबजादांच्या शौर्याने प्रेरित होऊन केंद्र सरकारने 26 डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून घोषित केला. 4 वर्षांमध्ये या नव्या परंपरेने साहिबजादांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवली, त्याचसोबत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराच्या माध्यमातून साहसी आणि प्रतिभावान युवानिर्माणासाठी एक मंचही तयार करण्यात आला आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वीर बाल दिवसानिमित्त 26 डिसेंबर 2025 ला 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान केले. त्याचसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत मंडपममध्ये वीर बाल दिवस राष्ट्रीय कार्यक्रमाला संबोधित केले...*

कला,शौर्य, सामाजिक सेवा, विज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये असाधारण योगदान देणाऱ्या मुलांना दरवर्षी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी पुरस्कार प्राप्त करणाऱ्या 20 मुलांमध्ये सर्वात कमी 7 वर्षांच्या वाका लक्ष्मी प्राज्ञिका हिचादेखील समावेश आहे. यावरून दिसून येते की प्रतिभेला वयोमर्यादा नसते. अशा प्रतिभाशाली मुलांमुळेच भारताला जागतिक पातळीवर बुद्धिबळाचे महाशक्ती केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. पुरस्कार प्राप्त करणाऱ्या अजय राज आणि मोहम्मद सिदान पी यांचे जितके कौतुक करावे तितके कमीच आहे. त्यांनी साहस आणि बुद्धीच्या बळावर दुसऱ्यांचे प्राण वाचवले. आपल्या शौर्याने दुसऱ्याच्या प्राणांचे रक्षण करताना नऊ वर्षांची व्योमा प्रिया आणि 11 वर्षांचा शूर कमलेश कुमार यांनी आपले प्राण गमावले.

पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांमध्ये 10 वर्षांचा शवण सिंहदेखील आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान जोखीम पत्करून त्याने आपल्या घराजवळ सरहद्दीवर तैनात भारतीय सैनिकांसाठी दररोज पाणी, दूध आणि लस्सी यासारख्या गोष्टी





*भारतातील तरुणांनी मोठी स्वप्ने पहावीत, कठोर परिश्रम करावेत आणि त्यांचा आत्मविश्वास कधीही डळमळीत होऊ नये अशी माझी अपेक्षा आहे. भारताचे भवितव्य देशातील बालके आणि तरुणांच्या भवितव्यानेच उज्वल बनेल. त्यांचे धैर्य, त्यांची प्रतिभा आणि त्यांचे समर्पण देशाच्या प्रगतीला दिशा देतील.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा

## वीर बाल दिनानिमित्त करण्यात आले अनेक कार्यक्रमांचे आयोजन

वीर बाल दिनानिमित्त केंद्र सरकारने देशभरात सहभागी कार्यक्रमांचे आयोजन केले. या कार्यक्रमाचा उद्देश साहिबजादे यांचे असाधारण धैर्य आणि सर्वोच्च बलिदानाची माहिती नागरिकांना देणे, त्यांना शिक्षित करणे आणि देशाच्या इतिहासातील युवा नायकांचे अदम्य धैर्य, बलिदान आणि वीरतेचा सन्मान करणे आणि त्यांचे स्मरण करणे हा होता. या उपक्रमांमध्ये कथाकथन, कविता वाचन, भित्तीपत्रिका बनविणे आणि निबंध लेखन स्पर्धांचा समावेश होता. पंतप्रधान मोदी यांनी 9 जानेवारी 2022 रोजी श्री गुरु गोविंद सिंह यांचे पुत्र साहेबजादे बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी 26 डिसेंबर हा दिवस वीर बाल दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली होती.

## बाल शौर्याचे प्रतीक वीर बाल दिन

वीर बाल दिन हा बालकांचे शौर्य आणि भक्तीने परिपूर्ण दिवस आहे. साहेबजादा अजित सिंह, साहेबजादा जुझार सिंह, साहेबजादा जोरावर सिंह आणि साहेबजादा फतेह सिंह यांना बाल वयातच त्यांच्या काळातील सर्वात शक्तिशाली सत्तेशी सामना करावा लागला. हे युद्ध भारताचे मूलभूत आदर्श आणि धार्मिक कट्टरता यामधील होते, सत्य विरुद्ध असत्य असे हे युद्ध होते. त्या युद्धाच्या एका बाजूला गुरु गोविंद सिंहजी हे दहावे गुरु होते आणि दुसरीकडे औरंगजेबाचे राज्य होते. त्यावेळी साहेबजादा वयाने लहान होते पण त्यामुळे औरंगजेब आणि त्याच्या क्रूरतेमध्ये कोणताही फरक पडला नाही. आपले गुरु सामान्य व्यक्ती नव्हते. तपस्या आणि त्यागाचे ते मूर्त स्वरूप होते. वीर साहेबजादा यांना त्यांच्याकडून हाच वारसा मिळाला. म्हणूनच चार साहेबजाद्यांपैकी एकही डगमगले नाहीत. साहेबजादा अजित सिंह यांचे शब्द अजूनही त्यांच्या शौर्याची कहाणी उद्धृत करतात. माझे नाव अजित आहे, माझ्यावर कोणी विजय मिळवू शकत नाही आणि जर कोणी विजय मिळवला तर मी पुन्हा जिवंत माघारी येणार नाही.

पोहोचवल्या. दिव्यांग शिवानी होसुरू या दिव्यांग व्यक्तीने आर्थिक आणि शारीरिक मर्यादांवर मात करून क्रीडा जगतात असाधारण कामगिरी केली आहे तर वैभव सूर्यवंशीने तीव्र स्पर्धा आणि विविध प्रतिभेने भरलेल्या क्रिकेट जगतात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करत असंख्य विक्रम प्रस्थापित केले आहेत. पुरस्कार प्राप्त करणाऱ्या सर्व बालकांनी एकापेक्षा एक सरस कामगिरी केली आहे.

पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्यांच्या उपस्थितीत वीर बाल दिन कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की यापैकी काही बालकांनी असीम शौर्य दाखवले आहे. काहींनी समाजसेवा आणि पर्यावरण क्षेत्रात प्रशंसनीय काम केले आहे. यातील काहींनी विज्ञान आणि तंत्रज्ञानात नवनवीन शोध लावले आहेत तर अनेक तरुण सहकारी क्रीडा, कला आणि संस्कृतीत योगदान देत आहेत. मी या पुरस्कार विजेत्यांना सांगू इच्छितो की हा सन्मान तुमचा तर आहेच पण तुमच्या पालकांच्या, तुमच्या शिक्षकांच्या आणि तुमच्या मार्गदर्शकांच्या कठोर परिश्रमाचा हा सन्मान आहे.

बालादपि ग्रहीतव्यं युक्तमुक्तं मनिषिभिः असे म्हटले जाते. म्हणजेच, जरी लहान बालकाने शहाणपणाचे काही वक्तव्य केले तरी ते स्वीकारले पाहिजे. म्हणजेच, वयाने कोणीही लहान किंवा मोठेही नसते. तुम्ही तुमची कृती आणि कामगिरीने महान बनता. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की लहान वयातही तुम्ही अशा गोष्टी साध्य करू शकता की इतर तुमच्याकडून प्रेरणा घेतील आणि तुम्ही हे दाखवून दिले आहे. या कामगिरीकडे फक्त एक सुरुवात म्हणून पाहिले पाहिजे. तुम्हाला अजून बराच पल्ला गाठायचा आहे. तुम्हाला अजूनही तुमचे स्वप्न घेऊन आसमंतात विहार करायचा आहे. ■



शांती विधेयक, 2025

# सुरक्षित, स्वच्छ आणि मजबूत भविष्याचा पाया

## 'आधी सुरक्षा, त्यानंतर उत्पादन'

*भारत नेट झिरो @2070 च्या वचनबद्धतेसह मार्गक्रमण करत आहे आणि तिला बळकटी देण्याबरोबरच वाढत्या ऊर्जेच्या मागणीची अखंडपणे पूर्तता करण्यासाठी 2047 पर्यंत 100 गीगावॅट अणुऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेनेही कार्यरत आहे. या संदर्भात संसदेने सस्टेनेबल हार्नेसिंग एंड एडवांसमेंट ऑफ न्यूक्लियर एनर्जी फॉर ट्रांसफॉर्मिंग इंडिया अर्थात शांती' (SHANTI) विधेयक-2025 मंजूर केले आहे जे जागतिक स्वच्छ ऊर्जेचा अवलंब करण्यात भारताचा आत्मविश्वास, वैज्ञानिक परिपक्वता आणि जबाबदारी स्पष्टपणे दर्शविते...*

शांती विधेयक, 2025 हे केवळ एक विधेयक नाही तर ते स्वच्छ उर्जेसह आपल्या जीवनशैलीत नवीन बदल घडवून आणणार आहे. हे विधेयक भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी सादर करण्यात आले आहे. या विधेयकाद्वारे भारत आपल्या अणुऊर्जा क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. या विधेयकाअंतर्गत खाजगी कंपन्या अणु प्रकल्पांचे संचालन, वीज उत्पादन, उपकरणे निर्मिती आणि काही निवडक उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतील तर त्यांची सुरक्षा आणि धोरणात्मक नियंत्रण सरकारकडे राहील. इतकेच नाही तर, किरणोत्सर्गाशी संबंधित सर्व उपक्रमांसाठी आवश्यक पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य असेल. हे विधेयक अणुऊर्जा अधिनियम, अणु नुकसानीसाठी नागरिक दायित्व (सी एल एन डी) अधिनियम, 2010 च्या तरतुदींना तर्कसंगत आणि एकत्रित करण्याचा प्रयत्न करते. हे अणुऊर्जा नियमन बोर्डाला कायदेशीर दर्जा प्रदान करते.

हे विधेयक आरोग्य सेवा, शेती, व्यापार, संशोधन आणि इतर शांततापूर्ण उपयोजनात अणू आणि किरणोत्सारी तंत्रज्ञानाच्या वापरासाठी एक नियामक चौकट प्रदान करते. यात संशोधन, विकास आणि नवोन्मेषाशी संबंधित कामकाजासारख्या मर्यादित क्रियान्वयनांना परवान्यातून सूट देण्यात आली आहे. परंतु नियमन स्वातंत्र्य आणि अधिकार मजबूत करण्यासाठी अणुऊर्जा नियामक मंडळाला (ए ई

## अणू सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नाही, विधेयकात सर्व काही स्पष्ट आहे

- आता सुरक्षेचा कायदा: सुरक्षितता आता केवळ एक चांगली परंपरा राहिलेली नाही तर एक कठोर कायदेशीर बांधिलकी आहे. सर्व सुरक्षितता नियम आता एकाच स्पष्ट आणि एकात्मिक कायद्यात समाविष्ट आहेत.
- "मजबूत आण्विक परीक्षण संस्था": शांती विधेयकामुळे अणुऊर्जा नियामक मंडळाला (ए ई आर बी ) कायदेशीर दर्जा मिळाला आहे. आता त्यांना कोणत्याही अणुऊर्जा प्रकल्पाची तपासणी करण्याचा, त्रुटी पडताळण्याचा आणि सुरक्षा मानके पूर्ण न झाल्यास त्वरित बंद करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.
- सर्वांसाठी समान नियम : खासगी कंपन्यांना देखील कठोर बहुस्तरीय परवाना प्रक्रिया पार पाडावी लागेल. जागेची निवड, बांधकाम करणे किंवा कामकाज सुरू करणे असो.
- नवीन पिढीच्या सुरक्षिततेवर भर : हे विधेयक लहान मॉड्यूलर अणुभट्ट्याना (SMRs) प्रोत्साहन देते, ज्यात मानवरहित सुरक्षा प्रणाली असते. ज्यामुळे मानवी चुकांचा धोका कमी होतो.
- स्पष्ट परवाना नियम : अणू प्रकल्प कोण उभारू शकते आणि चालवू शकते हे आता स्पष्टपणे परिभाषित केले आहे. जबाबदारी संपूर्णपणे स्पष्ट झाली आहे.
- उच्च जोखीम असलेली कामे केंद्र सरकारकडेच राहतील : शांती विधेयक काही क्षेत्रांमध्ये खाजगी सहभागाला परवानगी देते, परंतु इंधन चक्रासारखी अत्यंत संवेदनशील कामे केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली राहतील.
- प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता अनिवार्य : स्थापनेपासून ते प्रकल्प बंद करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर सुरक्षा तपासणी आता कायदेशीररित्या अत्यंत आवश्यक आहे.
- प्रत्येक काम सुरु करण्यापूर्वी परवानगी आवश्यक : किरणोत्सर्गाचा धोका निर्माण करू शकणाऱ्या कोणत्याही कामासाठी आधीच विशेष सुरक्षा परवानगी घेणे अनिवार्य असेल.



*शांती विधेयक मंजूर होणे हा आपल्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण परिवर्तनकारक क्षण आहे. ज्यांनी या विधेयकाला पाठिंबा दिला त्यांच्याप्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षित वापरासह हरित उत्पादन सक्षम करण्यापर्यंत हे विधेयक देश आणि जगाच्या स्वच्छ ऊर्जा भवितव्याला निर्णायक गती प्रदान करते. हे खाजगी क्षेत्र आणि आपल्या तरुणांसाठी असंख्य संधी देखील खुल्या करीत आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आर बी) औपचारिक कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे.

### भरपाईत कोणतीही कपात केली जाणार नाही

केंद्रीय मंत्री डॉ जितेंद्र सिंह यांनी स्पष्ट केले की लहान गुंतवणूकदारांची भागीदारी वाढविण्याच्या उद्देशाने टप्प्यानुसार दायित्व मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. नुकसानीची झळ पोहोचलेल्यांना भरपाई देताना कोणतीही कपात केली जाणार नाही. अपघातामुळे झालेले नुकसान कार्यान्वयकाच्या निर्धारित दायित्व मर्यादेहून अधिक असेल तर सरकार आणि सरकार उपलब्ध निधी तसेच आंतरराष्ट्रीय करारांद्वारे पूर्ण आणि प्रभावी स्वरुपात भरपाई देईल. एवढेच नाही तर 'आण्विक हानी'ची व्याख्या विस्तारित करून त्यात पर्यावरणीय हानीचा देखील स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे.

### आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढेल मात्र राष्ट्रीय हिताबाबत तडजोड नाही

भारत केवळ त्या आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतीचा अवलंब करेल ज्या देशाच्या विशिष्ट परिस्थिती आणि हितांशी संबंधित असतील. या प्रक्रियेत भारताची धोरणात्मक स्वायत्तता, राष्ट्रीय हितसंबंध किंवा पारंपरिक सामर्थ्याशी कोणत्याही प्रकारे तडजोड केली जाणार नाही. शांतता विधेयक केवळ नागरी अणुऊर्जेच्या वापरापुरते, मर्यादित आहे,

## गैरसमज वस्तुस्थिती

**गैरसमज : अणुऊर्जेमुळे वीज महाग होईल**

**वस्तुस्थिती:** अणुऊर्जा 24 **x** 7 विश्वासार्ह वीज पुरवते त्यामुळे इंधननिर्मिती खर्च स्थिर राहतो.

- 60 ते 80 वर्षांपर्यंत प्रकल्प चालतात म्हणजेच वीज बिल कालांतराने स्वस्त आणि स्थिर होईल.

**गैरसमज : ही सुधारणा फक्त मोठ्या उद्योगपतींसाठीच आहे**

**वस्तुस्थिती:** शांती विधेयक 2025 मुळे **MSME** आणि स्टार्टअपना नव्या संधी

- हजारो घटकांच्या पुरवठ्यात भागीदारी, **AI**, आरोग्य आणि नव्या उपकरणांवर नवोन्मेष
- संशोधनासाठी महागड्या संयंत्रांची गरज नाही

**गैरसमज : अणुऊर्जेचे खाजगीकरण होत आहे**

**वस्तुस्थिती:** खाजगीकरण नाही. आण्विक इंधनावर सरकारी नियंत्रण

- सुरक्षितता आणि देखरेखी सोबतच सरकार वापरल्या जाणाऱ्या इंधनावरही लक्ष ठेवेल
- खासगी कंपन्या गुंतवणूक आणि रोजगार आणतील

**गैरसमज : अणुऊर्जेने भारताच्या भवितव्याला धोका आहे**

**वस्तुस्थिती:** अणुऊर्जेमुळे प्रदूषण कमी होते आणि कोळसा आणि तेलावरील अवलंबित्व कमी होते

- हे इलेक्ट्रिक वाहने(**EV**), कृत्रिम बुद्धिमत्ता(**AI**) तसेच हरित हायड्रोजन सारख्या नवीन क्षेत्रांच्या विकासात मदत करते.

**गैरसमज : अणुऊर्जा केवळ विजेसाठीच आहे**

**वस्तुस्थिती:** कर्करोगावरील उपचार, अन्न सुरक्षा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याबरोबरच शेती सुधारणेतही अणुतंत्रज्ञानाचा वापर होतो. नव्या विधेयकामुळे अणुऊर्जा केवळ वीज निर्मितीच करणार नाही तर जीवनात व्यापक स्वरूपाचे बदल घडवून आणेल.

**गैरसमज : खाजगी कंपन्या सुरक्षिततेबाबत तडजोड करतील**

**वस्तुस्थिती:** कोणताही प्रकल्पचालक सरकारी परवाना, सुरक्षितता मंजुरी आणि अनिवार्य विम्याशिवाय नसेल.

- नियमांचे उल्लंघन केल्यास सरकार प्रकल्प बंद करू शकते किंवा प्रकल्प आपल्या नियंत्रणाखाली घेऊ शकते. सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड नाही.

> *मोदी सरकारच्या सर्वात मोठ्या विज्ञान सुधारणांपैकी एक म्हणून शांती विधेयक इतिहासात लक्षात ठेवले जाईल.*
>
> **-डॉ. जितेंद्र सिंह**
> **केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री**



ज्यात युरेनियम संवर्धन पातळी केवळ अणुभट्ट्यांच्या गरजेनुसार असेल. याचा कोणत्याही स्वरूपाच्या शस्त्रास्त्र स्तरीय कामकाजाशी काही संबंध नाही. शांतता विधेयक, 2025 आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी नवीन संधी प्रदान करेल. आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे अणुभट्ट्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा होईल तर अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापराकरिता आंतरराष्ट्रीय सहकार्याची स्पष्ट नियामक रूपरेषा या विधेयकात मांडण्यात आली आहे.

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि विकास (शांती) विधेयक, 2025 विकसित भारताच्या अणुऊर्जा प्रवासाच्या पुढील टप्प्यात प्रवेश करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. कायदेशीर चौकटीचे आधुनिकीकरण करून आणि संस्थात्मक देखरेख मजबूत करून ते अधिक कार्यक्षम, दूरदर्शी, नाविन्यपूर्ण आणि सुरक्षित अणुऊर्जा परिसंस्थेचा पाया रचते. हे विधेयक 2047 पर्यंत 100 गीगावॅट अणुऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या भारताच्या अभियानाला मजबूती देईल. जसजसा देश ऊर्जा स्वावलंबन आणि तांत्रिक प्रगतीकडे वाटचाल करत आहे, हा कायदा भारताच्या अणुऊर्जेच्या विकासाला आणि व्यापक ऊर्जा परिदृश्याला गती देण्यात निर्णायक भूमिका बजावू शकतो. ■



महान शिल्पकार राम वनजी सुतार यांचे निधन

# ज्यांच्या कलेने दगडांमध्ये फुंकले प्राण

**जन्म : 19 फेब्रुवारी 1925 | मृत्यू : 18 डिसेंबर 2025**

*गुजरात मध्ये जगातील सर्वात उंच पुतळा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' ची रचना करणारे प्रसिद्ध प्रतिष्ठित शिल्पकार राम वनजी सुतार यांचे 18 डिसेंबर 2025 रोजी निधन झाले. राम सुतार यांच्या कलेमुळे केवळ दगडाला आकार मिळाला नाही तर त्यात चेतनाही निर्माण झाली. ऐतिहासिक शिल्पांची निर्मिती करणारे राम सुतार यांनी अजिंठा आणि वेरूळ येथील मूर्तींच्या जीर्णोद्धारात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या असामान्य योगदानाने केवळ भारताचा कलात्मक आणि सांस्कृतिक वारसाच समृद्ध केला नाही तर त्यांच्या कलाकृती भावी पिढ्यांना निरंतर प्रेरणा देत राहतील.*

मुंबईच्या जे जे स्कूल आर्ट्स अँड आर्किटेक्चर मधून सुवर्णपदक प्राप्त केलेले राम सुतार यांचा जन्म 1925 मध्ये महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात झाला. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह इतर मान्यवरांनी शोक व्यक्त केला आणि त्यांच्या योगदानाचे स्मरण केले. राम सुतार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटरवर लिहिले की "राम सुतारजी यांच्या निधनाने मला अतीव दुःख झाले आहे. ते एक उत्कृष्ट शिल्पकार होते ज्यांच्या कलेने भारताला केवडिया येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी सह अनेक प्रतिष्ठित स्मारके दिली. भारताचा इतिहास, संस्कृती आणि सामूहिक भावनेची शक्तिशाली अभिव्यक्ती म्हणून त्यांच्या कलाकृतींचा कायमच गौरव केला जाईल. भावी पिढ्यांसाठी त्यांनी राष्ट्रीय सन्मानाला अमरत्व प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या कलाकृती कलाकारांना आणि नागरिकांना सारख्याच प्रमाणात प्रेरणा देत राहतील. त्यांच्या कुटुंबाला, चाहत्यांना आणि त्यांच्या उल्लेखनीय जीवनाने आणि कार्याने प्रभावित झालेल्या सर्वांविषयी माझ्याकडून मनःपूर्वक संवेदना. ओम शांती !"

सुतार यांना 1999 मध्ये पद्मश्री आणि 2016 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अलीकडेच त्यांना राज्याचा सर्वोच्च पुरस्कार असलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. संसद भवन परिसरातील ध्यान मुद्रेत आसनस्थ महात्मा गांधी आणि घोड्यावर स्वार छत्रपती शिवाजी यांचे प्रसिद्ध पुतळे त्यांच्या उत्कृष्ट कलाकृतींपैकी एक आहेत. मृत्यूसमयी त्यांचे वय 100 वर्षे होते.

त्यांच्या निधनाने भारतीय कला जगताचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचे वर्णन करताना केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह म्हणाले की देव त्यांच्या पुण्यात्म्याला श्रीचरणी स्थान देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना आणि चाहत्यांनाही दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

बेंगळूरूमध्ये नाडप्रभू केम्पेगौडा यांच्या 108 फूट उंच कांस्य पुतळ्याच्या निर्मितीतही राम सुतार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शिवाय भारतात आणि परदेशात असे असंख्य पुतळे आहेत ज्यांनी भारताला गौरव मिळवून दिला आहे आणि जे निर्माण करण्यात राम सुतार यांचे योगदान राहिले आहे. ■



जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान

# तीन देश, एक संदेश

## सहकार्य, विकास आणि विश्वास

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जॉर्डन, इथिओपिया आणि ओमानचा दौरा हा केवळ देशांच्या सीमा ओलांडण्याची गाथा नाही तर सामाजिक सुधारणा, संस्कृती आणि सहकार्याचे सेतू मजबूत करण्यासाठी एक महत्त्वाचा प्रवास आहे. या दौऱ्यादरम्यान झालेल्या संवाद आणि भेटीमध्ये सामायिक वारसा, धोरणात्मक भागीदारी आणि भविष्यातील शक्यतांना नवीन आयाम मिळाले आहेत. या भेटीने या देशांसोबत परस्पर सहकार्य, विश्वास आणि भागीदारीच्या एका नवीन अध्यायाला सुरुवात झाली आहे...*

भारत-जॉर्डन राजनैतिक संबंधाना 75 तर ओमान सोबत राजनैतिक संबंधांना 70 वर्षे पूर्ण झाली आहेत. याबरोबरच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इथिओपियाच्या पहिल्या भेटीसह या तीन देशांच्या दौऱ्यामुळे धोरणात्मक संबंधांना नवीन चालना मिळाली आहे. या भेटीदरम्यान परस्पर सहकार्य वाढवणे आणि ते मजबूत करणे, सामायिक विकास आणि समृद्धीसाठी नवीन संधी शोधणे तसेच प्रादेशिक शांतता, समृद्धी सुरक्षा आणि स्थैर्य वाढवणे यावर चर्चा झाली. 15 ते 18 डिसेंबर 2025 दरम्यान पंतप्रधान मोदी यांचा जॉर्डन, इथिओपिया आणि ओमानचा दौरा इतर अनेक बाबतीतही महत्त्वपूर्ण होता.

दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान मोदी जॉर्डनमध्ये पोहोचले जिथे जॉर्डनचे पंतप्रधान डॉक्टर जाफर हसन यांनी ओमान विमानतळावर त्यांचे स्वागत केले. भारतीय पंतप्रधानांचा 37 वर्षांच्या कालावधीनंतर जॉर्डनचा हा पूर्ण द्विपक्षीय दौरा होता. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी

### भारत आणि जॉर्डन यांच्यात सामंजस्य करारांवर झाल्या स्वाक्षऱ्या

- नवीन आणि नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात तांत्रिक सहकार्य
- जल संपदा व्यवस्थापन आणि विकास क्षेत्रात सहकार्य
- पेट्रा आणि एलोरा यांच्यातील जुळ्या व्यवस्थेच्या क्षेत्रांमधील करार
- वर्ष 2025-2029 या वर्षासाठी सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाचे नूतनीकरण
- डिजिटल परिवर्तनासाठी लोकसंख्या पातळीवर कार्यान्वित केलेले यशस्वी डिजिटल उपाय सामायिक करण्याच्या क्षेत्रात सहकार्य

यांनी जॉर्डनचे शाह अब्दुल्ला द्वितीय यांचीही भेट घेतली. जॉर्डनचे शाह यांनी दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईला पाठिंबा दर्शविला आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला. दोन्ही नेत्यांमध्ये व्यापार

## भारत-जॉर्डन संयुक्त निवेदन

- **राजकीय संबंध** : दोन्ही देशांनी सहकार्य वाढविण्यासाठी आणि विकासाशी संबंधित आपापल्या आकांक्षांना पुढे नेण्यासाठी विश्वासार्ह भागीदार म्हणून एकत्र उभे राहण्यावर सहमती व्यक्त केली. राजकीय सल्लामसलतीची पाचवी फेरी नवी दिल्ली इथे आयोजित केली जाईल.
- **आर्थिक सहकार्य**: भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला आहे. आर्थिक आणि व्यापारी संबंधांतील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी 2026 च्या पहिल्या सहामाहीत 11 व्या व्यापारी आणि आर्थिक संयुक्त समितीची बैठक आयोजित करण्यावर सहमती झाली.
- **तंत्रज्ञान आणि शिक्षण**: डिजिटल तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेण्यात आला. सुरक्षित, विश्वासार्ह आणि समावेशक डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी सहकार्य वाढविण्यावर सहमती झाली.
- **आरोग्य**: टेलि-मेडिसिनला प्रोत्साहन तसेच आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळाला प्रशिक्षण यासाठी क्षमता बांधणी करण्यासाठी तज्ज्ञांमध्ये समन्वय साधण्याबाबत सहमती झाली.
- **कृषी**: अन्नसुरक्षा आणि पोषण वाढविण्यामध्ये कृषी क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका मान्य करण्यात आली. या क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी संयुक्त वचनबद्धता व्यक्त करण्यात आली.
- **हरित आणि शाश्वत विकास**: हवामान बदल, तसेच पर्यावरण आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर आणि नव्या व नवीकरणीय ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यावर चर्चा झाली. नव्या व नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात तांत्रिक सहकार्याचा करार करण्यात आला.
- **सांस्कृतिक सहकार्य**: 2025-2029 या कालावधीसाठी सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रमावर दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली. संगीत, नृत्य, नाट्य, कला, अभिलेखागार, वाचनालय आणि साहित्यासह सणोत्सवांमध्ये सहयोग.



- **बहुपक्षीय सहकार्य**: उत्सर्जन कमी करण्याच्या वचनाची पूर्तता करणे तसेच दोन्ही देशांच्या जनतेसाठी अधिक आर्थिक आणि सामाजिक विकास करण्याच्या दृष्टीने जैवइंधनाला शाश्वत, कमी कार्बन उत्सर्जन करणारा पर्याय म्हणून मान्यता देण्यात आली.

आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, नवीकरणीय ऊर्जा, खते आणि शेती, नवोन्मेष, माहिती तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा, आरोग्य आणि फार्मा, पर्यटन, विकास, संस्कृती आणि लोकांमधील परस्पर संबंध या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक बळकट करण्यावर चर्चा झाली. भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश आहे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की पुढील पाच वर्षांत दोन्ही देशांमधील परस्पर व्यापाराचे लक्ष्य पाच अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवायचे आहे. ते म्हणाले की औषधे आणि वैद्यकीय उपकरणांच्या क्षेत्रात भारताची क्षमता आणि जॉर्डनची अनुकूल भौगोलिक स्थिती एकमेकांना पूरक ठरू शकते. त्याचबरोबर भारताच्या हरित उपक्रमांचा उल्लेख करत पंतप्रधान मोदींनी नवीकरणीय ऊर्जा, हरित वित्तपुरवठा आणि जल पुनर्चक्रण या क्षेत्रांमध्ये भारत-जॉर्डन यांच्यात अधिक व्यापारी सहकार्याचा प्रस्ताव मांडला. जॉर्डन हा भारतासाठी खतांचा एक महत्त्वाचा पुरवठादार आहे. दोन्ही देशांच्या कंपन्यांनी भारतातील फॉस्फेटिक खतांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जॉर्डनमध्ये मोठ्या गुंतवणुकीवर चर्चा केली. राजा अब्दुल्ला द्वितीय यांनी सांगितले की जॉर्डनचा मुक्त व्यापार करार आणि भारताची आर्थिक ताकद एकत्र आणून दक्षिण आशिया आणि पश्चिम आशिया तसेच त्यापुढील प्रदेशांदरम्यान आर्थिक मार्गिका निर्माण करता येऊ शकतात.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा



## इथिओपियाचा दौरा...

# 5 अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीतून रोजगाराच्या 75 हजार संधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इथिओपियाचे पंतप्रधान डॉ. अबी अहमद यांची राष्ट्रीय राजवाड्यात भेट आणि बैठक झाली. या चर्चेदरम्यान दोन्ही नेत्यांनी भारत-इथिओपिया संबंधांना धोरणात्मक भागीदारीच्या स्तरावर नेण्यावर सहमती दर्शवली. 2023 मध्ये जी-20 च्या अध्यक्षतेदरम्यान आफ्रिकी संघाचा सदस्य म्हणून समावेश करणे हे भारतासाठी विशेष सन्मानाचे होते, यावर पंतप्रधान मोदी यांनी भर दिला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर एकजूट दर्शवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी इथिओपियाचे आभार मानले.

दोन्ही नेत्यांनी व्यापार-गुंतवणूक, नवोन्मेष व तंत्रज्ञान, शिक्षण आणि क्षमता बांधणी, संरक्षण सहकार्य यांसह विविध क्षेत्रांमध्ये भारत आणि इथिओपिया यांच्यातील बहुआयामी भागीदारीतील प्रगतीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की भारतीय कंपन्यांनी इथिओपियाच्या अर्थव्यवस्थेत पाच अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक केली असून त्यामुळे मुख्यतः उत्पादन आणि औषधनिर्माणासारख्या क्षेत्रांमध्ये 75 हजारांहून अधिक स्थानिक रोजगार निर्माण झाले आहेत. दोन्ही पंतप्रधानांनी 'ग्लोबल साऊथ'मधील समस्या मांडण्यासाठी संयुक्तपणे कार्य करण्याची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. संयुक्त राष्ट्रांसह बहुपक्षीय मंचांवर सहकार्याबाबत चर्चा झाली. हवामान बदल, नवीकरणीय ऊर्जा आणि आपत्ती जोखीम कमी करणे यासारख्या विषयांवर अधिक सहकार्याचे आवाहन करण्यात आले.

## पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त सत्रात इथिओपियाच्या संसदेला केले संबोधित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 17 डिसेंबर रोजी इथिओपियाच्या संसदेला संयुक्त सत्रात संबोधित केले. या प्रसंगी बोलताना दोन्ही देश प्राचीन ज्ञानाला आधुनिक महत्त्वाकांक्षांशी जोडतात, यावर पंतप्रधान मोदी यांनी यावर जोर दिला. या संदर्भात त्यांनी नमूद केले की भारताचे राष्ट्रगीत "वंदे मातरम्" आणि इथिओपियाचे राष्ट्रगीत – दोन्ही आपापल्या भूमीला माता म्हणून संबोधित करतात. दोन्ही देशांच्या सामायिक संघर्षांबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की 1941 मध्ये इथिओपियाच्या स्वातंत्र्यासाठीच्या लढाईत भारतीय सैनिकांनी तिथल्या सैनिकांबरोबर योगदान दिले होते. इथिओपियाच्या लोकांच्या बलिदानाचे प्रतीक असलेल्या अदवा विजय स्मारकाला श्रद्धांजली अर्पण करणे ही त्यांच्यासाठी सन्मानाची बाब आहे.

पंतप्रधान मोदी यांनी भारत-इथिओपिया भागीदारी अधिक मजबूत करण्याबाबत भारताची वचनबद्धता अधोरेखित करत "वसुधैवकुटुंबकम्" या तत्त्वाची चर्चा केली. कोविड-19 साथीच्या काळात इथिओपियाला लस पुरवठा करणे ही भारतासाठी सौभाग्याची बाब ठरल्याचे त्यांनी नमूद केले. दहशतवादाविरोधातील जागतिक लढा अधिक मजबूत करण्यासाठी एकजूट दर्शविल्याबद्दल त्यांनी इथिओपियाचे आभार मानले.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

## इथिओपिया दौऱ्याचे परिणाम...

- द्विपक्षीय संबंधांना "धोरणात्मक भागीदारी"च्या स्तरावर नेणे.
- सीमाशुल्क प्रकरणांमध्ये सहकार्य आणि परस्पर प्रशासकीय सहाय्याबाबत करार.
- इथिओपियाच्या परराष्ट्र मंत्रालयात डेटा सेंटर स्थापन करण्याबाबत करार.
- संयुक्त राष्ट्र शांतता-रक्षण मोहिमांच्या प्रशिक्षणात सहकार्य करण्याबाबत करार.
- जी-20 संयुक्त चौकटीअंतर्गत इथिओपियाशी संबंधित कर्ज पुनर्रचनेबाबत करार.
- आयसीसीआर शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत इथिओपियातील हुशार अभ्यासकांसाठी शिष्यवृत्ती दुप्पट करणे.
- आयटीईसी कार्यक्रमांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात इथिओपियातील विद्यार्थी व व्यावसायिकांसाठी विशेष अल्पकालीन अभ्यासक्रम.
- अदीस अबाबामधील महात्मा गांधी रुग्णालयात मातेचे आरोग्य व नवजात शिशु संगोपन यात क्षमता बांधणीसाठी भारत मदत करणार.



# पंतप्रधान मोदी यांचा इथिओपिया आणि ओमानकडून सन्मान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इथिओपियाचे पंतप्रधान डॉ. अबी अहमद यांनी त्या देशाचा सर्वोच्च सन्मान "ग्रेट ऑनर निशान ऑफ इथिओपिया" प्रदान केला; तर ओमानचे सुलतान हॅथम बिन तारिक यांनी भारत-ओमान संबंधांमधील असामान्य योगदान आणि जागतिक पटलावरील दूरदर्शी नेतृत्वासाठी पंतप्रधान मोदींना "ऑर्डर ऑफ ओमान" या त्यांच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले. हा पुरस्कार परस्पर भागीदारी अधिक मजबूत करण्यामधील पंतप्रधान मोदी यांच्या असामान्य योगदानासाठी आणि जागतिक नेते म्हणून त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी देण्यात आला. पंतप्रधान मोदी यांनी हा पुरस्कार भारत आणि इथिओपियामधील द्विपक्षीय संबंध शतकानुशतके दृढ करणाऱ्या सर्व लोकांना समर्पित केला आहे.



## भारत-ओमान संबंधांचा पुढील मार्ग सुलभ

### व्यापक आर्थिक भागीदारी करा

- घनिष्ठ, निकट आर्थिक आणि व्यापारी संबंध अधिक मजबूत करणे त्यांचा विकास साध्य करणे.
- व्यापारातील अडथळे कमी करून स्थिर चौकट तयार करणे, ज्यामुळे दोन्ही देशांतील व्यापारात वाढ होईल.
- अर्थव्यवस्थेतील सर्व प्रमुख क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध करून देणे, आर्थिक विकासाला चालना देणे, रोजगारनिर्मिती आणि गुंतवणुकीचा ओघ वाढविणे.

### सागरी वारसा आणि संग्रहालयांच्या क्षेत्रातील करार

- लोथल इथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुलासह सागरी संग्रहालयांना पाठबळ देण्यासाठी सहकार्यात्मक भागीदारीची स्थापना.
- सामायिक सागरी वारसा संवर्धन, पर्यटनाला चालना देणे आणि द्विपक्षीय सांस्कृतिक संबंध मजबूत करण्यासाठी कलाकृती आणि विद्वत्तेची देवाणघेवाण, संयुक्त प्रदर्शने, संशोधन आणि क्षमता बांधणीची व्यवस्था.

### कृषी आणि संबंधित क्षेत्रांतील करार

- कृषी क्षेत्राबरोबरच पशुपालन आणि मत्स्यपालनाशी संबंधित क्षेत्रांसाठी समावेशक आराखडा दस्तऐवज
- कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती, बागायती, एकात्मिक कृषी प्रणाली आणि सूक्ष्म सिंचन क्षेत्रांत सहकार्य.

### उच्च शिक्षण क्षेत्रातील करार

- मानवी तसेच सामाजिक-आर्थिक विकासाशी संबंधित उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि नवीन प्रणाली विकसित करण्यासाठी संयुक्त संशोधनाचा निर्णय.

### श्री अन्न (भरड धान्ये) उत्पादन आणि कृषी क्षेत्रातील सहकार्य अंमलबजावणी कार्यक्रम

- श्री अन्नाच्या उत्पादन, संशोधन आणि संवर्धनासाठी भारताची वैज्ञानिक विद्वत्ता आणि ओमानची अनुकूल कृषी-हवामान परिस्थिती यांचा उपयोग करून सहकार्याची चौकट उभारणे.

### सागरी सहकार्यावरील संयुक्त दूरदृष्टी दस्तऐवज स्वीकारणे

- प्रादेशिक सागरी सुरक्षा, निळी अर्थव्यवस्था आणि सागरी संसाधनांच्या निरंतर वापराच्या क्षेत्रात सहकार्य अधिक मजबूत करणे.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

## भारत-ओमानचे सामायिक भविष्य

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मस्कत इथे आयोजित 'भारत-ओमान व्यापार मंचा'ला संबोधित केले. यामध्ये दोन्ही देशांचे ऊर्जा, कृषी, पुरवठा व्यवस्थापन, पायाभूत सुविधा, उत्पादन, आरोग्य, वित्तीय सेवा, हरित विकास, शिक्षण आणि संपर्क या क्षेत्रांतील प्रमुख व्यापारी प्रतिनिधी सहभागी झाले होते. पंतप्रधान मोदी यांनी मांडवी ते मस्कत दरम्यान शतकानुशतके चालत आलेल्या सागरी व्यापार संबंधांचा उल्लेख केला. ते ऐतिहासिक संबंध हाच आज अस्तित्वात असलेल्या द्विपक्षीय व्यापारी देवाणघेवाणीचा मजबूत पाया आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांनी उद्योजकांना भारत-ओमान व्यापक आर्थिक भागीदारी करारा (सीईपीए) चा पूर्ण क्षमतेने उपयोग करून घेण्याचे आवाहन केले. हा भारत-ओमानच्या सामायिक भविष्याचा आराखडा असल्याचे त्यांनी सांगितले. धोरणात्मक सुधारणा, सुशासन आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाच्या बळावर भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. त्यांनी भारत-ओमान कृषी-नवोन्मेष केंद्र आणि भारत-ओमान नवोन्मेष सेतू निर्माण करण्याचा प्रस्ताव मांडला. ते म्हणाले की या केवळ कल्पना नाहीत; तर गुंतवणूक करण्याचे, नवोन्मेष करण्याचे आणि एकत्रितपणे भविष्य घडविण्याचे आमंत्रण आहे.




## भारत-ओमान संबंधांच्या केंद्रस्थानी 'ज्ञान'


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मस्कत इथे भारतीय समुदायाला संबोधित केले. ओमानमध्ये राहणाऱ्या भारताच्या विविध भागांतील लोकांना भेटून आपल्याला अत्यंत आनंद झाला आहे, असे ते म्हणाले. विविधता हे भारतीय संस्कृतीचे पायाभूत मूल्य आहे. या मूल्यामुळे भारतीय ज्या समाजात राहतात, तिथे त्या समाजाचा भाग बनतात, त्यामध्ये मिळून मिसळून राहणे ही गोष्ट त्यांना या खास भारतीय मूल्यामुळे सहज जमते. भारत आणि ओमान यांच्यात शतकानुशतके जुने संबंध आहेत. आज हे संबंध प्रवासी भारतीयांच्या कठोर परिश्रम आणि एकजुटीमुळे अधिक मजबूत होत आहेत. 'ज्ञान' हा घटक भारत-ओमान संबंधांच्या केंद्रस्थानी राहिला आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. त्यांनी ओमानमधील भारतीय शाळांना 50 वर्षे झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तेथील भारतीय समुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी तेथील विद्यार्थ्यांना इस्रोच्या 'युविका' या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. हा कार्यक्रम विशेषतः युवांसाठी आहे.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा







# गरीब रुग्णांचे तारणहार

*आपल्या जीवनकाळात लाखो लोकांवर उपचार करणारे डॉक्टर मुनीश्वर चंद्र डावर महागाईच्या या काळातही केवळ 20 रुपये इतके अत्यल्प शुल्क घेत असत. याच कारणामुळे मध्य प्रदेशातील लोक सेनेतून निवृत्त झालेल्या डॉक्टर मुनीश्वर चंद्र डावर यांना गरिबांसाठी धरतीवर प्रकटलेला देव मानत. गरीब रुग्णांचे तारणहार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुनीश्वर चंद्र डावर यांना समाजाप्रती निःस्वार्थ सेवाभाव तसेच वैद्यकीय योगदानासाठी 2023 मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांची जनसेवेची भावना पुढील पिढ्यांनाही निरंतर प्रेरणा देत राहील.*

**जन्म : 16 जानेवारी, 1946 ■ मृत्यू: 4 जुलै 2025**

जनसेवेलाच जीवनाचे ध्येय मानणाऱ्या मुनीश्वर चंद्र डावर यांचा जन्म 16 जानेवारी 1946 रोजी फाळणीपूर्व अखंड भारतात झाला. त्यांचे जन्मगाव आता पाकिस्तानात आहे. फाळणीनंतर त्यांचे कुटुंब भारतात आले. 1967 मध्ये त्यांनी जबलपूर इथून वैद्यकीय पदवी प्राप्त केली आणि लोकांच्या सेवेत स्वतःला झोकून दिले. नंतर ते भारतीय सैन्यात दाखल झाले आणि 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात जवळपास एक वर्ष ते सैन्यात कार्यरत होते. युद्धकाळात बांग्लादेशमध्ये नियुक्तीवर असताना त्यांनी अनेक जखमी जवानांवर उपचार केले. युद्ध संपल्यानंतर तब्येतीच्या कारणामुळे त्यांनी सैन्यातून लवकरच निवृत्ती घेतली. त्यांनतर 1972 मध्ये त्यांनी जबलपूरमध्ये रुग्णसेवा करण्याचा निर्णय घेतला आणि स्वतःचा दवाखाना सुरू केला. अवघे 2 रुपये शुल्क घेऊन त्यांनी रुग्णांवर उपचार करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून जवळपास पाच दशके ते रुग्णसेवेत समर्पित राहिले.

आपल्या एका शिक्षकाकडून मिळालेला धडा डॉक्टर डावर यांनी आयुष्यभर मूलमंत्र म्हणून जपला. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना सांगितले होते की वैद्यकीय व्यवसाय हा लोकांची सेवा करण्यासाठी आहे, त्यांचे रक्त शोषण्यासाठी नव्हे. या शब्दांनी त्यांच्या आयुष्याची दिशा बदलली. स्वस्त आणि योग्य उपचारांची हमी असल्यामुळे त्यांच्या दवाखान्यात नेहमीच रुग्णांची मोठी गर्दी असायची. लोकांची सेवा करणे हाच त्यांचा एकमेव उद्देश होता. सेवेप्रती त्यांची निष्ठा इतकी प्रबळ होती की ते सलग 50 वर्षे उपचार करीत राहिले. सुरुवातीला ते रुग्णांकडून केवळ 2 रुपये शुल्क घेत असत. शुल्काची ही रक्कम हळूहळू वाढून 5, 10, 15 आणि 20 रुपये इतकी झाली. स्वस्त उपचारांसाठी ओळखले जाणारे डॉक्टर डावर दवाखान्याबरोबरच व्यसनमुक्तीसाठी अभियानही चालवित असत. सामाजिक मुद्द्यांबाबत ते जागरूक होते.

2023 मध्ये डॉक्टर डावर यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. याशिवाय त्यांना इतर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. जबलपूरच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर डावर यांची खास भेट घेतली होती. त्या वेळी त्यांनी डॉक्टर डावर यांची प्रकृती आणि कामकाजाबाबत विचारपूस केली. पंतप्रधान मोदी म्हणाले होते की जबलपूर आणि आसपासच्या भागात अनेक गरीब आणि वंचित लोकांच्या उपचारासाठी डॉक्टर डावर यांनी केलेल्या प्रयत्नांचे अनेक जण कौतुक करतात. एप्रिल 2024 मध्ये जे. पी. नड्डा यांनीही डॉक्टर डावर यांची त्यांच्या घरी भेट घेतली होती. सेवा, समर्पण आणि करुणेचे प्रतीक असलेल्या डॉक्टर डावर यांचे 4 जुलै 2025 रोजी निधन झाले. ■

# वैश्विक पुस्तक मेळावा 2026

## भारतीय सैन्याचा इतिहास - शौर्य आणि प्रज्ञा@75 यावर केंद्रित

या वर्षीचा पुस्तक मेळावा स्वातंत्र्यानंतर देशासाठी भारतीय सैन्याने दिलेल्या योगदानाला समर्पित आहे. याचा विषय "भारतीय सैन्याचा इतिहास - शौर्य आणि प्रज्ञा @75" असा आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने दाखविलेल्या पराक्रमानंतर हे आयोजन वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 1972 मध्ये सुरू झालेला हा मेळावा आता जागतिक साहित्यिक दिनदर्शिकेतील एक महत्त्वाचा कार्यक्रम बनला आहे. तो पुस्तके आणि वाचक यांच्यातील अंतर कमी करण्याचे काम करीत आहे. या मेळ्यात प्रकाशक, लेखक, संशोधक आणि विविध वयोगटांतील वाचक एकाच छताखाली एकत्र येतात. मागील काही दशकांत हा पुस्तक मेळावा केवळ पुस्तकांचा बाजार न राहता, विचार आणि संवाद यांना सामावून घेणारे तसेच भारतीय ज्ञान परंपरेच्या सादरीकरणाचे जागतिक व्यासपीठ बनले आहे.

या वर्षी पुस्तक मेळाव्याची 53 वी आवृत्ती 10 जानेवारी रोजी भारत मंडपम्, नवी दिल्ली इथे सुरू झाली असून हा मेळावा 18 जानेवारीपर्यंत चालणार आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यास, शिक्षण मंत्रालय यांच्या वतीने आयोजित या वैश्विक पुस्तक मेळाव्यात आयोजित 600 हून अधिक कार्यक्रमांमध्ये 1,000 वक्ते सहभागी होत आहेत. यामध्ये 35 देशांचे प्रतिनिधित्व करणारे 1,000 पेक्षा अधिक प्रकाशक सहभागी झाले आहेत. या वर्षीच्या पुस्तक मेळाव्यात जल, वायू आणि भू या तिन्ही सेना दलांना भारताच्या सुरक्षेचे पहिले घटक म्हणून नव्हे, तर राष्ट्राच्या एकतेचे स्तंभ म्हणून संयुक्त स्वरूपात सादर करण्यात आले आहे. या मेळाव्यात भारतीय सेनेचा इतिहास, सुरक्षा आणि रणनीती यावर आधारित 500 पुस्तकांचा समावेश आहे. यातील अनेक पुस्तके सेना दलांमध्ये सेवेत असलेल्या तसेच त्यांतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी लिहिलेली आहेत.



*जेव्हा नागरिक वाचतात, तेव्हा राष्ट्र प्रगती करते.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




### पंतप्रधान युवा लेखक मार्गदर्शन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात 43 युवा लेखकांची निवड

शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी) भारत मार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान युवा लेखक मार्गदर्शन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात 43 युवा लेखकांची निवड करण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश नवोदित लेखकांची निवड करून त्यांना प्रशिक्षणाच्या संधी, संपादकीय सहाय्य आणि स्वतःचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करणे हा आहे. यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ला अनुरूप लेखन आणि विचारांच्या माध्यमातून युवा लेखकांना राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्यासाठी प्रेरणा मिळेल. या टप्प्यात राष्ट्रीय स्तरावर 30 वर्षे वयाखालील 43 लेखकांची निवड करण्यात आली आहे. हे लेखक 22 अधिकृत भारतीय भाषा आणि इंग्रजी भाषांमधील पुस्तक प्रस्तावांच्या आधारे निवडले गेले आहेत. निवड झालेल्या नवोदित 43 लेखकांमध्ये 19 महिला आणि 24 पुरुष लेखकांचा समावेश आहे. या लेखकांच्या पुस्तकांचे प्रस्ताव प्रसिद्ध विद्वानांच्या सहा महिन्यांच्या मार्गदर्शनानंतर पुस्तकरूपात विकसित केले जाणार आहेत. निवड झालेल्या प्रत्येक लेखकाला दरमहा 50,000 रुपये शिष्यवृत्ती आणि प्रकाशित पुस्तकावर आजीवन 10 टक्के रॉयल्टी दिली जाणार आहे.



Narendra Modi
@narendramodi

ICMR अर्थात इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या अलीकडच्या एका अहवालात नमूद करण्यात आले आहे की निमोनिया आणि यूटीआयसारख्या रोगांवर अँटिबायोटिक औषधे फारशी उपायकारक ठरेनाशी झाली आहेत. अविचाराने अँटिबायोटिक औषधांचे सेवन हे याचे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे मी आग्रहाने सांगतो की डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक औषधे घेऊ नका. #MannKiBaat



Rajnath Singh

भारताच्या समृद्ध सागरी वारशासाठी अभिमानास्पद क्षण! प्राचीन भारतीय 'स्टिच्डशिप' तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले भारतीय नौदलाचे जहाज आयएनएसव्ही कौंडिण्य #IndianNavy ची नौका गुजरातमधील पोरबंदर इथून ओमानमधील मस्कतपर्यंत ऐतिहासिक प्रवासासाठी रवाना झाले आहे. हे जहाज वारसा, कौशल्यपूर्ण कारागिरी आणि चिरस्थायी मैत्रीचा सशक्त संदेश घेऊन निघाले आहे.



Amit Shah
@AmitShah

भारतीय भाषांच्या सन्मानाच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल! आपल्या संविधानाचे संथाली भाषेत प्रकाशन ही संथाली समाजासह संपूर्ण देशासाठी गौरवाची बाब आहे. अलचिकी लिपीत प्रकाशित झालेली संविधानाची प्रत त्यातील आदर्श आणि मूल्ये आदिवासी समुदायापर्यंत अधिक स्पष्टपणे पोहोचवेल आणि आपल्या संविधानकर्त्यांचे स्वप्न साकार करेल. या ऐतिहासिक पावलासाठी मोदीजींचे मनःपूर्वक आभार.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

पंतप्रधान नरेंद्र मोदी @narendramodi जी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली #IndiaOmanCEPA हा भारताच्या व्यापार प्रवासातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा टप्पा ठरला आहे.
बाजारपेठेतील वाढीव हजेरीमुळे प्लास्टिक, फर्निचर, अभियांत्रिकी वस्तू, औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि वाहन क्षेत्रात भारताच्या निर्यातवाढीला चालना मिळेल.



Piyush Goyal

भारतात संकल्पनेची मांडणी करा, नवोन्मेष भारतात, उत्पादन भारतात, मात्र जगासाठी उत्पादन करा – पंतप्रधान @NarendraModi जी
ट्रेड मार्क्स कायदा, 1999, गेली 26 वर्षे नवोन्मेषक आणि सर्जकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. यासोबतच, नवोन्मेष परिसंस्थेला चालना देण्यासाठी मोदी सरकारने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे जागतिक बौद्धिक संपदा (आयपी) क्षेत्रात भारताची स्थिती मजबूत झाली असून नवोन्मेषावर आधारित वाढीला प्रोत्साहन मिळाले आहे. याचा लाभ केवळ भारतालाच नव्हे; तर संपूर्ण जगाला होत आहे.



Ashwini Vaishnaw
@AshwiniVaishnaw

तयार उत्पादनांपासून घटकांपर्यंत – उत्पादन वाढत आहे. निर्यात वाढत आहे. जागतिक कंपन्यांचा विश्वास वाढला आहे. भारतीय कंपन्या स्पर्धात्मक बनत आहेत. रोजगार निर्माण होत आहेत. ही आहे "मेक इन इंडिया"ची प्रभावी यशोगाथा!



पहली समुद्री यात्रा पर ओमान रवाना हुआ नौसेना का इंजन रहित जहाज कौण्डिन्य

हवा व पालों की सहायता से समुद्र में आगे बढ़ेगा जहाज, समुद्री धरोहर के पुनर्जीवन पर पीएम ने जताई खुशी

विकसित भारत के लिए विनिर्माण को प्रोत्साहन दें सभी राज्य : पीएम मोदी

पीएम के सवाल पर ज्योति बोलीं-यहां तक पापा के ही प्रण से पहुंची

राष्ट्रपति मुर्मु से प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्राप्त करती ज्योति

जासं, सिरसा : राष्ट्रपति द्रौपदी मुर्मु के हाथों प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार ग्रहण करते समय 17 वर्षीय ज्योति की आंखों में आत्मविश्वास, शब्दों में कृतज्ञता साफ झलक रही थी। नई दिल्ली के भारत मंडपम में संवाद के दौरान पीएम मोदी ने जब पूछा- क्या पापा ने खेलने में सपोर्ट किया तो ज्योति का उत्तर केवल निजी अनुभव नहीं, बल्कि सामाजिक रूढ़ियों पर सधा

अर्जुन ने नंबर-1 कार्लसन को हराया, बनाई संयुक्त बढ़त

विश्व ब्लिट्ज शतरंज : 11 दौर में जीतीं आठ बाजियां

मोदी ने हंपी और अर्जुन के समर्पण को सराहा

पीएम ने मन की बात में जताई थी चिंता
एंटीबायोटिक केवल डॉक्टर की सलाह पर ही लें: एम्स निदेशक

भास्कर न्यूज | नई दिल्ली

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने मन की बात के 129वें एपिसोड में एंटीमाइक्रोबियल रेजिस्टेंस (एएमआर) यानी एंटीबायोटिक दवाओं के बेवजह इस्तेमाल पर चिंता जताई। प्रधानमंत्री के संदेश के बाद एम्स डायरेक्टर डॉ. एम श्रीनिवास ने एंटीबायोटिक के सही इस्तेमाल को लेकर अहम सलाह दी है।

एम्स निदेशक डॉ. एम श्रीनिवास ने कहा, यह बेहद जरूरी है कि एंटीबायोटिक सिर्फ डॉक्टर के परामर्श पर ही ली जाए। आमतौर पर अधिकतर संक्रमण वायरल होते हैं और एंटीबायोटिक वायरस पर काम नहीं करती है। एंटीबायोटिक केवल सेकेंडरी बैक्टीरियल इंफेक्शन में ही असरदार होती हैं। वायरस और बैक्टीरिया अलग-अलग होते हैं, इसलिए वायरल बीमारियों के लिए एंटीवायरल दवाएं इस्तेमाल की जाती हैं, न कि एंटीबायोटिक। स्वास्थ्य विशेषज्ञों के मुताबिक, बिना जरूरत और बिना डॉक्टर की सलाह के एंटीबायोटिक लेने से एंटीमाइक्रोबियल रेजिस्टेंस तेजी से बढ़ रहा है। इसका मतलब है कि भविष्य में यही दवाएं असर करना बंद कर सकती हैं, जो आज जान बचा रही हैं। डॉ. श्रीनिवास ने कहा, अगर लोग हर बुखार, सर्दी या खांसी में खुद से एंटीबायोटिक लेना बंद नहीं करेंगे, तो आने वाले समय में गंभीर संक्रमण का इलाज और मुश्किल हो जाएगा।

ऑपरेशन सिंदूर देश का गर्व बना, दुनिया को दिखाई ताकत : मोदी

मन की बात : प्रधानमंत्री ने 2025 की उपलब्धियों का किया जिक्र, कहा-युवा शक्ति के कारण पूरी दुनिया की हमसे बड़ी उम्मीदें

## प्रयत्नांना बळकटी...

# जवळपास 100 रामसर स्थळे

*पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात भारताने आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. राजस्थानातील अलवर स्थित सिलिसेढ जलाशय आणि छत्तीसगडमधील बिलासपूर स्थित कोपरा जलाशय यांना आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या जलमय भूमी म्हणजेच रामसर स्थळाचा दर्जा मिळाला आहे. ही बाब भारताच्या निसर्ग संवर्धन आणि संरक्षणासाठी प्रयत्नांप्रती वचनबद्धता आणि निश्चय दर्शविते. हे समृद्ध जैवविविधता, जलाशयांचे संरक्षण, हवामान सुरक्षा आणि शाश्वत उपजीविका सुनिश्चित करण्याच्या दिशेने राष्ट्राच्या सामूहिक प्रयत्नांचे एक स्तुत्य पाऊल आहे....*

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जैवविविधता आणि अमृत वारसा संवर्धनाच्या क्षेत्रात वेगाने आगेकूच करीत आहे. यामुळे देशातील रामसर स्थळांची संख्या आता जवळपास 100 पर्यंत पोहोचली आहे.

### भारतात सध्या रामसर स्थळांची संख्या


26
2014

269%
वाढ


96
2025

### देशात रामसर स्थळांची व्याप्ती

**13.61** लाख हेक्टरांहून अधिक क्षेत्रावर 26 राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये रामसर स्थळे आहेत.



कोपरा जलाशय (बिलासपूर, छत्तीसगढ़)



सिलीसेढ जलाशय (अलवर, राजस्थान)

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय. - DELHIN/ 2020/ 78812, 16–31 जानेवारी, 2026

आर.एन.आय.- DELHIN/ 2020/ 78812, दिल्ली पोस्टल परवाना क्रमांक - DL (S)-1/ 3550/ 2023-25 डब्ल्यूपीपी क्रमांक - U (S)-98/ 2023-25, बीपीसी, मार्केट मार्ग, नवी दिल्ली – 110001 इथून पाक्षिक 13–17 आगाऊ पोस्ट केले, (प्रकाशन दिनांक - 2 जानेवारी 2026, एकूण पृष्ठे -64)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महानिदेशक, पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक आणि मुद्रक
कंचन प्रसाद
महानिदेशक, केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्रमांक– 278, केंद्रीय संचार ब्युरो, सूचना भवन, दुसरा मजला, नवी दिल्ली 110003 इथून प्रकाशित

मुद्रण –जेके ऑफसेट ग्राफिक्स प्रा. लि. बी-278, ओखला औद्योगिक क्षेत्र, फेज– 1, नवी दिल्ली - 110020